# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०१/२००९ व अपील क्रमांक ८०२/२००९.

श्री. केवलदास लक्ष्मण बन्सोड,
वर्षा पॅलेस, नवेगांव (मोरेश्वर पेट्रोलपंप समोर),
पो. मुडझा, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. एम. राजनहिरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली.

श्री. गिरीधर पुंडलिक उंदिरवाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
कुसुमताई गौतम विद्यालय, कोटगल,
पो. पारडी, ता.जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ८०१/२००९ मध्ये दिनांक १९.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुसुमताई गौतम विद्यालय, कोटगल, पो. पारडी, ता.जि. गडचिरोली यांचेकडे Copy of the employees Muster roll working in Kusumtai Goutam Vidyalaya, Kotgal, Tah. Dist. Gadchiroli. अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी दिनांक १ जून २००६ ते ११ नोव्हेंबर २००८ असा आहे. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अपील क्रमांक ८०२/२००९

... २

मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी सन २००६-२००७ व सन २००७-२००८ वर्षाच्या शालेय कॅशबुकच्या व ऑडीटड स्टेंटमेंटच्या प्रमाणित नकला मिळण्याबाबत. सदर कालावधीच्या एस. सी., एस. टी. व एन. टी. विद्यार्थी विद्यार्थीनींना वाटप झालेल्या शिष्यवृत्ती बोर्ड परीक्षा शुल्क व गुणवत्ता शिष्यवृत्तीबाबत रजिष्टरच्या प्रमाणित नकला मिळणेबाबत. सदरची माहिती स्वत: घेणार असे नमुद केलेले आहे. दोनही अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २५.२.२००९ व दिनांक ३१.३.२००९ दोन प्रथम अपीले दाखल केली होती. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली व दिनांक २८.४.२००९ रोजी त्यांना निर्णयाची प्रत दिलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते स्वत: त्या शाळेमध्ये मुख्याध्यापक होते. परंतु त्यांना व्यवस्थापकाने काढून टाकण्यात आल्यामुळे त्यांना त्यांच्या कालावधीतील काही माहितीची आवश्यकता आहे व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना कोणत्याही प्रकारची माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची शाळा ही कायम स्वरुपाची विना अनुदान तत्वावर आहे. तसेच अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यापैकी जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती घेण्यास अपीलकर्ता हे केंव्हाही माहिती घेण्यास आले नाही व त्यांनी व्यक्तिश: माहिती मागितलेली आहे व व्यक्तिश: माहिती मागितल्यावर त्यांनी स्वत: घेण्याची आवश्यकता होती. परंतु ते माहिती घेण्यास केंव्हाही येत नाही. माहितीच्या संदर्भात तपासणी केली असता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शिक्षक कर्मचारी हजेरी शैक्षणिक सत्र २००६-२००७ ते २००७-२००८ पर्यंतची कार्यालयात उपलब्ध नसल्याचे आढळले. यापुर्वी मुख्याध्यापक पदावर अपीलकर्ता श्री. के. एल. बन्सोड हेच होते. त्यांच्या कालखंडात शाळेचे व संस्थेचे बराच दस्ताऐज त्यांचेकडे असल्याचे कळते. शाळा न्यायाधिकरणला त्यांनी बराच दस्ताऐज सादर केलेला आहे. त्यांना दिनांक १२.२.२००९ ला पत्र पाठविले. आपल्याकडे असलेली माहिती हि कोठून आली. त्यांनी त्यांच्याबाबत कोणतेही पत्र अथवा स्वत:

भेट दिली नाही. तरीपण शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे कार्यालयात दिनांक २३.३.२००९ रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर त्यांना दिनांक २४.३.२००९ ला पत्र पाठविले. माझ्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती पत्र मिळताच कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करावी. परंतु कोणत्याही प्रकारचे कार्यालयाशी संपर्क साधले नाही किंवा स्वतः सुध्दा मिळाले नाही. याबाबत शिक्षणाधिकारी, गडचिरोली यांना सुध्दा माहिती कळविण्यात आली. त्यानंतर दिनांक २९.७.२००९ ला जिल्हाधिकारी, गडचिरोली व त्याची एक प्रत श्री. के. एल. बन्सोड यांना रजिष्ट्रेशन करुन पोष्टानी दिनांक १.८.२००९ ला पाठविली. तरीपण कार्यालयाशी संपर्क साधले नाही. उपलब्ध असलेली माहिती नेण्यासंदर्भात तात्काळ बोलावणी केली परंतु माहिती प्राप्त करुन घेऊ शकले नाही. तसेच शाळा ही कायम विना अनुदानित असल्यामुळे शासकीय अनुदान कोणत्याही प्रकारचे नाही शाळेला सन २००४ पासून कायम विना अनुदान स्वरुपात चालविण्याची मंजूरी दिली आहे. तरी शाळा कायम विना अनुदान तत्वावर असल्यामुळे माहितीचा अधिकार लागू होत नाही असे त्यांनी म्हटले आहे. यापुर्वी महात्मा गांधी विद्यालय, मुरखळा येथे असतांना सचिवांचे चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले आहे. यांची वर्तणूक बरोबर नाही वेळोवेळी मला त्रास देत असतो असा खुलासा केलेला आहे. दिनांक १७.२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने दस्तऐवजाची तपासणी केली असता त्या ठिकाणी शिष्यवृत्ती परिक्षा फी विद्यार्थ्यांची अफरातफर केली असे आढळुन आले. त्यानुसार संपूर्ण रेकॉर्ड संस्था सचिवांनी आपल्या ताब्यात घेऊन पुढील चौकशीसाठी संबंधित कार्यालयाशी संबंध साधून त्याची चौकशी सुरु होती व त्यांचेवर अफरातफर केल्या संबंधात गुन्हा नोंदविण्यात आले. वाटप रजिष्टरवर खोटया स्वाक्षऱ्या मारुन मुलांना-मुलींना काही ठिकाणी सहया करुन अपूरी रक्कम दिली या सर्व बाबींची चौकशी करुन गटशिक्षणाधिकारी, गडचिरोली यांनी यांचेवर अफरातफर संबंधी गुन्हा नोंदला. पोलीस स्टेशन, गडचिरोली यांनी त्यांचेवर ४०९, ४२०, ४६८, ४७१ या कलमा लावण्यात आले आहेत. सदर प्रकरणाबद्यल कोर्टामध्ये केस चालू असल्यामुळे आम्ही त्यांना कागदपत्रे देऊ शकलो नाही. यापुर्वी मुख्याध्यापक पदावर अपीलकर्ताच होते. अर्जामध्ये मागितलेली काही कागदपत्रे स्वतः ते शाळा न्यायाधिकरणात जोडले आहेत ते कागदपत्रे त्यांचेकडे कोठून आले. शाळेतील काही दस्ताऐवज अर्जदारानींच गहाळ केला आहे. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व ते स्वतःही ती घेण्यास येत नाही. तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी श्री. आर. एम. डोंगरे, सचिव, जनजागृती सेवा शिक्षण संस्था, गडचिरोली यांना पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), गडचिरोली. यांनी

... ४

चौकशी दरम्यान प्रकल्प अधिकारी यांचे आदेशान्वये गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गडचिरोली यांनी श्री. केवलदास बन्सोड यांनी शिष्यवृत्तीच्या रक्कमेमध्ये केलेल्या अफरातफर बाबत चौकशी केली. चौकशी अंती श्री. केवलदास बन्सोड, मुख्याध्यापक यांनी ५१००/- रुपये अफरातफर केल्याचे सिध्द झाल्याने त्यांना सदर रक्कम भरणा करण्याबाबत ३ दिवसाची मुदत दिली व भरणा न केल्यास कारवाई करण्यात येईल अशी समज देण्यात आली. तसेच सदर मुदतीत गैरअर्जदार श्री. केवलदास बन्सोड यांनी अफरातफरेची रक्कम रुपये ५१००/- चा भरणा न केल्याने श्री. नवल दामू पारधी, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गडचिरोली यांनी पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे श्री. केवलदास बन्सोड यांचेविरुध्द अफरातफरेची तक्रार दिल्याने अप. क्र. ६१/२००९ कलम ४०९, ४२०, ४६८, ४७१ अन्वये दिनांक २२.४.२००९ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. त्या पहिली खबरची प्रत आयोगापुढे सादर करण्यात आली आहे. असे असतांना सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देणे म्हणजे कोणत्याही प्रकारची चौकशी न करता निर्णय करणे असा त्याचा अर्थ होतो. विद्या विकास मंडळ, लाखांदूर, जि. भंडारा, ह.मु. नवेगांव (मुरखळा), ता.जि.गडचिरोली यांचेकडून चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र दिनांक १०.११.२००८ सुध्दा सादर केले आहे. त्यावर श्री. केवलदास लक्ष्मण बन्सोड, सहाय्यक शिक्षक यांनी अल्पकालीन अवधीत प्रभारी मुख्याध्यापक पदावर दिनांक १.९.१९७९ ते दिनांक ६.५.२००२ पर्यंत या विद्यालयात कार्यरत होते. परंतु ते सेवेत असतांना त्यांच्या विषयी शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, विद्यार्थी यांचेकडून अनेक तक्रारी संस्थेला प्राप्त झाल्या होत्या. त्यातील काही अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी खाली निर्देशित केल्या आहेत. त्या येणेप्रमाणे. १) स्वतःच्या नातलगाच्या ११ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला आपल्या स्वतःच्या घरी शिक्षणासाठी ठेऊन तिच्यावर बलत्कार केला, २) पैशाची अफरातफर करणे, ३) विद्यार्थ्यांच्या जातीत व आडनावात बदल करुन तसे प्रमाणपत्र देणे. ४) मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, यांचेशी उध्दटपणाची भाषा वापरुन त्यांचा अपमान करणे, अहंकारी स्वभाव, विद्यार्थ्यांना संस्थेविरुध्द चिथावणी देऊन संस्थेला बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न करणे, खोटे दस्ताऐवज तयार करुन मुख्याध्यापकाला फसविण्याचा असफल प्रयत्न करणे इत्यादी दोषारोप चौकशी कमेटीद्वारे बहुमताने सिध्द झाल्यामुळे त्यांना दिनांक ७.५.२००२ ला सेवेतून कायमचे बडतर्फ करण्यात आले. असा व्यक्ती शाळेत ठेवण्यास मुळीच पात्र नाही. असे माझे स्पष्ट मत आहे. सबब प्रमाणपत्र दिले आहे. सचिव, विद्या विकास मंडळ, लाखांदूर यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे

त्यासंदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली आहे असे दिसुन येत नाही व त्यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टिने आवश्यक नसल्यामुळे व त्रास देण्याचे दृष्टिने असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा गैरवापर करीत आहेत असे दिसून येते व त्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत. सुनावणीच्या वेळेस चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल अशा प्रकारचे आदेश दिले असले तरी संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता वरील वस्तुस्थिती समोर आल्यावर सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे व चौकशी करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८०१/२००९ व अपील क्रमांक ८०२/२००९ हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ४.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०४/२००९.**

श्री. सुभाष तुकारामजी तांबेकर,
मु. पो. सिरसगांव, ता. हिंगणघाट,
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख,
वर्धा.

श्री. एम. एम. फुलपगारे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भुमी अभिलेख, ता. हिंगणघाट,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, हिंगणघाट यांचेकडे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.५.२००९ रोजी अपीलकर्ता यांना आपण मागितलेली माहिती ही माहिती अधिकार २००५ कायदा कलम २(च) प्रमाणे मागितलेली नाही. त्यामुळे आपणास माहिती पुरविता येत नाही. तथापि आपण आपल्या अर्जात नमुद केले बाबत आपण दिनांक १८.५.२००९ रोजी कार्यालयाशी वाद घालून समक्ष लेखी मागितले. परंतु आपणास जेंव्हा लेखी दिले ते आपण

... २

वाचून घेऊन स्विकारण्यास नकार दिला. त्यामुळे आपणास सदर लेखी रजिस्टर पोष्टाने पाठविलेले आहे. त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे पुर्तता करावी. म्हणजे नियमानुसार पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. याची जाणीव असू दयावी. परंतु सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.८.२००९ रोजी देण्यात आला असून सदरच्या निर्णयामध्ये अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती न मागता प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागणी केलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, शेत जमीन खरेदी करतांना शेत सर्व्हे नं. ४८, आराजी ४.३२ हे. आर. हे शेंत त्याची हद्य व वहिवाटी प्रमाणे विकत घेतले होते. परंतु विक्री करते वेळेस हिंगणघाट भुमी अभिलेख कार्यालयाचे पुर्नमोजणी करण्यात आली नंतर ती आराजी ३.८२ हे. आर. करण्यात आलेली आहे. तसेच हिंगणघाट येथील मोजणी कार्यालयाने दिनांक १८.१.२००५ ला वहिवाटीप्रमाणे मोजणी करुन मला क प्रत दिली ती ४.६० हे. आर. एवढया आराजीची आहे. त्यामध्ये जुन्या शेतमालक यांचेकडून आराजी ४.३२ हे.आर. प्रमाणे विक्रीचा सौदा केला होता व जुन्या आराजी प्रमाणे दुरुस्ती करण्याकरिता मी अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, वर्धा येथे दिनांक ३०.७.२००५ ला मला मिळालेली क प्रत दुरुस्ती करण्याकरिता अर्ज देऊन मागणी केली होती. त्यावर जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी क प्रत दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. तसेच मोजणी अगोदर कागदपत्रे सादर केली होती व त्या कालावधी पासून माझे क प्रत मोजणी प्रकरण दुरुस्ती न झाल्यामुळे माझे आर्थीक नुकसान झाले आहे. माझे वहिवाटित असलेली २ जमीन लागु धारकाने श्री. भाऊराव लोहकरे व श्री. विनायक मांगरुटकार यांनी ताब्यात घेतलेली आहे त्याला जबाबदार आपण व आपले कार्यालय आहे अशी मागणी केली आहे व ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या २(च) प्रमाणे ती "माहिती" या व्याख्येत येत नसल्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास १९९७ ची सुध्दा नोंद दाखविली. त्या नोंदीमध्ये आराजी ३.८२ हे.आर. आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तशी

प्रत्यक्ष आराजी ३.८२ आहे व संबंधित मोजणी करावी असे अपीलकर्ता यांनी सांगितल्यामुळे त्याप्रमाणे क प्रत दुरुस्त करता येत नाही व अपीलकर्ता अर्जदार यांना त्यांना सदरच्या शेत जमीन खरेदी खताची माहिती दाखवावी असे मागणी केली असता त्यांनी खरेदी खताची प्रत दाखविली नाही. असे असले तरी क्षेत्र दुरुस्तीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारचे आदेश करता येत नाही व त्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. अपीलकर्ता यांची जी तक्रार आहे त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदीप्रमाणे योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडे क्षेत्र दुरुस्तीकरिता अपील करणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०३/२००९.**

श्री. निलकंठ राखडूजी धुर्वे,
खांब तलाव रोड, गांधी चौक,
जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रमोद हुमणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भंडारा.

कु. एम. एस. सावरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत दवडीपार (बाजार),
ता. जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००९ रोजी सचिव/सरपंच, ग्राम पंचायत, दवडीपार बाजार यांचेकडे श्री. सुकराम डोनु नागोसे, रा. दवडीपार (बाजार) यांच्या मृत्यूच्या दाखल्याची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्यामुळे व श्री. निलकंठ धुर्वे यांची यापूर्वी तोंडी मागणी असल्यामुळे श्री. राजू सुकराम नागोसे यांना पत्राद्वारे दिनांक २५.७.२००९ ला नाहरकत मागविले. श्री. राजू नागोसे यांनी सदर माहिती त्यांच्याशिवाय अन्य कोणालाही देण्यांत येऊ नये असे लेखी कळविले व त्यामुळे दिनांक १.८.२००९ रोजी माहिती नाकारण्याबाबत कळविण्यात आले.

... २

सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे निर्णय देऊन प्रथम अपील हे फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते मुख्याध्यापक होते व मय्यत श्री. सुकराम डोनु नागोसे हे त्या कार्यालयामध्ये शिपाई होते. त्यासंदर्भामध्ये त्यांना मा. उच्च न्यायालयामध्ये खंडपीठ, नागपूर येथे याचिका दाखल केलेली आहे व त्या याचिकेमध्ये प्रतिवादी म्हणून ५ नंबरला श्री. सुकराम डोनु नागोसे यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. परंतु त्यांचा मृत्यु झालेला असल्यामुळे सदरची याचिका ही बोर्डावर घेण्यास त्यांचा मृत्युचा दाखल्याची मागणी केली आहे. त्यामुळेच त्यांनी सदरची माहिती मागितली होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती आहे या कारणासाठी मय्यतचे मुलास विचारणा केली व त्यांनी माहिती देण्यात येऊ नये असे कळविलेले असल्यामुळे त्यांना माहिती दिली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री. राजू सुकराम नागोसे हा मय्यतांचा मुलगा असून त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयास दिनांक २४.७.२००९ चे अर्जान्वये त्यांचे वडीलांशी संबंधित कोणताही दस्ताऐवज त्यांचे परवानगीशिवाय न पुरविण्याचे कळविले आहे. त्यामुळे ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही.

४. कोणत्याही व्यक्तींचा मृत्युचा दाखला हा सार्वजनिक अभिलेखाचा भाग होतो. ती त्रयस्थ पक्षाची माहिती होत असली तरी ती त्यांची वैयक्तिक माहिती नाही किंवा त्यास त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय माहिती नाही व त्यामुळे सदरची माहिती ही जन्ममृत्यु कायद्याप्रमाणे ग्रामपंचायतचा सार्वजनिक अभिलेखाचा भाग होतो व त्यामुळे सदरच्या मागणी प्रमाणे मृत्युचा दाखला हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे हा उपलब्ध करुन देता येत नसला तरी जन्ममृत्यु नोंदी रजिष्टर प्रमाणे संबंधित मृत्युची नोंदीची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना संबंधित रजिष्टर मधून मृत्युच्या नोंदीची छायांकित प्रती उपलब्ध करुन देऊन ती प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती व्यक्तिशः संबंधित ग्रामपंचायत कार्यालयातील मृत्युच्या नोंदीची छायांकित प्रमाणित करुन व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०५/२००९, अपील क्रमांक ८०६/२००९, अपील क्रमांक ८०७/२००९ व अपील क्रमांक ८०८/२००९.**

श्री. लक्ष्मय्या राजम नागुला,
वन परिक्षेत्र कार्यालय,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर - ४४१ २०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक -२,
प्रशासकीय इमारत, पहिला माळा, चंद्रपूर - ४४२ ४०१.

जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक -२,
प्रशासकीय इमारत, पहिला माळा, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ८.९.२००९, दिनांक ९.९.२००९ व दिनांक १०.९.२००९ रोजी दोन द्वितीय अपीले असे एकूण चार द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेली आहेत. त्यापैकी अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८०५/२००९, अपील क्रमांक ८०६/२००९ व अपील क्रमांक ८०७/२००९ हे एकच आहेत व त्यामुळे तीनही अपीलाचे संदर्भामध्ये एकच निर्णय देण्यात येतो. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचेवतीने श्री. संजय रामराव देवकाते, जनसंपर्क अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००९, दिनांक २९.५.२००९ व दिनांक ३०.५.२००९ रोजी एकूण १३ शासन निर्णयाची माहिती वेगवेगळया अर्जानुसार जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, नागपूर विभाग, चंद्रपूर यांच्याकडे मागितली आहे. सदरच्या अर्जाचे

... २

अनुषंगाने अपीलकर्ता यांना सर्व शासन निर्णयाचे संदर्भामध्ये वेबसाईडवर शासन निर्णय उपलब्ध आहेत व समिती नवीन असल्यामुळे काही शासन निर्णय त्यांचेकडे उपलब्ध नाही असे दिनांक २९.६.२००९ रोजी त्यांचा अर्ज दिनांक ३०.३.२००९, दिनांक ६.४.२००९, दिनांक १३.५.२००९, दिनांक २०.५.२००९, दिनांक २८.५.२००९ (२), दिनांक ३०.५.२००९, दिनांक ५.६.२००९ व दिनांक २०.६.२००९ इत्यादी अर्जाचे संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. तसेच दिनांक २८.५.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती प्रकरणांचा क्रमांक व वर्ष यासह आपणांस कोणत्या प्रकरणांची माहिती कळविण्यांत यावे जेणे करुन आपणांस माहिती देणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३०.६.२००९ रोजी एकूण ३ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १८.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता कळविले होते. परंतु सुनावणीच्या वेळेस गैरहजर होते. परंतु निर्णय न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी शासन निर्णय मागितले होते. त्या शासन निर्णयामध्ये बेस्ता/बेस्ती ही जात इतर मागासवर्गीयात आहे. त्याबाबतच्या शासन निर्णयाची त्यांना आवश्यकता आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. श्री. नागुला यांचे जाती प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव या कार्यालयाकडे विचाराधीन होता. श्री. नागुला यांची व त्यांच्या वडीलांच्या सेवापटाच्या नोंदीवर पालेवार ही नोंद असून श्री. नागुला यांनी जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीस वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता जाणीवपुर्वक दबाव तंत्राचा वापर करुन माहिती अधिकाराचा वापर केला. त्यांनी शासन सेवेत रुजू होतांना भोई विमुक्त भडक्या जमाती या प्रवर्गाचा जातीचा दाखल दिलेला असून ते खोटया जाती प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवा मिळविलेली आहे. समितीकडे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाकरिता प्राप्त झालेले प्रस्ताव विहित कालावधीत त्यांना प्रवेश समितीला सादर करण्याकरिता देय असणे आवश्यक असल्याने समितीने प्रथम प्राधान्याने त्यांची ५००० प्रकरणे निकाली काढली असल्याने अर्जदारास माहिती देण्यास विलंब झाला त्याबद्यल क्षमस्व असावी. चंद्रपूर समिती दिनांक ३.१०.२००७ रोजी कार्यान्वित झालेली असून जुने शासन निर्णय या समितीकडे उपलब्ध नाहीत. समितीकडील जे शासन निर्णय उपलब्ध आहे त्याच्या प्रती तसेच जी प्रकरणे समितीकडे प्राप्त आहे त्याच्या प्रती सुध्दा अर्जदारास पुरविण्यात येत आहे. तसेच बेस्ता/बेस्ती ही जात इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गात येत असल्याने त्यांचे प्रकरण समितीने अवैध ठरविलेले असून समितीस जाणीव पुर्वक त्रास

... ३

देण्याच्या हेतुने माहितीचा अधिकाराचा वापर केलेला आहे. अर्जदार यांनी शासन निर्णय दिनांक २२.८.२००७ अन्वये रक्तासंबंधाचे वैधता प्रमाणपत्राच्या आधारे झालेल्या वैधता प्रमाणपत्र प्रकरणांची सर्व नस्त्यांची छायाप्रत मागितलेली आहेत. अशी प्रकरणे मोठया प्रमाणात असून त्या संबंधित त्यांना निरिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यांना ज्या प्रकरणाची दस्ताऐवज हवे आहे ती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. यावरुनच अपीलकर्ता यांनी केलेला अर्ज व मागितलेली माहिती हा समितीवर दबाव आहे असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, समितीचा निर्णय त्यांना मान्य नसला तर त्यांनी उच्च न्यायालयामध्ये दाद मागणे आवश्यक आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये माहिती मागणे त्रास देण्याचा त्यांचा उद्येश दिसून येतो.

४. अपील क्रमांक ८०८/२००९ मध्ये सुध्दा त्यांना दिनांक ३०.६.२००९ रोजी श्री. वेंकटी अंकुलू मादर बोईना यांचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. त्यासंदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुले) कोत्तागूडम (सिरोंचा) या शाळेची टी. सी. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व वडिलांचे पी. वन भोई या जातीचे छायाप्रत देण्यात येत आहे. याची ई. १० वी ची टीसी नाही. असा खुलासा दाखल केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरची अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या बेस्ता/बेस्ती या जातीची नोंद असल्यामुळे शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपील क्रमांक ८०८/२००९ हे खारीज करण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८११/२००९.

सौ. प्रमिला राजेश मेश्राम,
द्वारा - श्री. दामोधर खोब्रागडे यांचे घरी,
प्लॉट नं. ५६, उंटखाना, नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक - ४, अजनी विभाग,
नागपूर शहर, नागपूर.

श्री. के. एस. बहुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
अजनी विभाग, नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १५.९.२००९ राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावतीने श्री. घोगरे, विधी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २४.३.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, अजनी, नागपूर यांचेकडे एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.४.२००९ रोजी अपीलकर्ती यांना मुद्येनिहाय एकूण ४ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २.५.२००९ रोजी अपीलकर्ती यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.६.२००९ रोजी देण्यात आला असून

... २

अपीलकर्ती यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांचा मुद्या क्रमांक ४ मध्ये त्यांनी ज्या तक्रारीचा उल्लेख केलेला आहे त्या तक्रारीची माहिती पोलीस डायरीचे नोंदीतून त्यांना उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व तक्रारी जर रजिष्टरमध्ये नोंद घेतली असेल तर पोलीस डायरीमध्ये नोंद घेती जाते असे बंधनकारक नाही व त्यामुळे ज्या तक्रारी नोंद घेण्यात आलेली त्या तक्रारीची माहिती दिलेली आहे. तरीही दिनांक २६.१.२००८, दिनांक २९.१.२००८ व दिनांक २.२.२००८ या तक्रारीची नोंद स्टेशन डायरी किंवा रजिस्टरला आढळून आली नाही असे त्यांना कळविलेले आहे. मुद्या क्रमांक १ च्या संदर्भाची माहिती जशी आहे तशी उपलब्ध झ ालेली आहे त्यामुळे कोणत्याही प्रकारची कारण उपलब्ध करुन देता येत नाही. कारण उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये जी सही आहे त्या सहीच्या संदर्भामध्ये चुकीच्या अधिकाऱ्यांचे नाव सांगितले. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिकाऱ्यांचे नांव सांगितले. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी सागितले की, सही ओळखणे कठीण जाते त्यामुळे अंदाजाने सही असलेल्या अधिकाऱ्यांचे नांव जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे सुनावणीत ती सही कोणती आहे असे असले तरी अपीलकर्ती यांची शंका निरसन होण्याकरिता ती कोणत्या अधिकाऱ्यांची सही आहे तसे पोलीस डायरीमध्ये नाहीच. तक्रार नोंदी बंधनकारक नाही अशा प्रकारची माहिती अपीलकर्ती यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना मुद्दा क्रमांक ३ मधील सही केलेल्या अधिकाऱ्यांचे नांव व तसेच पोलीस डायरीमध्ये तक्रारीची नोंद घेण्यास बंधनकारक आहे किंवा नाही अशी माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८१५/२००९.**

श्री. जितेंद्र मदनचंद मोहता,
द्वारा - जे. के. सेल्स कार्पोरेशन,
इलेक्ट्रॉनिक मार्केट, सिताबर्डी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अशोक फेंडरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर (ग्रामीण), नागपूर.

श्री. बढीये,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
नागपूर (ग्रामीण), नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, नागपूर (ग्रामीण) नागपूर मौजा बोखारा प.ह.नं. १२ अ(जुना) सर्व्हे नं. ३४३, ३४५, ३४६ सन १९११-१२ मध्ये होता. यानंतर या सर्व्हे नं. मध्ये किती तुकडे पडले व नविन सर्व्हे नं. कोणकोणते देण्यात आले व सध्या प्रचलनमध्ये कोणते सर्व्हे नं. सुरु आहे त्याची लिखित माहिती किंवा प्रमाणपत्रची सत्यप्रत मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ८.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.७.२००९ रोजी देण्यात आला असून

... २

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जुन्या अभिलेखातील सर्व्हे नं. यांना नवीन कोणते क्रमांक पडले ही माहिती शोधून देणे हे अपेक्षित नाही याकारणासाठी खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना सर्व्हे नं. चे तुकडे किती पडले ही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुर्वीचा सर्व्हे नं. कोणते व नविन सर्व्हे नं. कोणते ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तलाठी कार्यालयामध्ये सन १९११-१२ च्या सर्व्हे नं. ला कोणता नंबर आहे ही माहिती उपलब्ध नसते तर ती तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडून कार्यवाही शिटमधून उपलब्ध होऊ शकते. सदरच्या आदेशात ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे हे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु त्यातही स्पष्टता नाही असे दिसून येते. त्यावरुन तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेतांना ती समजावून घेणे आवश्यक होते व तसे त्यांना त्यांच्याकडे संपर्क साधून समजावून घेणे आवश्यक राहिल. मात्र संबंधित माहिती ही योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८१०/२००९.**

श्री. बाबुराव मोतीरामजी खोब्रागडे,
बजरंगनगर रोड नं. ७, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. डब्ल्यू. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, मौदा,
जि. नागपूर.

कु. वर्षा खोंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत बाबदेव,
ता. मौदा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी प.ह.न. ६४, गट नं. २८४, २८५, ता. मौदा, जि. नागपूर येथील शेतजमीनीवर गावकरी लोकांचे घर आहेत. त्या घरावर आपण घर टॅक्स लावले ते कोणत्या कागदपत्राद्वारे नमुद केले त्या कागदपत्राची माहिती मला द्यावी. किती लोकांच्या घराचे टॅक्स लावे त्याचे कोणत्या प्राकरचे आहेत ते द्यावे. सर्वांचे कागदपत्र सन २००९ तपशीलद्वारे हवे. सदरची माहिती टपालाद्वारे हवी. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.३.२००९ रोजी पटवाऱ्याकडून उपलब्ध झाल्यानंतर आपणास देण्यात येईल. असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.८.२००९ रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना फक्त १२ लोकांची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, एकूण १९६ पृष्ठे त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत व त्यामध्ये नमुना क्रमांक ८ च्या झेरॉक्स प्रती ६ पृष्ठे, रजिस्ट्रीची प्रती, टॅक्स धारकाच्या नावाची यादी व सुचना पत्र आहेत. तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, त्यांना माहिती ही अपूर्ण उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर ती तलाठी यांचेकडून उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. तसेच ज्या व्यक्ति तिथे राहत आहेत त्यांचेकडून टॅक्स पावती घेऊन माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. कार्यालयात फार कमी माहिती उपलब्ध आहे. परंतु तसे त्यांना कळविले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी पुरविली आहे व अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती उपलब्ध नाही असे कळविणे संयुक्तिक राहिल. त्याप्रमाणे ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, मौदा यांचेकडे तक्रार करुन त्यांच्या तक्रारीचे निवारण करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये संपूर्ण माहिती उपलब्ध असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात यावी व उपलब्ध नसल्यास तसे त्यांना कळविण्यात यावे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ४.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९११/२००९.**

श्री. जावेद अली जुल्फेकार अली,
नातिक चौक, सर्कल नं. १, भालदारपूरा,
नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुनील वारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
नागपूर विभाग, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय,
नरसाळा रोड, ता. जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नरसाळा रोड, नागपूर यांचेकडे संस्थेमध्ये सन १९९६-९७ या काळात नियुक्त केलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेश मिळण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्राचार्य,

... २

पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय यांनी माहिती पंजीबध्द डाकेने पाठविली आहे असे सांगितले. मात्र कागदपत्रे सादर केली नाही त्यावर अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती प्राप्त झाली नाही असे सांगितले. अपीलकर्ता यांचे अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीतून एकूण ५ कर्मचाऱ्यांचे आदेशापैकी श्री. एस. वाय. थोटे, श्री. ए. एस. मेश्राम, श्री. एस. डी. भुरे या तीन कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश आहेत व श्री. जावेद अजी जुल्फेकार अली, व श्री. सुधीर सोनटक्के यांचे नियुक्ती आदेश उपलब्ध नाही म्हणून समक्ष उपलब्ध करुन देण्यात आले. उर्वरित २ कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश उपलब्ध नसल्यामुळे ते उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले. त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, पुर्वी सदरची संस्था ही श्री. बाबुराव काळे यांचे अखत्यारित होती. सन १९९५-९६ या कालावधीत पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय या संस्थेकडे आली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, श्री. एस. वाय. थोटे यांची नियुक्ती आदेश हा १९९३-९५ आहे व तीच माहिती प्राचार्य यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, संस्था हस्तांतर करतांना सर्व कागदपत्रे पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय यांचेकडे हस्तांतर झाले आहेत. परंतु सदरची माहिती उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी जरी सांगितले असले तरी अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यास त्यांनी सदरच्या अभिलेखाचे निरिक्षण करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निरिक्षक हे उपस्थित राहतील व त्यांचे निगरानी खाली सदरचे दस्ताऐवज पाहून माहिती घेणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता ांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी जी तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना कळवून त्या दिवशी उपस्थित होऊन तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा कळवून त्यांचे निरिक्षकांचे उपस्थितीत सदरच्या कागदपत्राची तपासणी करुन त्यातील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना तारीख व वेळ कळविल्याचे वेळी त्यांना शासनाचे निरिक्षकांच्या निगरानीमध्ये सर्व अभिलेख उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य हे शास्तीस पात्र राहतील.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९०८/२००९.**

श्री. रामचंद्र तानबाजी कळंबे,
सहाय्यक शिक्षक,
विकास विद्यालय, पिपळा (डाक बंगला),
ता. सावनेर, जि. नागपूर - ४४१ ११३. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. पी. एस. भिसे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
विकास विद्यालय, पिपळा (डाक बंगला),
ता. सावनेर, जि. नागपूर - ४४१ ११३. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. राऊत, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी, विकास विद्यालय, पिपळा (डाकबंगला) यांचेकडे १) विकास विद्यालयात मुख्याध्यापकाच्या पदोन्नतीस मान्यता मिळण्याकरिता शाळेनी किंवा संस्थेनी मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे सादर केलेला प्रस्ताव व त्यासोबत जोडलेल्या आणि मान्यता प्राप्त होईपर्यंत त्यांचेकडे सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या गोपनीय अहवाल, संस्थेचे ठराव व इतर सर्व प्रमाणित प्रती. २) पिपळा शिक्षण संस्थेची कार्यरत कार्यकारीणीची संपूर्ण पत्त्यासह यादी व कार्यकारीणीचा वैधतेचा काळ शिवाय संस्थेत सध्या वाद आहे किंवा

... २

कसे ? याची माहिती. सदरची माहिती व्यक्तिशः घेण्यात येईल असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १४.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मुख्याध्यापक, विकास विद्यालय, पिपळा डाकबंगला यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. तसेच सचिव, पिपळा शिक्षण संस्था, पिपळा डाकबंगला यांना दिनांक १२.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहेत व सदरच्या पत्राची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सदरची माहिती ही संस्थेकडे उपलब्ध असते व त्यामुळे अपीलकर्ता यांना तसे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, संस्थेकडे सुध्दा उपलब्ध असते व मुख्याध्यापक यांचेकडे सुध्दा उपलब्ध असते व त्यामुळेच त्यांना दोन पत्र दिलेली आहेत. परंतु आज आयोगापुढे संस्थेचे कोणतेही अपील दाखल नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी हे नियंत्रण अधिकारी असल्यामुळे संस्थेकडून किंवा जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संस्थेकडून किंवा जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्ता यांना १० दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ५.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२३/२००९.**

श्री. सुनील वामनराव मेश्राम,
गांधी वार्ड, ब्रम्हपूरी रोड,
मु. पो. ता. वडसा (देसाईगंज),
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सी. एम. सदावर्ती,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद देसाईगंज (वडसा)
जि. गडचिरोली.

श्री. ए. जी. बंडावार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगरपरिषद देसाईगंज (वडसा)
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, नगरपरिषद, देसाईगंज, जि. गडचिरोली यांचेकडे नगर परिषदेसमोर आरक्षण क्र. २९ मध्ये बांधकाम करण्यात आलेल्या उद्यानाच्या संरक्षक भिंत्तीचे तसेच इतर कामाकरिता आय.डी.एस.एम.टी. योजनेअंतर्गत किती निधी खर्च करण्यात आला व त्याच अनुषंगाने त्याच अंतर्गत एकणू ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.४.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी

... २

दिनांक १५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.७.२००९ रोजी देण्यात आला असून आपण मागितलेली माहिती वस्तुनिष्ठ नसून आपणास कोणत्या विशिष्ट स्वरुपाची माहिती पाहिजे यांचा बोध होत नाही. तसेच आपण मागितलेली माहिती प्रश्नात्मक स्वरुपाची असून दस्तावेज स्वरुपाची नाही. त्यामुळे आपले दिनांक १५.५.२००९ रोजीचे अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक २ मधील ब, क व ड ची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना सर्वच मुद्यांवर माहिती उपलब्ध झाली आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, ब, क, ड व इतर वेळेस काय खर्च करण्यात आला ही माहिती दिलेली नाही त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले आहे की, अपीलकर्ता यांना आय.डी.एस.एम.टी. योजनेवर त्यावर किती खर्च करण्यात आला व तो ब, क व ड च्या संबंधात इतर निधीमधून खर्च करण्यात आलेला आहे. परंतु त्याची मागणी त्यांनी केलेली नाही. प्रथम अपीलात अपीलकर्ता यांनी त्यांना सर्व खर्चाचे विवरण मागितलेली दिसून येते व त्यात प्रश्न उपस्थित केलेले दिसून येतात व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा त्याप्रमाणे देण्यात आलेला दिसून येतो. उपलब्ध झालेल्या माहितीवरुन प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलात कोणत्याही प्रकारची नविन मुद्दे उपस्थित करता येत नाही व त्यामुळे प्रथम अपीलात उपस्थित केलेले मुद्दे हे गैरलागू आहेत. एकूणच अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता यांनी आयोगाकडे तोंडी विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या अर्जावर ब, क व ड वर आय.डी.एस.एम.टी. योजने अंतर्गत खर्च न करता इतर निधीतून खर्च केलेला झाला त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील दिनांक ४.४.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ मधील ब, क व ड च्या संदर्भामध्ये इतर निधीतून केलेला खर्चाचे विवरण हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावे व त्याकरिता अपीलकर्ता यांना प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना किती पृष्ठे होतात त्याबद्यलची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी कळवावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२२/२००९.**

श्री. अनिल प्यारेलाल वैद्य,
द्वारा - तहसील कार्यालय रामटेक,
ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चंद्रमणी बोरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

श्री. श्रीराम चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर यांचे कार्यालयात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मार्च २००९ मधील बैठक क्रमांक जे १२८५५३ कु. अश्विनी अनिल वैद्य या विद्यार्थीनीच्या इंग्रजी, मराठी, हिंदी, गणित, सायन्स, सोशल सायन्स या विषयांच्या उत्तरपत्रिकांची प्रमाणित प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा

... २

विभागीय सहाय्यक सचिव, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांनी महाराष्ट्र राज्य माहिती अधिनियम, २००२ मधील नियम क्रमांक ७(ज) अन्वये राज्य मंडळ कार्यालय, पुणे यांचे दिनांक ८.१२.२००६ मधील परिच्छेद ५ नुसार विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका ही गोपनीय बाब असून माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खाली तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येत नाही किंवा दाखविता येत नाही अशी मंडळाची धारणा, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे क्रमांक एसएससी २००४/(१३९/०४) उमाशि-२, मंत्रालय मुंबई चे पत्रानुसार पक्की केली आहे व केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी याचिका नंबर ३९२८/२००६ कु. खुशबु विनोद सिंघानिया अर्जदार विरुध्द विभागीय सचिव, अमरावती प्रकरणी उत्तरपत्रिका दाखविणे बाबतची अर्जदाराची याचिका फेटाळली आहे. सबब उत्तरपत्रिकेची छायाप्रत देणे बाबतचा अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात येत आहे. परंतु अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ८.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या मुलींचे म्हणणे असे आहे की, तिने परिक्षेमध्ये पेपर चांगले गेले व ती नापास होणार नाही व त्याकरिता उत्तरपत्रिका पाहणे आवश्यक आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी गुण पडताळणीचा अर्ज केला होता. परंतु त्यात कोणत्याही प्रकारचा बदल आढळून आला नाही. तसेच उत्तरपत्रिकाची माहिती देता येणार नाही अशा प्रकारे कु. खुशबु विनोद सिंघानिया अर्जदार विरुध्द विभागीय सचिव, अमरावती यांचा निर्णय आहे त्याच प्रमाणे याचिका क्रमांक ८८६८/२००९ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी दाखल केलेल्या अपील मध्ये श्री. अभिजित श्रीपाद जोशी यांनी दाखल केलेल्या मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी उत्तरपत्रिका देण्यास स्थगिती दिलेली आहे. सदरच्या निर्णयाचे संदर्भामध्ये विचार करता उत्तरपत्रिका देण्याचे आदेश देता येणार नाही. मा. उच्च न्यायालयाचा निर्णय हा बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर यांच्या निर्णयाचे अनुषंगाने खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८१९/२००९.**

श्री. मनोहर चिंधु सोनवणे,
दुय्यम निबंधक, आरमोरी,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
प्लॉट नं. ९०, शिवाजीनगर, नागपूर.

श्री. ए. एस. पेठे,
जनमाहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि. श्रे.),
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,
गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. ए. पी. हांडा, सह जिल्हा निबंधक वर्ग-२ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (निम्मश्रेणी), गडचिरोली यांचेकडे दिनांक २४.२.२००९, दिनांक २.३.२००९ रोजीचे दिलेल्या अर्जाचे संदर्भात झ ालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच दिनांक ९.१०.१९९३ ते २२.१२.१९९३ पर्यंत वेतन व भत्ते काढणेत आले होते काय ? आले असल्यास त्या वेतन व भत्ते मला दिल्या बद्यल माझी घेतलेली स्वाक्षरीची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.४.२००९ रोजी सद्य:स्थितीत सदर अर्ज पेंडीग आहे. दिनांक ८.१०.१९९३ ते २२.१.१९९३ चे वेतन आपणास अदा केले असून त्याची छायांकित प्रत सोबत पाठवित आहे.

... २

दिनांक १२.२.२००९ चे पत्र सद्यस्थितीत पेंडींग आहे अशी माहिती कळविलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक १२.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक १५.५.२००९ रोजी माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले असून अपीलकर्ता यांना दिनांक १२.२.२००९ च्या निवेदनाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.६.२००९ रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपीलकर्ता यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे संदर्भामध्ये सुहानुभूतीपुर्वक विचार करण्यात आला असून त्यांनी उपस्थित केलेल्या ४ मुद्यांपैकी मुद्या क्रमांक ३ संदर्भात वरील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून उर्वरित मुद्या क्रमांक १, २ व ४ ची प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरु असल्याचे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता हे १९९३ साली निलंबित झाले होते व १९९८ मध्ये त्यांना सेवेतून कसढण्यात आले होते व त्यामुळेच त्यांचे सर्व वेतन व भत्त्याचे संदर्भामध्ये प्रत्येक वेळेस प्रस्ताव पाठविण्याचे मंजूरी घेणे अशा प्रक्रिया सुरु आहे व तसे त्यांना संपूर्णपणे आता पर्यंत कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांची अपेक्षा ही तातडीने निर्णय व्हावे अशी दिसून येते. परंतु प्रत्येक वेळेस मंजूरी करण्यास व पाचव्या वेतनानुसार मंजूरी या सर्व मुद्यांचे संदर्भात प्रत्येक अधिकाऱ्यांकडून अभिप्राय घेऊन ते मुख्य कार्यालयास मंजूरीस पाठविण्यात येतात व तशी प्रक्रिया सुरु आहे. काही प्रस्ताव मंजूरीस पाठविले आहेत व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ५.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२९/२००९.**

श्री. सुभाष शेषराव पिसाळ,
५४, लाडीकर ले आऊट, झेंडा चौक,
मानेवाडा रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी (स्वच्छता)
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी (स्वच्छता), महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दोषारोपण पत्राचे संबंधान गांधीबाग झोनच्या ऐवजदार कर्मचाऱ्यांबाबत २००५ मधील एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगास दिनांक ५.११.२००९ रोजी निवेदन सादर केलेले आहे. त्यात त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे मागे घेत आहे असे लेखी निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ५.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१४/२००९.**

श्री. पांडुरंग गणपतराव सपकाळ,
करंभाड, पो. ता. पारशिवनी,
जि. नागपूर - ४४१ १०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. व्ही. भालेराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभाग, कामठी, जि. नागपूर.

श्री. एस. के. आंभोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस अधिकारी
पोलीस स्टेशन, खापरखेडा,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन, खापरखेडा यांचेकडे श्री. सुधीर नथ्थु येवले यांच्या मृत्युच्या कारणांचा तपास आणि आत्महत्तेची चौकशीच्या तपशील पुराव्यासाठी माहिती अर्जामध्ये एकूण ११ मुद्ये उपस्थित केलेले आहेत. अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग, कामठी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अर्जदारांनी पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे दिनांक १२.६.२००९ चा माहितीचा अधिकाराअंतर्गत पोस्टाने पाठविलेला अर्ज पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे पोहचल्याची पोच पावती अर्जदारांना पोष्टाने प्राप्त झालेली असून सहाय्यक जनमाहिती अधिकारी म्हणून ठाणेदार श्री. एस. के. अंभोरे यांनी सदरचा अर्ज ५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी म्हणून आमचेकडे सादर करणे आवश्यक होते. परंतु त्यांना सदरचा अर्ज सादर केला नव्हता. अर्जदारांचा प्रथम अपील अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांना पोष्टाने पाठविलेला या कार्यालयात दिनांक ४.८.२००९ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांचेकडून प्राप्त झाले वरुन अर्जदारांना पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे बोलावून प्रत्यक्ष प्रथम अपील अर्जाबाबत चर्चा करण्यात येऊन ठाणेदारांना अर्जदारांचे पोस्टाने पाठविलेल्या दिनांक १२.६.२००९ चे अर्जाबाबत विचारणा करण्यात आली असता ठाणेदारांचे समक्ष अर्ज ठेवण्यात आला नसल्याने कारवाई करण्यात आली नाही असा खुलासा सादर केला. यावरुन ठाणेदारांना अर्जाबाबत मुदत देण्यात आली व दिनांक २४.८.२००९ रोजी अर्जदारांना या कार्यालयात बोलावून माहितीचे अधिकाराअंतर्गत दिनांक १२.६.२००९ चे अर्जाची छायांकित प्रत सादर करण्यास कळविण्यात आले. परंतु त्यांचेकडे सदरचा अर्ज नसल्याचे सांगितल्याने वेगळा त्याच मजकुराचा माहितीचे अधिकारांतर्गत आमचे समक्ष सादर करण्यास कळविले असता अर्जदारांनी दिनांक २४.८.३००९ चा अर्ज आमचे समक्ष सादर केल्याने अर्जदारांचे अर्जात नमुद माहिती व कागदपत्रे पोलीस स्टेशन, खापरखेडा येथून प्राप्त करण्यात आले व अर्जदारांना या कार्यालयाचे जावक क्रमांक २६२१/केडी-५/मा.अर्ज/०९, कामठी दिनांक २९.९.२००९ अन्वये माहितीचे पत्र व सहपत्रात नमूद कागदपत्रे या कार्यातयात देण्यात आले. वरील प्रमाणे अर्जदारांचे अर्जाबाबत कारवाई करण्यात आलेली असून अर्जदारांचा दिनांक १२.६.२००९ चा पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे पोस्टाने पाठविलेला अर्ज आमचेकडे जनमाहिती अधिकारी म्हणून प्राप्त न झाल्याने आमचेकडून त्या अर्जावर कारवाई करण्यात आली नाही. याबाबत ठाणेदार, पोलीस स्टेशन, खापरखेडा यांचा खुलासा प्राप्त करण्यात आलेला असून पुढील कारवाई करण्यात येते. परंतु सदर अपीलकर्ता यांचे प्रथम अपील अर्ज व त्यानंतर माहितीचे अधिकारांतर्गत अर्ज दिनांक २४.८.२००९ चे प्रत्यक्ष या कार्यालयात दिलेल्या अर्जाबाबत माहिती व माहितीचे कागदपत्रे अर्जदारांना देण्यात आलेले आहेत. यात आमचेकडून योग्य कारवाई झाल्याचे व अर्जदारांना समाधान करण्याचे आम्ही पूर्णतः प्रयत्न केल्याचे आपणांस सहपत्रात नमूद कागदपत्रांवरुन

दिसून येईल. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता हे स्वतः हजर नसल्यामुळे व त्यास कोणत्याही प्रकारची माहिती मिळाल्याची पोच जनमाहिती अधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी यांचेकडे दिसून येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती कागदपत्राची छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १२.६.२००९ च्या अर्जातील ११ मुद्यांमधील माहिती कागदपत्रांचे स्वरुपात छायांकित प्रती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द तक्रार आल्यास अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१२/२००९.**

श्री. मदन राधाकिसन दुबे,
पोलीस क्वॉर्टस मागे,
सिंधी हिंदी शाळेजवळ,
गांधीबाग, नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

श्री. एस. एस. धनगरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे सन १९७९-८० व त्यानंतर या कालावधीतील अर्जदाराची आई श्रीमती शांताबाई राधाकिसन दुबे वरील भूमीधारकांपैकी एक होती. मा. उपविभागीय अधिकारी यांचे आदेशानुसार पुनर्वसनकरिता भूमी घेतल्याने त्याचा मोबदला भूमीधारक वारसांना देण्यात आला. करिता एकूण भूमी संपादन केल्यानंतर अर्वाडनुसार एकूण रक्कम व त्याचे वाटप कोणकोणत्या व्यक्तिला करण्यात आला व त्यांना देण्यात आलेली रक्कम व अवार्डची प्रत माहितीसह देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली

... २

नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदर प्रकरण जिल्हा कार्यालयातील रेकॉर्ड रुमला दिनांक १८.१२.१९८५ ला पाठविण्यात आल्याची सन १९७९-८० चे रजिष्टरला नोंद आढळून आलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील अवार्डची प्रत या कार्यालयाकडून आपणास देणे शक्य नाही ती आपणास जिल्हा कार्यालयातील रेकॉर्ड रुमकडे अर्ज सादर करुन उपलब्ध करुन घेता येईल. करिता आपला अर्ज या स्तरावर निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे आलेले प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती जुनी असल्यामुळे व रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी अर्ज करतांना जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर असा अर्ज केलेला आहे व त्यामुळेच सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाली आहे. त्यानंतरही दिनांक ३.७.२००९ रोजी त्याच प्रमाणे माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते अभिलेखागारात गेले होते. परंतु अभिलेखागारात सदरची नस्ती जमा करण्यात आली नाही असे सांगण्यात आले. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे अर्ज केलेला असल्यामुळे त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारे कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार किंवा विहित मुदतीत माहिती सादर केलेली दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची अपीलाची सुनावणी घेतली नाही व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा जिल्हाधिकारी, नागपूर यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यांनी शासनाच्या निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केले व तसेच अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले ही बाब प्रशासकीय कार्यवाहीसाठी पुरेशी आहे.

... ३

तसेच जनमाहिती अधिकारी हे जिल्हाधिकारी कार्यालय असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेखागारातील माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे ही त्यांची जबाबदारी आहे व त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय अभिलेखागारात जमा केले आहे असे अपीलकर्ता यांना उत्तर देणे हे बेजबाबदार व माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांचा दिनांक ५.१.२००९ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रकरणाचा शोध घेऊन माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांमध्ये कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे किंवा पत्र व्यवहार सुध्दा केलेला नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
३) प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले. तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केले असल्यामुळे प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.
४) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हाधिकारी, नागपूर यांनी करावयाची आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीकरिता निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे जिल्हाधिकारी, नागपूर यांना पोष्टाने पाठविण्यात यावी.
५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१६/२००९.**

श्री. देवराव नत्थुजी चटप,
२०, ओंकार नगर,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. डी. दाबके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागपूर.

श्री. एकनाथ करंजेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांचेकडे मॅट्रिक एस.टी.सी. ट्रेंड शिक्षकांना १२०-२२० या वेतन श्रेणीनुसार मिळालेल्या थकबाकीचे सोबतच्या विवरण पत्रात माहिती पाठविण्याबाबत. माहितीचा कालावधी दिनांक १.१.१९८१ ते आतापर्यंतचा कालावधी व नमुना दिलेला आहे. सदरची माहिती पोष्टाच्या प्रमाणपत्राद्वारा ५/- रुपये तिकीट लावलेला लिफाफा अर्जासोबत पाठविण्यात येत आहे असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २९.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.९.२००९ रोजी देण्यात आलेला

... २

असून श्री. करंजेकर, माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांनी श्री. दे. न. चटप, सेवानिवृत्त केंद्र प्रमुख यांना दिनांक २५.९.२००९ ला दुपारी १:०० वाजेपर्यंत एस.टी.सी. ट्रेनिंगच्या संबंधात लाभ दिलेल्या शिक्षकांच्या देयकांच्या सत्यप्रती देण्यात याव्यात. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना दिनांक २५.९.२००९ रोजी पोष्टाने जी माहिती पाठविण्यात आली त्यामध्ये मॅट्रिक एस.टी.सी. ट्रेंन्ड शिक्षकांना १२०-२२० या वेतनश्रेणीनुसार थकबाकीचे विवरण बाबतची माहिती कार्यालयास मागितलेली आहे. परंतु कार्यालयीन रेकॉर्डची तपासणी केली असता एस. टी. सी. ट्रेंड शिक्षकांना लाभ दिल्याबाबत देयकांच्या प्रती आढळल्या नाहीत. जनमाहिती अधिकारी यांनी असे त्यांना कळविले आहे. तसेच मागितलेली माहिती ही संकलीत करावयाची असून संकलीत माहिती करुन देण्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये तरतुद नाही. सबब आपण मागितलेली माहिती देता येणार नाही असे अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने सुध्दा त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व देयकांची तपासणी केली असता तशाही प्रकारचे देयके आढळून येत नाही. मात्र देयक रजिष्टर व कॅशबुकच्या आधारे असल्यास तशी माहिती उपलब्ध करुन देता येईल. परंतु ही बाब जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अज्र मिळाल्याच अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते. माहिती संकलीत करुन देता येत नाही असे कळविले परंतु ती कशी देता येईल हे कळविले नाही. त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे त्यातही अधिनियमाचे तरतुदीचे पालन जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर देतांना केले नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा चौकशी सुनावणी करतांना कोणत्याही प्रकारची सखोल चौकशी केली नाही व निर्णय सुध्दा कारणासहीत केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध झालेले देयक रजिष्टर व कॅशबुकची स्वतः तपासणी करुन खात्री करुन घ्यावी. त्याकरिता त्यांनी कार्यालयीन कामकाजाचे वेळेतील तारीख व वेळ कळवून त्यावेळेस हजर राहून जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधल्यास जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संपूर्ण देयक रजिष्टर व कॅशबुक तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यातून जर थकबाकी दिल्याचे आढळून आले तर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८(१) प्रमाणे तक्रार करावी.

२) अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने योग्यरित्या माहिती उपलब्ध करुन दिली नसेल व तसे उत्तर दिले नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची आहे. त्याकरिता त्यांचेकडे स्वतंत्रपणे निर्णयाची एक प्रत पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा योग्यरित्या चौकशी केली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१३/२००९.**

श्रीमती लक्ष्मीबाई बेदरे,
आय.एम.ए. हॉलचें मागे,
चुन्नीलाल पटलेचे घराजवळ,
पार्वती घाटरोड, गोंदिया. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. सितारामजी अग्रवाल,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
श्री महावीर मारवाडी एज्युकेशन सोसायटी,
श्री महावीर मारवाडी प्राथमिक शाळा,
विठ्ठलनगर, गोंदिया.

श्री. रमेश काळबांधे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री महावीर मारवाडी प्राथमिक शाळा,
विठ्ठलनगर, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महावीर मारवाडी प्राथमिक शाळा, विठ्ठलनगर, गोंदिया यांचेकडे दिनांक १.९.१९९० ते ३१.७.१९९५ पर्यंतचा सेवाकाळ अर्जदाराच्या सेवाकाळात समाविष्ट करुन अर्जदारास दिनांक १.९.१९९० ते ३०.११.२००७ पर्यंत सलग सेवाकाळाचे सेवानिवृत्ती वेतन (४ वर्षे ११ महिण्याचे झालेल्या नुकसानीची सेवादुरुस्ती करुन) मिळण्याबाबत.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.८.२००९ रोजी आपणांस नेमकी कोणत्या कागदपत्राची माहिती हवी याबाबत स्पष्ट अर्थबोध होत नाही. तरी आपणास आवश्यक असलेल्या माहितीबाबत सविस्तर विवरण कळवावे असे त्यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रथम अपील अध्यक्ष/सचिव, श्री महावीर मारवाडी एज्युकेशन सोसायटी, विठ्ठलनगर, गोंदिया यांचेकडे दाखल केले. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे संस्था अध्यक्ष नसल्यामुळे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया हे असल्यामुळे दिनांक २५.९.२००९ रोजी अपीलकर्ती यांना कळविण्यात आले असे दिसून येते. मात्र त्यानंतर अपीलकर्ती यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे मान्य करता येत नाही. अपीलकर्ती यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे वेळोवेळी मागितलेली माहिती ही त्यांना देण्यात आलेली आहे. दिनांक ३.८.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना पुर्वी कोणत्याही प्रकारचा अर्ज मुख्याध्यापक यांचेकडे किंवा संस्थेकडे केलेला नाही व त्यामुळे त्याबाबतची कोणत्याही प्रकारची कार्यवाहीची माहिती सुध्दा देता येत नाही. त्यावर अपीलकर्ती यांनी स्वतंत्र अर्जाने त्यांना अपेक्षित असलेली सेवानिवृत्ती संबंधामध्ये अर्ज हा मुख्याध्यापक किंवा संस्थेकडे करणे संयुक्तिक राहिल व त्या अर्जाचे संदर्भात निर्णय करणे हे मुख्याध्यापक किंवा संस्था यांना सुलभ होईल. परंतु सदरच्या अर्जाचे संदर्भात त्यांना योग्य ते उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ती यांना जे उत्तर दिलेले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१८/२००९.**

श्री. राजेश हरीभाऊ सांगोळे,
द्वारा - प्रकाश पाटील, मोठा इंदोरा,
भीम चौक, नारा रोड, डॉ. रुघवानीच्या जवळ,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त - १,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. दिगंबर मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक दिनांक २२.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलात नवीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.८.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी अपीलमध्ये माहिती मागितली आहे

... २

ती मुळ अर्जात मागितली नव्हती. करिता अपीलकर्ता यांनी नवीन माहिती रितसर अर्ज करुन माहिती अधिकाऱ्यांकडे मागणी करणे आवश्यक आहे असा निर्णय देऊन अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२००९ रोजी सुध्दा नवीन अर्ज दाखल केलेला दिसून येतो व त्या अर्जाचे संदर्भात सुध्दा दिनांक २९.८.२००९ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय व उत्तर दिलेले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ६.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१५/२००९.**

श्री. देवराव नत्थुजी चटप,
२०, ओंकारनगर, पो. भगवाननगर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कामठी,
जि. नागपूर.

श्री. देशपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, कामठी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कामठी यांचेकडे दोन मुद्यांची माहिती प्रपत्रामध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.१०.२००९ रोजी माहिती मिळाली. माहिती मिळाल्यामुळे सुनावणी प्रकरण खारीज करण्याची विनंती करीत आहे. यापुढे मी कोणताही उजर करणार नाही असे अपीलकर्ता यांनी निवेदन राज्य माहिती आयोगाकडे सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९२०/२००९.**

श्री. भालचंद्र अनंतराव देशपांडे ,
प्लॉट नं. १६, मेडिकल कॉलनी,
एकात्मता ले आऊट, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स अनेक्स, सिताबर्डी,
नागपूर.

श्री. सुर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,
नागपूर शहर - २, सहकार भवन,
हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड,
नागपूर - ४४० ०१०. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. जे. के. ठाकूर, विभागीय उपनिबंधक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी गृह निर्माण संस्था, नागपूर यांचेकडे दिनांक २८.५.२००८ रोजी आपणास दि मेडिकल एम्पलॉईज को ऑप. हॉ.सो.लि. च्या बद्यल दिलेल्या तक्रारी (प्रत जोडली आहे) आपल्याकडून झालेल्या कारवाई बद्यल माहिती. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध

... २

झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय दिनांक २९.९.२००९ रोजी देण्यात आला असून सदर बाबतीत चौकशी करुन दिनांक ६.१०.२००९ पर्यंत अहवाल देण्यात यावा असा आदेश देण्यात आला व तसा आदेश हा दिनांक ६.१०.२००९ रोजी पारित करण्यात आला व अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००९ रोजी त्यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी दिशाभूल व हेतुपुरस्सर नियमबाहय मुदतीनंतर माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करण्यात आलेली नव्हती व तसे त्यांनी पोष्टाने दिनांक ९.३.२००९ रोजी कळविण्यात आले होते. त्याबद्यलची जावक नोंद वहीची नोंदी आयोगाचे निदर्शनास आणले आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक ९.३.२००९ रोजी तारीख जरी असली तरी त्यांना ती दिनांक २०.५.२००९ रोजी देण्यात आलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना पोष्टाने पाठविले होते. परंतु त्यांना मिळाले नाही म्हणून त्यांना पुन्हा प्रत देण्यात आली. यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती पाठविण्यात आली होते असाच निष्कर्ष काढावा लागतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणी कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांच्या तक्रारीवर चौकशी करुन प्रथम अपीलाचे निर्णयात आदेश देऊन माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३३/२००९.**

श्री. महेश चैतराम पाली,
प्लॉट नं. ३६६, टाँगा स्टँड,
धरमपेठ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
वर्धा.

श्री. एच. एम. लोखंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्रीमती सुलोचना निघडे, तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कार्यालयात गडरिया जातीला १४ फेब्रुवारी २००१ पासून आजपर्यंत किती जाती प्रमाणपत्र देण्यात आले याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नियमाप्रमाणे स्पीड पोष्टाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.७.२००९ रोजी पारित करण्यात आला असून प्रकरणात कागदपत्रे पाहता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जिल्हाधिकारी, वर्धा कार्यालयातून उपविभागीय अधिकारी यांना दिनांक १७.४.२००७ च्या पत्रान्वये दिनांक १४.२.२००१ पासून गडरिया भ.ज.क. चे जातीचे आतापर्यंत एकूण ३२ प्रकरणे या कार्यालयातून निर्गमित केले म्हणून मी गडरिया जातीला भ.ज.क. मध्ये जे जाती प्रमाणपत्र दिले ते महाराष्ट्र शासन जी.आर. ज्या आधारावर भ.ज.क. चे जाती प्रमाणपत्र दिले आणि ही जात कोणत्या अनुक्रमांकावर आहे अशी माहिती मागितली होती. परंतु त्यांना चुकीची माहिती दिली व त्याकरिता त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, गडरिया व गडारिया अशा २ जाती जरी असल्या तरी एकच जाती आहेत. तसेच गडरिया अ.क्र. ३२८ वर या शासन निर्णयात सुध्दा आहे. तसे इंग्रजी मध्ये गडरिया व गडारिया सारखेच लिहण्यात येते त्यामुळे हा सर्व गैरसमज झालेला दिसून येतो. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये तपशीलवार माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये निर्णय केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास गडरिया जातीच्या संदर्भातील जी.आर. आणला. परंतु त्यावर जनमाहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी शासन निर्णयाच्या साक्षांकित प्रती देण्यात आलेल्या असल्याने व गडरिया ही जात एकाचवेळी दोन जातींचे प्रवर्गात नमुद असल्याने त्यावर भाष्य करण्याबाबतचा अधिकार या कार्यालयाला नसल्याने कलम २० अन्वये शास्ती लादण्यात येऊ नये अशी विनंती आयोगाकडे केलेली आहे. अपीलकर्ता यांच्या अर्ज सुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयात आला नव्हता असेही त्यांनी आयोगाचे पुढे निदर्शनास आणले. अर्जदाराने गडरिया ही जात कोणत्या क्रमांकावर आहे. उपविभागीय अधिकारी यांना माहिती मागितलेली आहे. उपविभागीय अधिकारी यांनी साक्षांकित करुन दिलेली असल्यामुळे उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न नाही. असे असले तरी इंग्रजी भाषेतील माहितीची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत संबंधित शासन निर्णयाची प्रत ही इंग्रजी भाषेतील उपलब्ध करुन देण्यात यावीत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३०/२००९.**

श्री. सुनिल रामराव गोरले,
द्वारा - श्री. अविनाश चौधरी,
कमरुद्दीन ले आऊट, गोरेवाडा रोड,
बोरगांव, नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (पदुम)
कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व
मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व
मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असुन त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. सदरच्या अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी हे हजर झाले नसल्यामुळे व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केली नसल्यामुळे आयोगाचे नोटीसचा अवमान केलेला आहे व ते शास्तीस पात्र आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचे सुनावणीचे संदर्भातील कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नसल्यामुळे त्यांना समज देणे आवश्यक आहे.

... २

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे विधानमंडळ सचिवालयातील कामकाजाबाबत (लक्षवेधी सुचनेचे अनुषंगाने चर्चा व त्याअनुषंगाने दिलेले आश्वासने व त्याची पुर्तता याबाबतचे पाळावयाचे अधिकृत नियमाबाबत) सोबत जोडलेल्या विवरणपत्र - १ नुसार ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही किंवा त्याबाबत कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे आयोगाकडे सादर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ५.६.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती समाधानकारक नसून दिशाभूल करणारी व मोघम आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये मंत्री महोदयाचे दिनांक २९.१२.२००८ चे पत्रानुसार झालेल्या कार्यवाहीचे दस्ताऐवज मिळावेत अशी मागणी त्यांनी केली होती. मुद्या क्रमांक २ व ३ च्या संदर्भामध्ये कोणतीही कार्यवाही केलेलीच नाही असे कळविले आहे. उत्तराचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरणे आवश्यक आहे. सदर नस्ती वरिष्ठ स्तरावर सादर केलेली असल्यामुळे या नस्तीचे दस्ताऐवज उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही याबद्यल दिलगीर आहोत असे कळविले असल्यामुळे त्या संदर्भामध्ये सदरची नस्ती कोणाकडे सादर केली व याबद्यलची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकारात माहिती मागितल्यास तीच नस्ती काढून देऊन माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक असते. वरिष्ठ स्तरावर दाखल केलेली असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही हे म्हणणे योग्य नाही व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली पाहिजे असे त्यांनी सांगितले. जनमाहिती अधिकारी हे हजर नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य वाटते. त्यामुळे अपीलकर्ता यांना वरिष्ठ स्तरावर सादर केलेली नस्तीचा तपशील उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून, अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये दिलेल्या उत्तरातील तपशील हा कागदपत्राचे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) जनमाहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस हजर झाले नाही किंवा कोणत्याही प्रकारचा त्यांनी आयोगास संपर्क साधला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई यांनी करावयाची आहे व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३४/२००९.**

श्री. घनश्याम विठोबाजी गौरकर,
गौरकर निवास, माकडेनगर,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वन्यजीव कार्यालय,
बालाघाट रोड, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक,
नागझिरा अभयारण्य,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. वाय. एस. जांगळे, वनपरिक्षेत्र अधिकारी, नागझिरा हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. के. एफ. डोंगरे, सहाय्यक वनसंरक्षक, नागझिरा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ए. सी. एफ. अभयाअरण्य नागझिरा रेंज, ता. साकोली, जि. भंडारा यांचेकडे थकीत पगाराच्याबाबत चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाबद्यल माहिती एकूण ७ मुद्यांवर त्यांनी मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.१०.२००९ रोजी देण्यात आला असून त्यामध्ये मुद्या क्रमांक १ ते ७ चे माहिती पैकी मुद्या क्रमांक ७ व मुद्या क्रमांक ५ व ६ व २ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व मुद्या क्रमांक १, ३ व ४ ची

... २

माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय साकोली/विभागीय कार्यालय गोंदिया येथे उपलब्ध नसल्यामुळे पुरविण्यात आली नाही. तरी आपण सहाय्यक वनसंरक्षक तथा अपीलीय अधिकारी, नागझिरा स्थित साकोली यांचेशी संपर्क करुन आपण कळविलेल्या तारखेस रेकार्ड व फाईल्स पाहण्याकरिा साकोली येथील सहाय्यक वनसंरक्षक कार्यालयात येण्याची कृपा करावी. जी कागदपत्रे आपणास पुरविण्यात आली नाहीत त्याबाबत कार्यालयातील संपूर्ण संबंधित दस्ताऐवज आपणास तपासणी करीत उपलब्ध करुन देण्यात येईल. सहाय्यक वनसंरक्षक, नागझिरा यांचे कार्यालयातील दुरध्वनी क्र. ०७१८६ २३६८१० वर आपल्या येण्याची तारीख व वेळ कळवावे असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती कां दिली त्यांना असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती ही जुनी आहे व ती डी.सी.एफ.च्या कार्यालयात उपलब्ध असते असे नाही ती विभागीय कार्यालयात पत्र असतात व त्यामुळे अपीलकर्ता यांना ती माहिती मुदतीत दिली आहे व विभागीय कार्यालयातून उपलब्ध झाल्यावर दिलेली आहे व उर्वरित माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे संपूर्ण दस्ताऐवज तपासणीकरिता व पाहण्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविले आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणतीही अडचण सुध्दा नाही. परंतु ती माहिती जुनी आहे व इतर कार्यालयामध्ये आहे यावरुन अपीलकर्ता यांना काही माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व उर्वरित माहितीकरिता कागदपत्रांची तपासणी करण्यास कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३५/२००९.**

श्री. वामनराव राघोबाजी गाणार,
रुम क्रमांक ८, नागपूर सुधार प्रन्यास बिल्डींग,
अजनी चौक, वर्धा रोड, पो. विवेकानंद नगर,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

श्री. फेंडारकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर ग्रामीण, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी तहसीलदार, नागपूर ग्रामीण तथा जनमाहिती अधिकारी यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधारण टपालाने पाठवावी असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकता्र यांना माहिती मिळाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००९ प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. अपील क्रमांक २४८०/२००७ आदेश पारित दिनांक ३१.१२.२००८मध्ये त्यांना हवी असलेली

... २

माहिती त्यांना मिळाली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे. द्वितीय अपीलाचे निर्णयामध्ये माझे समोर सत्यप्रत देण्यात आली असून त्यांनी ती स्विकारली. आता याबाबत अपीलकर्त्यांची कोणतीही तक्रार राहिली नाही. तरी सुध्दा उत्तरवादीस हयाबाबत जाणीव करण्यात आली की, यापुढे अशा प्रकारची दिरंगाई लहानसहान कामात व्हावयास नको व यापुढे अशा प्रकारे दिरंगाई होणार नाही असे त्यांनी कबूल केले. वरील सर्व बाबींचा विचार करता अपीलकर्ता यांचें समाधान झाले असून अपील गुणवत्तेवर निकाली काढण्याचा त्यांचा आग्रह नाही. त्यामुळे हे अपील निकाली काढण्यात येत आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी करावयाची आहे. परंतु त्यांना नेमून दिलेल्या तारखेवर ते हजर राहत नसल्याने व कार्यालयाने वेळ मागितलेली आहे व त्यामुळे सदरच्या प्रकरणी कार्यवाही करण्यास विलंब झाला आहे. प्रकरणात झालेल्या कार्यवाहीबाबत आपण प्रमाणित प्रत प्राप्त करुन घेऊ शकता असे कळविले आहे. त्यामुळे त्यांना माहिती न उपलब्ध करुन देण्याचा कोणत्याही प्रकारे माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येत नाही. तसेच अपील क्रमांक २४८०/२००७ मध्ये दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ९.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४०/२००९.**

श्री. किशोर सोविंदाजी कुथे,
मु. पो. ता. लाखनी, वार्ड क्र. ६,
आदर्शनगर मातोश्री निवास,
जि. भंडारा - ४४१ ८०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कृष्ण मोहन,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
नागपूर.

श्री. एस. व्ही. अलूरवार,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नियोजन),
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय, नागपूर यांचे कार्यालयात दिनांक ७.१०.२००८ व दिनांक १७.१०.२००८ ची लेखी तक्रार दोन्ही तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक १२.११.२००८ रोजी पुन्हा झेरॉक्स दिल्या. त्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच मौका चौकशी केली आहे काय ? केली असल्यास मौका चौकशीची साक्षांकित केलेली प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे देण्यात यावी असे नमुद केलेले आहे.

... २

अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) यांनी अपीलकर्ता यांना आपण मागणी केलेली माहितीच्या संबंधात उपवनसंरक्षक, भंडारा यांचेकडून सदर प्रकरणासंबंधी चौकशी सुरु असल्याने माहिती पुरविता येऊ शकत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी अद्याप उपवनसंरक्षक, भंडारा यांनी केलेली नाही. परंतु याबाबत तक्रारीची चौकशी करा व त्यांना माहिती मिळावी असे त्यांनी सांगितले. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करावी अशा प्रकारचे आदेश आयोगास देता येत नाही. अर्ज करते वेळेस जी वस्तुस्थिती उपलब्ध असते त्याबद्यलची माहिती उपलब्ध होते व त्याबद्यलची माहिती त्यांना उपलब्ध झालेली आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला असता तर अपीलकर्ता यांना अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली असती. प्रथम अपीलात अपीलकर्ता यांना तक्रारीच्या संदर्भामध्ये अधिकची माहिती विचारलेली आहे. परंतु प्रथम अपीलामध्ये अधिकची माहिती विचारता येत नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही. मात्र प्रथम अपील हे दिनांक २८.४.२००९ रोजी दाखल झाले आहे व प्रथम अपीलाचा निर्णय ३१.३.२००९ मध्ये दिलेला आहे. तरी सदरच्या प्रकरणामध्ये अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा आदेश करणे आवश्यक आहे. त्याकरिता सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे निर्णयाकरिता परत पाठविणे संयुक्तिक राहिल.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.४.२००९ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपीलात निर्णय होण्यासाठी सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांचे कार्यालयास सुनावणीसाठी व निर्णयासाठी परत पाठविण्यात येत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दोन्ही पक्षकारांच्या उपस्थित घेऊन त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने निर्णय द्यावा. त्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना नोटीस पाठवून, तारीख निश्चित करुन हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत प्रथम अपीलाचा निर्णय करावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ९.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८९५/२००९.**

श्री. उदय देवरावपंत गोहोकार,
४३/बी, शिवाजीनगर, हिल रोड,
नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. ए. खासबागे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा,
जि. यवतमाळ.

श्री. एन. आर. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा,
जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा, जि. यवतमाळ यांचेकडे गणेशपूर ते मुर्धोनी (रेल्वे क्रॉसिंग पासून सुमारे २.५ कि.मी. मुर्धोनीच्या दिशेने रस्त्याच्या कामाबद्दल (वणी विभाग) सदर रस्त्याच्या नुतनीकरण कामाचा कालखंड (अंदाजे २००५-२००९) एकूण ८ मुद्याची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.४.२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरिता रुपये ४३/- चा भरणाकरावा असे कळविलेले दिसून

येते. त्यात माहिती ९ प्रती असे नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.६.२००९ रोजी देण्यात आला असून अपील अर्जदारास करारनाम्याची प्रती पुर्णपणे देण्यात यावी. कंत्राटदाराने दोन वर्षापासून काम रेंगाळत ठेवले आहे. त्याकरिता कंत्राटदारास काम पूर्ण करण्याकरिता देण्यात आलेल्या पत्राच्या प्रती तसेच वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्या नुकसान भरपाई प्रस्तावाच्या प्रती अपील अर्जदारास पुरविण्यात यावे. तसेच अधिक्षक अभियंता यांनी मंजूर केलेली नुकसान भरपाई आदेशाची प्रत अपील अर्जदारास पुरविण्यात यावी. तसेच मुद्दा क्रमांक ३ मध्ये काम अर्धवट ठेवल्याने कंत्राटदारावर या कार्यालयाने वेळीच कार्यवाही केली असून कंत्राटदारास पत्रव्यवहार केला व त्याबद्यलचा आदेश दिलेला आहे. परंतु त्याहीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस असे सांगितले की, ज्या रस्त्याच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे त्या संदर्भात आज अत्यंत दुरावस्था झालेली आहे व त्या रस्त्यांचे संदर्भात दिनांक २६.५.२००९ रोजी सर्व ग्रामस्थांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडे तक्रार केलेली आहे व त्यामुळे सदरची माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतु माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी त्यांना उपलब्ध करुन दिलेली असून जी कागदपत्रे मागितली ती कागदपत्रे देण्यात आलेली नाही. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा आदेश देऊन सुध्दा त्यांना करारनाम्याची प्रत व त्या कामावर कोण कोण देखरेख करीत होते त्या संदर्भात अजुनही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांना या कामाबाबत काही माहिती नाही असे दिसून येते ते लिपिकाकडे पाहत होते. त्यामुळे त्यांनी स्वतःची जबाबदारी पारपाडली नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ३० दिवसात कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु ती अपूर्ण उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, काही कंत्राटदाराचे संदर्भात जी कार्यवाही करण्याचे संदर्भात जे नियम आहेत त्यासंबंधाने रस्त्याचे कामही रखडले व काम होत नाही. त्याबद्यल आयुक्त कोणत्याही प्रकारचा निर्णय देऊ शकत नाही. त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीवरुन सक्षम अशा

... ३

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्याबद्दल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, चुकी झालेली आहे व दिलगीरी व्यक्त करीत आहे. त्यानंतरही अपीलकर्ता यांनी करारनाम्याची प्रत घेतली नाही. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही ही बाब मात्र स्पष्ट होते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीचे बद्दल सुध्दा त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. पुन्हा पुन्हा त्यांनी चुक झाली असे त्यांनी आयोगाकडे सांगितले त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २५.३.२००९ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध झाली नाही ती करारनामा प्रत व संबंधित कामावर ज्या अधिकाऱ्यांची देखभाल करण्याची जबाबदारी होती त्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नावे ही व इतर माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्यामुळे व जी माहिती विलंबाने दिली ती सुध्दा पुर्ण दिली नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे लादण्यात येत असून त्यांच्या म्हटलेल्या परंतुकाप्रमाणे ऐकून घेतले आहे. सदरची शास्ती ही ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

३) सदरच्या शास्तीची वसुली ही मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती विभाग, बांधकाम भवन, कॅम्प एरिया, अमरावती यांनी करावयाची असून त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत रजिष्टर पोष्टाने स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४७/२००९.**

श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे,
ग्रामसेवक,
पंचायत समिती, अमरावती - ४४४ ६०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. घोटेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी उपसचिव,
राज्य माहिती आयोग,
नागपूर खंडपीठ, नागपूर.

श्री. शहारे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक,
राज्य माहिती आयोग,
नागपूर खंडपीठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ यांचेकडे एकूण ३ अपील क्रमांक ४९९/२००७, अपील क्रमांक ७७२/२००७ व अपील क्रमांक २१२७/२००७ मधील दिलेल्या निर्णयाचे संदर्भातील अनुपालन अहवालाची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.६.२००९ रोजी रुपये ९/- चा खर्चाचा भरणा करावा असे कळवून तसे मुद्या क्रमांक १, २ व ३ च्या संदर्भामध्ये सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १०.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा माहिती अधिकारी यांनी

... २

आपल्याला दिलेली माहिती योग्य आहे या कारणास्तव प्रथम अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३) अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या अपीलामध्ये जनमाहिती अधिकारी यांना शास्तीचे आदेश झालेले होते व शास्तीची अंमलबजावणी करुन ३ महिन्यामध्ये अनुपालन अहवाल सादर करावा असे आदेश दिले होते व त्यामुळे त्यांनी ३ महिन्याची माहिती मागितलेली आहे. परंतु ३ महिन्यानंतर अनुपालन अहवाल आला नाही व सदरच्या अधिकाऱ्यांना स्मरणपत्र दिलेले आहे असे त्यांना कळविले आहे. याचा अर्थ आयोगाचा आदेश सुध्दा पालन होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे हे खरे असले तरी त्या संबंधित अधिकाऱ्यांवर अनुपालनाची जबाबदारी दिली असते. त्यांनी आयोगाचे आदेश न पालन केल्यास त्यांचेवर शास्ती करण्याची कोणतीही तरतुद अधिनियमात नाही. त्याबाबत संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी सचिव/प्रधान सचिव/शासनाकडे आयोगाची माहिती त्यांच्या दरवर्षाचे अहवालात पाठविली असते व ती त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी असते व त्यामुळे आयोग हे स्मरणपत्र पाठवित असते व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४६/२००९.**

श्री. रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा,
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
होम्योपॅथीक मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल,
निमझरी रोड, शिरपूर, जि. धुळे - ४२५ ४०५.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
होम्योपॅथीक मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल,
निमझरी रोड, शिरपूर, जि. धुळे - ४२५ ४०५. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, होम्योपॅथीक मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल यांचे वतीने डॉ. महेंद्र गौशाल, जेष्ठ प्राध्यापक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, होम्योपॅथीक मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल, शिरपूर, जि. धुळे यांचेकडे डॉ. कु. अश्विनी साईनदास वंजारी हिची इंटरशिप पूर्ण झालेल्या कालावधीची माहिती. माहितीचा कालावधी दिनांक १.९.२००६ ते दिनांक ३१.८.२००७ पर्यंत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अभिलेखाचा खर्चाचा भरणा दिनांक ३.१०.२००८ रोजी रुपये २९/- पाठवावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु दिनांक २३.१०.२००८ रोजी आपण नमुद केलेल्या अर्जातील माहिती देण्यात येऊ नये असा विनंती अर्ज डॉ. सौ. अश्विनी रमेश राठोड

... २

(डॉ. अश्विनी साईनदास वंजारी) यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे केलेला असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व जे रुपये २९/- ही मनीऑर्डर द्वारे परत करण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सदरची मागितलेली माहिती ही कोणत्याही प्रकारची गोपनीय माहिती नाही. तर ती एका प्रशिक्षणार्थीची डॉक्टरची माहिती मागितलेली असल्यामुळे ती साहित्याचे स्वरुपात माहिती असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याची हरकत नसावी. त्याबाबत उपलब्ध होणाऱ्या कागदपत्रांचा गैरवापर करुन फसवणूक करण्यात येईल असे दिसून येत नाही कारण ती सार्वजनिक माहिती आहे. त्रयस्थ पक्ष डॉ. अश्विनी रमेश राठोड यांनी प्राचार्य यांचेकडे दिलेले उत्तर माझे लग्नानंतर माझ्या नवऱ्याने मला फसवून लग्न केले हे लक्षात आल्यावर मी त्यांच्या विरुध्द केस दाखल केली आहे. त्यामुळे तो माझ्या कागदपत्रांचा गैरवापर करुन माझ्या आयुष्याला वरबाद करण्याच्या मार्गावर आहे. म्हणून त्याला कृपा करुन कोणतेच कागदपत्र देऊ नये अशी विनंती केलेली दिसून येते. परंतु असे असले तरी प्रशिक्षणार्थीची कालावधीतील माहिती ही कोणत्याही प्रकारची वैयक्तिक माहिती होत नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन द्यावी.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ९.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३९/२००९.**

श्री. प्रशांत शटलकर,
कॅथेड्रल कम्पांऊड,
वी.सी.ए., समोर, सदर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती रचना सिंग,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
सेंट उर्सुला हायस्कूल, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. राऊत, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे तीन मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर प्रकरणी अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे लेखी निवेदन दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास सादर केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ९.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३२/२००९.**

श्री. मोहम्मद ईकबाल,
द्वारा - इलेक्ट्रीक बिल कलेक्शन सेंटर,
कब्रस्तान रोड, मोमीनपूरा, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विजयकांत पानबुडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक कामगार आयुक्त,
भोसले चेंबर्स, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. बा. स. गवई,
जनमाहिती अधिकारी तथा
सरकारी कामगार अधिकारी,
भोसले चेंबर्स, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपीलकर्ता हे सुनावणीचे दिवशी गैरहजर होते त्यानंतर ते हजर झाले आहेत. त्यावेळेस त्यांनी आजारी होते असे कारण दिलेले आहे

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अप्पर कामगार आयुक्त, नागपूर यांचे कार्यालयात दिनांक १६.४.२००८ लेखी तक्रारीवर काय कार्यवाही झाली अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.८.२००८ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.४.२००८ रोजीचा पत्रान्वये ५ आस्थापनावर दुकाने निरीक्षक यांनी आजतागायत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

... २

त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ३.९.२००९ रोजी निर्णय दिलेला असून राज्य जनमाहिती अधिकारी, नागपूर यांनी ज्या तारखेला आपणास माहिती उपलब्ध करुन दिली त्या तारखेपासून विहित मुदतीत आपण अपील अर्ज सादर केलेला नाही. तसेच आपल्या अपील अर्जासोबत आपण अपीलकारास वाजवी कारणामुळे वेळेत अपील दाखल न करण्याबाबतचे प्रार्थना पत्र देखील सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे कारण हजर झाल्यावर असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रार अर्जाचे संदर्भात कार्यवाही झाली नाही व त्याकरिता आयोगापुढे सदरची ५ दुकानांचे संदर्भामध्ये फोटोप्रत सादर केलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही तक्रारीच्या संदर्भात कार्यवाही करण्याचे संदर्भात आदेश देता येत नाही. माहितीचा अर्ज दाखल केला जातो त्या ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध असल्यास ती माहिती उपलब्ध करुन देता येते. त्यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. सदरच्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा न्यायालयामध्ये तक्रार करणे आवश्यक आहे व त्यातून त्यांच्या तक्रारीची चौकशी होऊ शकेल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ९.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५८/२००९.**

श्री. माधव गोविंद कोटस्थाने,
प्लॉट नं. ४, जुन्या आर.टी.ओ. ऑफीसमागे,
प्रतापनगर, वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गो. आ. मेंगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ, बांधकाम संकुल,
बंगला क्र. ३९/१, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. आर. एम. होतवानी,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी यांचेकडे सन २००८-२००९, २००९-२०१० या कालावधीतील सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी बाबत काम वाटप समिती व निविदा सुचना क्र. ७ बाबत एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.८.२००९ रोजी अपीलकर्ता

... २

यांना काम वाटप यादी सुबेयो अंतर्गत वर्ष २००८-२००९, २००९-२०१० व ७/२९९९-१० ची एकत्रितःकामे लेखाशिर्षानुसार एकूण १४ पाने उपलब्ध करुन दिलेली आहेत. सदरच्या उत्तराचे अनुषंगाने उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी विधानसभा निवडणुकीमुळे घेता आली नाही व त्यानंतरही प्रशासकीय कामकाजामुळे घेता आली नाही असे अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक ६.११.२००९ रोजी अपीलाचा निर्णय देण्यात आलेला आहे व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती माहिती अपूर्ण आहे व असंदिग्ध आहे. त्यातून अर्थबोध होत नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांना पुर्णपणे जशी आहे तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन दिली त्यातून विसंगती लक्षात आणली असता सदरची माहिती ही बजेट बुकमध्ये दिलेली आहे. त्यातून अपीलकर्ता यांचे शंकासमाधान निरसन झालेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी एकत्रित काम कां नाही म्हटले त्याबद्यल शासन निर्णय पाहतो व २६ कामाचे संदर्भामधील काढलेल्या टेंडरचा खुलासा आवश्यक आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणातील घेतलेला निर्णय अपेक्षित नाही. माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते. माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले. प्रथम अपीलाचे सुनावणीचे संदर्भात त्यांना जी अपील सुनावणीचे पत्र पाठविले आहे ती त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी पाठविले आहे. त्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे अधिक्षक अभियंता यांनी आदेश कळविले. त्यावर सुनावणीची नोटीस पाठवितांना कमीत कमी १५ दिवसांचे अंतराने पाठवावे अन्यथा सुनावणीचे दिवशी नोटीस पाठवावी हे उपस्थित राहू नये हे गृहीत घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अधिक्षक अभियंता यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन दिलेली आहे अशा प्रकारची माहिती तयार करुन देता येत नाही. मात्र तयार करुन दिल्यामुळे स्पष्टता दिसून येते व त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांचेकडे जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्याबद्यलचे शंकानिरसन झाले आहे परंतु त्यांना अधिक त्यांना माहिती पाहिजे असल्यामुळे व त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांनी स्वतः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाची तारीख व वेळेत संपर्क साधून माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५६/२००९.**

श्री. देवाभाऊ भगवान ऊराडे,
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जि. चंद्रपूर.

श्री. एम. डी. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केला होता व त्यात श्री. पी. साळवे, अधिक्षक, पंचायत समिती, सिंदेवाही यांची माहिती मागितलेली होती. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२००६ रोजी सुध्दा श्री. पी. साळवे,

अधिक्षक यांची जातीचे वैधता प्रमाणपत्राची व सेवापुस्तकाची झेरॉक्स, कनिष्ठ सहाय्यक, जेष्ठ सहाय्यक, अधिक्षक पदाचे नियुक्तीचे आदेश मागितलेली दिसून येते. त्यावर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ९.४.२००७ रोजी झालेली आहे. सदरचा अपील अर्ज पुर्णतः नामंजूर करण्यात येत आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी $२^1/_2$ वर्षानंतर माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे हे अर्थातच मुदती बाहेर आहे व त्याकरिता विलंबाचे संदर्भात कोणताही खुलासा केलेला नाही व त्या परिस्थितीतही अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. बयाण लिहून देणार नामे श्री. एम. डी. मेश्राम, माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही, जि. चंद्रपूर बयाण लिहून देतो की, अपीलकर्ता अर्जदार श्री. डी. बी. ऊराडे, विस्तार अधिकारी (पंचायत) हे या कार्यालयात पंचायत समिती, सिंदेवाही रुजू झाल्यापासून श्री. साळवे, अधिक्षक, पंचायत समिती, सिंदेवाही यांचे विरोधात वागत होते. म्हणूनच त्यांनी श्री. पी. वाय. साळवे, अधिक्षक यांचे सेवाविषयक बाबींची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागविली होती. संबंधित अर्जदारांनी यापुर्वी सुध्दा दुसऱ्यांचे नांवे माहिती मागविली आहे हे श्री. बांबोडे, ग्रामसेवक, मु. हळदा, ता. ब्रम्हपूरी यांचे नांवे अर्ज केल्याचा पुरावा आहे. अपीलकर्ता अर्जदार यांनी दिनांक २७.९.२००६ ला सुध्दा तीच माहिती मागविली आहे. अर्ज दुसरा असला तरी विषय एकच आहे. त्या अनुषंगाने अर्जदारास माहिती दिनांक ६.११.२००६ रोजी पुरविण्यात आलेली आहे. अर्जदाराचे यावर समाधान न झाल्याने पुनःश्च दिनांक ६.११.२००९ रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. कारण नसतांना माहिती मागवून पुरविण्याची विनंती केली आहे. माहिती न मिळाल्याने अपील दाखल केलेली आहे. अर्जदाराने मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध दस्ताऐवज सेवापुस्तकाची संपूर्ण छायाप्रत व नियुक्ती आदेशाच्या प्रती संबंधित अर्जदारास पुरविण्यात आलेल्या आहेत. मात्र जातीचे प्रमाणपत्र जात वैधता प्रमाणपत्र, प्रथम नियुक्ती आदेशाची प्रत या कार्यालयात उपलब्ध नसल्याने पुरविता येऊ शकलेले नाही. याबाबत इतर कार्यालय तसेच वरिष्ठ कार्यालयात तसेच

... ३

श्री. साळवे, अधिक्षक यांचे नांवे वारंवार पत्रव्यवहार करुनही काही फायदा झालेला नाही. माहिती उपलब्ध करुन देण्यात माझा काहीही दोष नाही. यावरुन अपीलकर्ता यांचे अपील हे सार्वजनिक व्यापक हिताकरिता नसल्यामुळे ते स्वहिताकरिता आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५७/२००९.**

श्री. रामचंद्र देवरावजी रासेकर,
पांढरपौनी, ता. राजूरा,
जि. चंद्रपूर - ४४२ ९०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. एस. मेश्राम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
राजूरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांचेकडे मौजा पांढरपौनी येथील दिनांक २९.१.१९८८ रोजी वाटप केलेल्या गावठाणाचे संपूर्ण दस्ताऐवज मिळण्याबाबत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी आज सुनावणीस येऊ शकत नाही व उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी येऊ नका व स्वतः उपविभागीय अधिकारी हे हजर झालेत. यावरुन अपीलकर्ता यांचा अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना आपल्या अर्जात नमुद केलेली मौजा पांढरपौनी

... २

येथील मा.क्र.६/एल.एन.ए.-२२/१९८६-८७, दिनांक २९.१.१९८८ चा अभिलेखागारात व संपूर्ण रजिष्टरला शोध घेतला असता सदर प्रकरण जमा झाल्याची नोंद रजिस्टरला नाही. तसेच प्रकरण अभिलेखागारात उपलब्ध नसल्यामुळे आपण मागितलेली माहिती आपणाला पुरविता येत नाही. तरी सदर माहिती मिळण्याबाबत आपण उपविभागीय अधिकारी, राजूरा यांचे कार्यालयात शोध घेऊन प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ११.८.२००९ रोजी तहसीलदार, राजूरा यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नाही त्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविले व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मात्र त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देतात त्यामुळे अर्जदारास मात्र कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध होत नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, सदरची माहिती ही तहसीलदार, राजूरा व उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्या अभिलेखागारात यांच्याकडेच असल्यामुळे अभिलेखागार यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी रेकार्ड रुमला संपूर्ण रजिस्टरला शोध घेतला असता सदर केसची नोंद रेकॉर्ड रुमच्या रजिष्टरला नाही व सदर केस रेकॉर्ड रुमला जमा झाली नाही. तरी सदर प्रकरण मा.उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात शोध घ्यावे. त्यावरुन उपविभागीय अधिकारी यांनी सुध्दा शोध घेतला असता सदरच्या प्रकरणी माहिती मिळून येत नाही असे उपविभागीय अधिकरी यांनीच सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे होते की, संबंधित गावामध्ये विशिष्ट भुखंडावर बांधकाम होत नाही व त्यावर कोणत्याही प्रकारची चौकशी होत नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ प्रमाणे तक्रार करावी व त्या तक्रारीवर चौकशी करुन त्याबाबत माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येऊ शकते. असे असले तरी सदरची माहिती ही अभिलेखागारातून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी सदरच्या नस्तीचा कसून शोध घेऊन सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.६.२००९ रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कसून शोध घेऊन नस्ती उपलब्ध झ ाल्यास विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७३/२००९.**

श्री. उदाराम लक्ष्मणराव डेकाटे,
प्रेमनगर, झेंडा चौक, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

सौ. आशा प्रकाश जडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
साईबाबा हायस्कूल, नर्मदा कॉलोनी,
काटोल रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांचेवतीने श्री. सुधीर मालोदे, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. के. टी. चौधरी, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक, साईबाबा हायस्कूल, नागपूर यांना शिक्षक व शिक्षकेत्तर नियुक्तीची, वेतनेत्तर अनुदानाची माहिती सन १९८४ पासून शाळा सुरु झाल्या पासूनची माहिती साक्षांकित प्रत मिळण्याबाबत अर्ज. त्याकरिता अपीलकर्ता यांनी ३ मुद्यांमध्ये तपशीलात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करावी असेही नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक २५.३.२००९ रोजी दुसरा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु १ अर्ज त्यावर प्रथम

... २

अपील व त्यानंतर द्वितीय अपील अशी अधिनियमाची तरतुद असल्यामुळे २ अर्ज व प्रथम अपील व द्वितीय अपील त्यामुळे दुसऱ्या अर्जाचा विचार केलेला नाही. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी असे सांगितले की, त्यांना दिनांक २८.४.२००९ रोजी त्यांच्या शाळेशी अथवा संस्थेशी किंवा कर्मचाऱ्यांशी तसेच पालक, विद्यार्थ्यांशी आपला सुतराम संबंध नसतांना आमच्या शाळेबद्यल आपल्याला माहिती आपल्याला माहिती मिळविण्याचे काय प्रयोजन आहे हे स्पष्ट दिलेले नाही. तसेच आमचा संपूर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग शालेय परिक्षा, उत्तर पत्रिका तपासणे, मुदतीचे आंत निकाल लावणे, शासकीय व कार्यालयीन कामात व्यत्य आहे. अशा स्थितीत प्रयोजन नसलेल्या कार्यासाठी विनाकारण वेळ वाया घालणे योग्य नाही. अर्थात जाणून बुजून केवळ त्रास देण्याचे हेतुने हे आपण करीत आहात अशी शंका येते. शाळेच्या सुरळीत चाललेल्या व्यवस्थापन व प्रशासकीय कार्यात विनाकारण कायद्याचा दुरुपयोग करुन व्यत्यय आणण्याचाच हा प्रकार आहे. तरी आपण या अर्जामागील आपला माहिती मिळविण्याचा हेतु सविस्तर स्पष्ट करावा. तसेच आपला या शाळेशी असलेला संबंध स्पष्ट करावा आणि माहितीच्या अभावी आपली काय हानी होत आहे हे सुध्दा स्पष्ट करावे. अन्यथा आपण जाणून बुजून त्रास देण्याचे उद्येशाने कायद्याचा दुरुपयोग करीत आहात याबद्यल आपणांवर कायदेशीर फौजदारी व दिवाणी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले आहे. तोंडी युक्तिवाद करतांना सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचे वकील, श्री. सुधीर मालोदे यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता हे बाबा रघुनाथस्वामी हायस्कूल या संस्थेचे अध्यक्ष आहेत व त्या संस्थेमध्ये वाद आहे व त्यादृष्टिने त्यांनी संस्थेच्या संदर्भात माहितीची मागणी करीत आहेत. दोन्ही संस्थेचा संबंध वास्तविक काहीही नाही. परंतु त्यांत माहितीची त्यांना कोणत्याही प्रकारे आवश्यकता नसल्यामुळे तसेही जुनी ही १९८४ पासून माहिती मागत असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यता नाही. तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी त्याच वेळेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहे व अतिशय व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली आहे असे कळविले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या अर्जातून

माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली आहे. त्यामुळे सदरच्या माहितीच्या संबंधामध्ये अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध असेल त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत मागितलेल्या माहिती पैकी उपलब्ध झालेल्या माहितीची छायांकित प्रती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७२/२००९.

श्री. उदाराम लक्ष्मणराव डेकाटे,
प्रेमनगर, झेंडा चौक, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. डी. आर. दमके,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
बाबा रघुनाथस्वामी हायस्कूल,
राजीव गांधीनगर, जुना कामठी रोड,
नागपूर - ४४० ०१७. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. के. टी. चौधरी, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बाबा रघुनाथस्वामी हायस्कूल, नागपूर यांचेकडे नागपूर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप.बँक, शाखा गांधीबाग, नागपूर येथील खाता क्रमांक ४२८. शिक्षक सहाकारी बँक शाखा, कमाल चौक, नागपूर येथील खाता क्रमांक ३३४५ या दोन्ही खाते उघडते वेळी दोन्ही बँकेत केलेल्या अर्जाची प्रत, ठरावाची प्रत, स्वाक्षरीच्या नमून्याची प्रत आणि पासबुकाची प्रत तसेच केलेल्या व्यवहाराची पासबुक प्रत, बँकेकडून दोन्ही खात्याची केलेल्या व्यवहाराची

... २

त्यांच्या सहीची प्रत आपण साक्षांकित करुन ताबडतोब देणेबाबत. सदरची माहिती मला व्यक्तिशः द्यावे किंवा शाळेतील लिपिक श्री. देवानंद डेकाटे यांचे हस्ते पाठवावे असे कळविलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, जी माहिती मिळाली ती अपूर्ण मिळाली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २०.५.२००९ रोजी व दिनांक २६.५.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यात अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना बँक खाते उघडतांना ठरावाची नक्कल व इतर कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे ठरावाची नक्कल नसते ती संस्थेकडे असते. जी कागदपत्रे असतात ती बँकेकडे असतात. त्यांनी असेही सांगितले की, संस्थेत वाद आहे व अपीलकर्ता हे संस्थेचे अध्यक्ष आहेत. कोणत्याही प्रकारे अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे संस्थेचे माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेले नाही. परंतु शाळेचे जनमाहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक असतील अशी सुचना काढली आहे तरी सुध्दा संस्थेचे माहिती अधिकारी नियुक्त करणे आवश्यक असते. त्याकरिता संस्थेने ठराव केला असला पाहिजे किंवा आदेश केले पाहिजे त्यामुळे विद्यमान जनमाहिती अधिकारी म्हणून जे मुख्याध्यापक आलेले आहेत ते तांत्रिकदृष्टया माहिती अधिकारी नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा संस्थेत वाद आहे हे मान्य केलेले आहे. अपीलकर्ता यांनी सांगितले की, मुख्याध्यापक हे कोणाचेच ऐकत नाही. असे असले तरी मुख्याध्यापक यांनी मुख्याध्यापक या पदनामाप्रमाणे खाते उघडले असल्यामुळे ती बँकेकडून उपलब्ध करुन घेऊन ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून बाबा रघुनाथस्वामी हायस्कूल, नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कलम ५ प्रमाणे जनमाहिती अधिकारी म्हणून नियुक्ती कराव व तसे न केल्यास अधिनियमाचे कलम ८ (ग) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक होईल. संस्थेनी माहिती अधिकारी नियुक्ती करण्याचे आदेश काढल्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी बँकेकडून खाते उघडण्यात जी कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७४/२००९.**

श्री. तनजील अहमद व. मोबीनूर रहमान,
बडी मस्जिद के पास, नया बाजार,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा निबंधक सहकारी संस्था,
प्लॉट नं. ८, सहकार सदन,
हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर.

श्री. डी. के. बेदरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांचेकडे मदनी को.ऑप. हाऊसिंग सोसायटी के ऑडिट रिपोर्ट व अन्य दस्तऐवज. १९८७ से आज तक की प्रतिवर्ष आमसभा की प्रोशिडिंग, चेंज रिपोर्ट, कार्यकारीनी की सोसायटी की सभी सभासदोंकी सुची, डिफाल्टर सभासदों की सुची, बॉयलाज की सर्टिफाई कॉपी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

... २

त्यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१०.२००९ रोजी देण्यात आला असून प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना काही जी कार्यालयात माहिती उपलब्ध होती ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यानंतर जी माहिती संस्था स्तरावर होती ती माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता दिनांक २०.८.२००९ रोजी संस्थेस पत्र दिलेले आहे. परंतु संस्थेनी दिनांक १०.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला असल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा त्यांना लागू नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी कळविल्यावर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी तसे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. परंतु सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी संस्थेची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे तसे उत्तर दिलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये "माहिती" या संज्ञेची व्याख्या आहे व त्यात माहिती याचा अर्थ ............ आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती अशी तरतुद आहे व या तरतुदीप्रमाणे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्याप्रमाणे सहकारी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेता येऊ शकते व ती उपलब्ध झालेली माहिती अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहिल. अन्यथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत संस्थे विरुध्द योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी मदनी को-ऑप. हाऊसिंग सोसायटी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन ती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७०/२००९.**

सौ. वंदना दिलीप वाडीभस्मे,
द्वारा - पी. जी. थोटे, दर्शन कॉलनी,
ई - १६०, नंदनवन, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. गावंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. एस. व्ही. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १०.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार अन्न पुरवठा, सावनेर यांच्याकडे दिनांक ९.२.२००९ ला दिलेल्या तक्रार अर्जात तक्रारबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. त्यासंदर्भात अपीलकर्ती यांना दिनांक १०.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १७.८.२००९ रोजी उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १०.९.२००९ रोजी तहसीलदार, सावनेर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचा अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेले आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.	अपीलकर्ती यांनी सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही व कार्यालयात अनेक वेळा गेल्यावर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यावर तहसीलदार यांनी असे सांगितले की, त्यां त्यांच्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता येत होत्या. परंतु त्यांना प्रत्येक वेळेस चौकशी करुन निर्णय देता येणार नाही असे तोंडी कळविले होते. परंतु अपीलकर्ती यानी प्रत्येक वेळेस त्यांच्या अर्जातून चौकशी करुन पाहिजे अशी त्यांची मागणी होती व तसे त्यांना लेखी सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी दिलेले आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारात त्यांना जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिनांक १६.९.२००९ रोजी देण्यात आलेला असून निर्णय स्वयंस्पष्ट आहे व ते अपीलात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती नको असून तक्रारीची चौकशी करुन पाहिजे असे त्यांनी लेखी दिलेले असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७१/२००९.**

श्री. विनयकुमार शिवशंकर डेकाटे,
एम. आय. जी. ६४, क्वार्टर नं. १/१२,
हाऊसिंग बोर्ड कॉलोनी, हिवरी ले आऊट,
नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कल्याण आयुक्त,
महाराष्ट्र कल्याण मंडळ,
हुतात्मा बाबु गेनु मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन,
सेनापती बापट मार्ग, एलिफिन्स्टन, मुंबई - ४०० ०१३.

श्री. सतीश दाभाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकल्याण आयुक्त,
महाराष्ट्र कल्याण मंडळ,
हुतात्मा बाबु गेनु मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन,
सेनापती बापट मार्ग, एलिफिन्स्टन, मुंबई - ४०० ०१३.

श्री. पुरुषोत्तम ईखार,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक कल्याण आयुक्त,
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,
विभागीय कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.११.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००९ रोजी सहाय्यक कल्याण आयुक्त तथा माहिती अधिकारी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर यांचेकडे ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे व त्यानंतर त्यांना दिनांक १७.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना तिन्ही मुद्यांची माहिती ही उपलब्ध करुन दिलेली आहे. संबंधित अर्ज मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे दिनांक ५.८.२००९ रोजी प्राप्त झाला व सदरचा अर्ज मध्यवर्ती कार्यालयास तो सहाय्यक माहिती अधिकारी, नागपूर यांनी पाठविला आहे. तो अर्ज दिनांक १८.८.२००९ रोजी तो प्रत्यक्ष सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला व तसेच अनुकंपा तत्वाबाबतची माहिती संपूर्ण यादी तयार करणे तसेच भरती केलेल्या एकूण २२५ कर्मचाऱ्यांमध्ये अनुकंपा तत्वानुसार कोणास घेतलेले आहे किंवा नाही या तपासणीस थोडा विलंब झाला असल्याने माहितीस विलंब झालेला आहे. असा खुलासा माहिती आयोगाकडे केलेला आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे स्वरुप तपासून पाहिले असता त्यांनी माहितीची सत्यप्रत अर्जात मागितलेली नाही. मात्र दिनांक २२.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध झाल्यानंतर सत्यप्रत पाहिजे अशी मागणी केली होंती. अपीलकर्ता यांना दिनांक ७.११.२००९ रोजी रजिष्टर पोष्टाने माहिती पाठविली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंत ती त्यांना प्राप्त झाली नाही असेही अपीलकर्ता यांनी सांगितले व तसे असल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची सत्यप्रत प्रमाणित करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची सत्यप्रत प्रमाणित करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८८/२००९.**

श्री. डॉ. रवि ऋषीजी शेंडवरे,
मु. पो. ता. कुही, जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. ए. चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कुही,
जि. नागपूर.

श्री. एन. एम. खाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, कुही,
जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सरपंच/सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, कुही यांचेकडे ग्रामसभेमध्ये घेतलेले महत्वाचे निर्णय व झालेली कारवाई, आपल्या कार्यकाळातील झालेला जमाखर्चाचा गोषवारा पुरविण्या विषयी जानेवारी ते जून २००९ ची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.११.२००९ रोजी निवेदन सादर केले असून मला ग्रामपंचायत, कुही कडून पाहिजे असलेली माहिती परिपूर्ण मिळालेली असल्यामुळे मी अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १८.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९२/२००९.**

श्री. मनोहर मारोती मुडे,
रामनगर, जैन मंदीर जवळ,
ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
रेल्वे स्टेशन जवळ, चंद्रपूर - ४४२ ४०१.

जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अ. म. पाटील, उपकार्यकारी अभियंता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एन. डी. साधनकर, सहाय्यक अधिक्षक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा यांचेकडे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेण्यात येईल असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.६.२००९ रोजी मागितलेल्या माहितीचा खर्च रुपये २/- व टपाल खर्च रुपये २५/- असे एकूण २७/- रुपयांचा या कार्यालयात भरणा केल्यास माहिती पंजिबध्द डाकेने पाठविण्यात येईल असे कळविलेले आहे व त्याप्रमाणे दिनांक २९.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली

... २

आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसून प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.९.२००९ रोजी करण्यात आली आहे. आयोगास अधिक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर यांनी कळविले आहे व त्यामुळेच मुदतीत प्रथम अपीलाची सुनावणी न घेतल्यामुळे व निर्णय न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.११.२००९ व दिनांक १९.११.२००९ रोजीची सुनावणीची नोटीस काढण्यात आली. यावरुन अधिक्षक अभियंता तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सुनावणी असून सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी ही आयोगाचे सुनावणी नंतर सुनावणी ठेवण्यात आली आहे. यावरुन अधिक्षक अभियंता यांना अधिनियमाचे तरतुदीची कोणतीही माहिती दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांच्या मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. परंतु आयोगाकडे जनमाहिती अधिकारी उपस्थित नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी असून सुध्दा त्यांना त्याबद्यल काहीही माहिती नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ मध्ये काय माहिती मागितलेली आहे याचे आकलन हे जनमाहिती अधिकारी यांना सुध्दा झाले नव्हते असे दिसून येते व आज आयोगापुढे गैरहजर असलेले जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांना सुध्दा आकलन झालेले नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी स्वच्छ व स्वयस्पष्ट त्यांना काय माहिती पाहिजे हे दिसून येते. तरीपण त्यांना काय माहिती पाहिजे हे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती नाही. अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे प्रत्यक्षपणे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सिध्द करणे आवश्यक असते. त्यामुळे त्यांची वैयक्तिक उपस्थिती आवश्यक आहे. ते उपस्थित न राहिल्यामुळे व तसेच अपीलकर्ता यांच्या मुद्या क्रमांक १ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापुर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे हे कलम २०(१) च्या परंतुकाप्रमाणे बंधनकारक आहे. नोटीस काढून त्यांना संधी देऊनही आयोगापुढे प्रत्यक्ष हजर राहिले नसल्यामुळे त्यांनी ती संधी गमावली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून त्यांच्या दिनांक २०.५.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ची माहिती १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच आयोगापुढे अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याकरिता उपस्थित राहिले नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहिन्याचे वेतनातून कपात करुन ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावे.

३) सदरच्या शास्तीची वसुली मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, नागपूर यांनी करावयाची आहे. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९९/२००९ व अपील क्रमांक १०००/२००९.**

श्री. अब्दुल जब्बार वल्द हाजी बदल,
मोमीनपुरा पोलीस चौकी जवळ,
नागपूर - ४४० ०१८. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. प्रकाश वऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त, (प्रवर्तन विभाग)
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००९ रोजी दोन अर्जाचे माध्यमातून जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे आपले कार्यालयीन पत्र क्र. जावक १२१/प्रवि, दिनांक ४.८.२००७ अन्वये वार्ड नं. ५२ मधील घर क्रमांक १११ चे अनधिकृत बांधकाम दिनांक ३०.९.२००७ नंतर तोडण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. परंतु आज २ वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा अनधिकृत बांधकाम कां तोडण्यात आले नाही ? अशी विचारणा करुन माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच दिनांक २.८.२००७ रोजी वार्ड क्र. ५२ मधील घर क्रमांक १११ चे केलेले अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत सोबत जोडलेल्या

... २

पत्रानुसार असे नमुद करुन सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.८.२००७ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाच्या निर्णयानुसार पावसाळयात ३० सप्टेंबर पर्यंत अनधिकृत निवासी बांधकाम तोडण्याची कारवाई करता येत नसल्यामुळे तुम्ही अर्जात नमुद केलेले श्री. जियाउद्यीन व. अब्दुल गफ्फार यांचे अनधिकृत बांधकामावर ३० सप्टेंबर नंतर कारवाई करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयात दिनांक १७.९.२००९ रोजी अपीलार्थी हजर सहाय्यक आयुक्त, प्रवर्तन विभाग यांनी दिनांक १ ऑक्टोंबर २००९ ते १५ ऑक्टोंबर २००९ पर्यंत अनधिक.त बांधकाम तोडण्याबाबत आवश्यक ती पोलीस मदत घेऊन कारवाई करावी. परंतु कारवाई झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करतांना दिवाळी नंतर दिनांक २८.१०.२००९ रोजी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले व पोलीस मदतीकरिता पोलीस विभागाला पत्राद्वारे कळविण्यात आले. दिनांक २८.१०.२००९ ला पोलीस मदत देण्याचे संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी कबुल केल्यामुळे या विभागाचे संपूर्ण पथक पोलीस स्टेशनला गेले. परंतु काही कारणांस्तव वेळेवर पोलीस बंदोबस्त नाकारण्यात आला. त्यामुळे कार्यवाही करता आली नाही. कार्यवाहीची पुढील तारीख ठरविण्या आधीच गैरअर्जदारानी विभागाकडे अपील केल्यामुळे मुळ नस्त्या स्लम विभागाला पाठविण्यात आल्या. अपीलाच्या निर्णयानंतरच पुढील कार्यवाही करणे शक्य होईल असा खुलासा केलेला आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अतिक्रमण पाडण्याची कार्यवाही कक्षेबाहेर असल्यामुळे असे आदेश देण्याचे आयोगाचे कक्षे बाहेर असल्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अतिक्रमण पाडणेबाबत आदेश विनंती मान्य करता येत नाही व त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.११.२००९** **खंडपीठ, नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९८/२००९.**

श्री. राजेंद्र गयादीन गंगोत्री,
रामनगर, मरारटोली, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे विकास विद्यालय, परसोडी, वर्धा रोड, नागपूर या शाळेत नौकरीचे आमिष देऊन लोकांकडून पैसे उकडल्याबाबत तक्रारीबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी वर्ष २००६-०७ असून सदर माहिती व्यक्तिशः आणि ४८ तासांत कारण की, अर्जदाराचे जिवित व स्वसुरक्षेशी निगडीत माहिती असून वरील अधिनियमाच्या कलम ७(५) परंतुकामध्ये येते असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.१०.२००९ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा अर्जाची दखल सुध्दा घेतली नाही. माहितीचे स्वरुप पाहिल्यावर ४८ तासात माहिती उपलब्ध झाली पाहिजे असे त्यात तातडीचे कारण दिसून येत नाही. त्याबाबतच्या मागणीचा विचार करता येत नाही. परंतु ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते ती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल ही विहित मुदतीत घेतली नाही व दिनांक ५.१०.२००९ रोजी पत्र निर्गमित केलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती मुदतीत उपलब्ध झाली नाही व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची जबाबदारी पार पाडली नसल्याने अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे व विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येते.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाची आहे व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९७/२००९.**

श्री. नितीन जी. ताटीया,
३४५, श्रध्दा हाऊस, पहिला माळा,
किंग्जवे, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त - १,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. संजय जयस्वाल,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (विद्युत),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे मार्च २००० ते अर्जाचे तारखेपर्यंत रस्त्यावरील दिव्यांची माहिती ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.१.२००९ रोजी मागितलेल्या माहितीपैकी बरीच माहिती तयार आहे. आपणास विनंती करण्यात येते की, महानगरपालिकाच्या केंद्रीय अभिलेखाकारामध्ये (महानगरपालिका मार्ग, नागपूर) रुपये २/- भरुन या कार्यालयामध्ये रक्कम भरल्याची पावती सादर करुन माहिती घेऊन जावी. उर्वरीत माहिती शक्य झाल्यास १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २.४.२००९ रोजी दिनांक १.४.२००९ रोजी रीना नौकरकर, वकील

... २

यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनेनुसार भरणा केलेल्या रकमेची पावती सादर केली असल्याने तयार असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मुद्या क्रमांक बी व सी बाबत अपीलकर्ता समाधान झाले नाही. तरी माहितीचा शोध घेऊन अपीलकर्ता यांना कळविण्यात येईल असे दिसून येते असे आदेश त्यांना दिनांक १२.१०.२००९ रोजी दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मार्च २००० पासून प्रत्येक विभागामध्ये रस्त्यावरील दिवे किती लावण्यात आले याबद्यलची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, एकूण दिव्याची माहिती त्यांना दिलेली आहे. परंतु कोणत्या विभागाने किती दिवे लावण्यात आले याबद्यलची माहिती नाही. वर्क ऑर्डरची लिस्ट दिलेली नाही यावरुन कोणत्या विभागामध्ये किती स्ट्रिट लाईट आहेत असे दिसून येत नाही. अर्थात दिनांक २६.१२.२००८ ची लिस्ट दिलेली आहे. तसे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाले असल्यास अपीलकर्ता यांनी महानगरपालिकाचे रस्त्यावरील दिव्याची नस्तीची तपासणी करुन त्यातून त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता याचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी विद्युत विभाग यांना कामकाजाची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी उपस्थित होऊन जनमाहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून संबंधित नस्तीचे निरिक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्यात याव्यात व पोच द्यावी.

२) हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी वेळ व तारीख कळविल्यास व स्वतः उपस्थित झ ाल्यास त्यांना संबंधित रस्त्यावरील दिव्याच्या संदर्भातील संबंधित नस्ती कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे उपस्थित उपलब्ध करुन देण्यात यावी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात व पोच घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.११.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००२/२००९.**

श्री. चिंतामन गडी शेळके,
न्यु डायमंड नगर, प्लॉट नं. ५५,
बजरंग किराणा स्टोअर्सचे मागे,
पिंपळकर यांचे घराजवळ, पो. हनुमाननगर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती अल्का शिंगाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
मौदा, जि. नागपूर.

श्री. जामनीक,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
नेरला, ता. मौदा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मौदा यांचेकडे प.ह.न. ४७ मौजा दुधाळा येथील सर्व्हे नं. ३३७, ३३८ व ३३९ चे संबंधात माहिती मिळणेबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात निर्णय दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी माहिती घेऊन जाण्यास नकार दिला त्याची नोंद मात्र दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे असे असून सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ मधील सन १९११-१२ च्या पूर्वीचे दस्ताऐवज गैरअर्जदाराचे नावानी असल्यास उपलब्ध करुन देण्यात यावी असे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती त्यांना पत्ता पूर्ण नसल्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही. दुरध्वनीवरुन कळविले होते. माहिती घेण्यास नकार दिला असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा असे सांगितले की, त्यांनी स्वतंत्रपणे तक्रार अर्ज केलेला आहे त्या तक्रार अर्जाची चौकशी सुध्दा करण्यात आली आहे त्याची नोटीस सुध्दा काढण्यात आली आहे. तलाठी यांना सुध्दा नोटीस काढली आहे यावरुन स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००५/२००९.**

श्री. भैय्याजी गोपाळराव सोमनकर,
द्वारा - श्री. नथ्थु गरीबाजी चिमूरकर,
गोकुळनगर वार्ड क्रमांक २२,
श्री. गुरुदेव सेवा मंडळ, रोड,
ता. जि. गडचिरोली - ४४२ ६०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दि. ना. इंगोले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गडचिरोली.

श्री. एस. डी. भांडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
पाणी पुरवठा विभाग प्रमुख,
नगर परिषद कार्यालय, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी नगरपरिषद कार्यालय, गडचिरोली यांचेकडे दिनांक ६.६.२००८ ते दिनांक २३.५.२००९ या एक वर्षाच्या काळात परिसरातील नागरिकांनी केलेला विनंती अर्जावर कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच इतर ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.६.२००९ रोजी माहितीचे करिता रुपये ६/- चा भरणा करावा असे कळविलेले आहे व त्याप्रमाणे दिनांक २४.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

... २

परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात निर्णय दिलेला दिसून येते नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांचेकडे नवीन पाईप लाईन टाकली असल्यामुळे जुनी पाईप लाईनने पुरेसा पाणी पुरवठा होत नाही व त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा होत नाही. श्री. चिमूरकर यांचे नळ कनेक्शन ५ फूट खाली खड्डयात आहे. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा व्यवस्थीत असून त्यावर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना नवीन पाईप लाईन टाकून पाहिजे आहे. नगरपरिषदेमध्ये ठरावानंतरच निर्णय घेण्यात येतो ती कार्यवाही पूर्ण झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्याबाबत माहिती दिली असून सुध्दा त्यांना तात्काळ काम करुन पाहिजे आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याचे आदेश देता येणार नाही. मात्र झालेल्या कार्यवाहीची माहिती छायांकिंत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००४/२००९.**

श्री. अनिल जे. महाकाळ,
द्वारा - विजयराव दिगंबर मानमोडे,
फ्लॅट नं. ८, नेताजी कॉलनी,
त्रिमुर्ती नगर, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तिरोडा,
जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
बांधकाम विभाग,
नगर परिषद कार्यालय, तिरोडा,
जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग, नगरपरिषद, तिरोडा यांचेकडे एकूण ९ मुद्यांवर तिरोडा नगरपरिषद अंतर्गत झोपडपट्टी विकास कार्यक्रमाबद्यल माहिती दिनांक ३०.६.२००९ पर्यंत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अर्जाचे प्रतीवर स्टॅम्प लावलेला आहे असे दिसून येत नाही. मात्र अर्जामध्ये सर्व माहिती वेळेवर मिळावी याकरिता मनीऑर्डर रुपये २००/- ची आगाऊ पाठविली आहे. त्याबाबतचा पुरावा त्यांनी जोडलेला नाही. जनमाहिती अधिकारी आज उपस्थित नाही व त्यामुळे सदरच्या

संदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबतचा निर्णय देता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २२.७.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** — **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ३०.११.२००९** — **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००९/२००९.**

श्री. गणरात हरकूलाल गडपाल,
रमाबाई आंबेडकर वार्ड, प्रभाग १३,
आंबाटोली, सुर्याटोला रोड,
ता. जि. गोंदिया - ४४१ ६१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. कुंकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
लेखाधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

श्रीमती ममता झा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. मूनघाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे दिनांक १४.५.२००७ रोजी दिलेल्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.६.२००७ रोजी अर्जातील मागणीचे अवलोकन केले असता आपणांस कोणत्या पत्राची छायांकित प्रत पाहिजे आहे याचा अर्थबोध होत नाही. आपले निवृत्ती वेतन प्रकरणाबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच यापुढेही शिक्षणाधिकारी यांनी आपले निवृत्ती वेतन प्रकरणी पाठपुरावा करण्यात येईल असेही कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्या अनुषंगाने अनुषंगाने अपीलकर्ता यांना काही कळविलेले दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. माहितीचा अर्ज विहित नमून्यात दिनांक १९.६.२००७ रोजी प्राप्त झाला. मात्र त्यामध्ये विशिष्ट माहिती मागविण्यांत आली नसून फक्त मा.शिक्षण उपसंचालकाचे पत्र दिनांक १४.५.२००७ चे अनुषंगाने पेंशन प्रकरणात कार्यवाही करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यामुळे अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.७.२००७ च्या पत्रान्वये आपणास माहितीचा अधिकारांतर्गत नेमकी कोणती माहिती पाहिजे याबाबत बोध होत नसल्याचे कळविले आहे. अर्जदाराची पेंशन केस दिनांक ३१.१०.२००६ या तारखेला मा.महालेखाकार, नागपूर यांना सादर करण्यांत आले होते मात्र त्यावर अर्जदारांनी सही न केल्यामुळे व सही करण्यास तयार नसल्यामुळे पेंशन केस परत आली. संस्थेचे सचिवाशी अर्जदाराचा वाद व अर्जदाराची निवड श्रेणीची मागणीमुळे संबंधिताचे प्रकरण अंतिम करता येणे त्यावेळेस शक्य झाले नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार निवडश्रेणी देता येणे शक्य नव्हते. कारण लेखाधिकारी यांचे दिनांक ७.९.२००७ च्या पत्रान्वये ते पात्र ठरत नव्हते. संबंधितांचे पेंशन व इतर अनुषांगिक फायदे मिळण्याबाबत या कार्यालयाकडून कार्यवाही करुन दिनांक १२.१२.२००७ नुसार तात्पुर्ती निवृत्ती वेतन मंजूर करण्यांत आले. तसेच अर्जदारास तात्पुर्ती सेवानिवृत्ती उपदान रुपये १,५०,०००/- दिनांक २४.३.२००८ च्या आदेशानुसार देण्यात आले.

अर्जदाराने मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ५१६६/२००५ दाखल केली होती नंतर अवमान याचिका १९४/२००६ दाखल केली. न्यायालयाचे निकाल दिनांक १.८.२००८ रोजी लागला. त्यामध्ये अर्जदार स्वतः दोषी असल्याचा स्पष्ट झाले. त्यानंतर अर्जदाराने निवृत्ती वेतन प्रकरणावर सही केल्यामुळे प्रस्ताव दिनांक २५.११.२००८ रोजी मा.महालेखाकार, नागपूरकडे फेर सादर करण्यांत आले व अर्जदाराचे पेंशन दिनांक १२.३.२००९ रोजी मंजूर झ ााले. सद्यःस्थितीत अर्जदारास पेंशन मिळत असून सर्व अनुज्ञेय रक्कमा पूर्वीच देण्यांत आले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१३/२००९.**

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड, मु. पो. ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सदावर्ते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली.

श्री. बडवाईक,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य लिपिक,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, सामान्य प्रशासन, नगरपरिषद, देसाईगंज यांचेकडे अपील सुनावणी संबंधाने व इतर ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता हजर झाले नाही व तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता आज हजर नाही. मात्र त्यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी आयोगाकडे केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९८/२००९**

**१) श्री राजेंद्र गयादीन गंगोत्री,**
**रामनगर, मरारटोली, नागपूर, ता.जि.नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**भवन्स भगवानदास पुरोहित विद्यामंदीर,**
**श्रीकृष्णनगर, वाठोडा, नागपूर, ता.जि.नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**भवन्स भगवानदास पुरोहित विद्यामंदीर,**
**श्रीकृष्णनगर, वाठोडा, नागपूर, ता.जि.नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती यांचे तर्फे ॲड. श्री पी.बी.अग्रवाल हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.२.०९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकुण ११ मुद्यांमध्ये संस्थेच्या संदर्भातील तसेच शिक्षकांच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.०९ रोजी संस्थेकडेच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस उत्तरवादी यांचे वकील यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरची संस्था ही विना अनुदानित आहे व शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य संस्थेस किंवा शाळेस मिळत नाही. त्याकरीता त्यांनी डॉ.पंचाबराव देशमुख को-ऑपरेटिव्ह बँक लि. विरुध्द स्टेट इन्फार्मेशन कमीशन या याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आयोगाचे निदर्शनास आणला व त्यात ज्या संस्थेस शासनाकडून आर्थिक सहाय्य

( पान २ वर ..)

नसते ती संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाही, असे प्रतिपादन केले. यावरुन सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९६/२००९**

**१) श्री भिमराव पांडूरंग झिले,**
**मु.पो. हिंगणा, धनगरपूरा, ता.हिंगणा, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा**
**ता.हिंगणा, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००९ रोजी तहसिल कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांचेकडे लग्नानंतर पत्नीच्या नांवाने घेतलेली शेती व प्लॉट सोडचिठठी झाल्यावर विकण्याचा आदेश नाही. याचा जी.आर.मिळण्याबाबत, शासकिय नवीन सुधारित आदेशाची प्रत, अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.७.२००९ रोजी विषयाच्या अनुषंगाने आदेश किंवा जी.आर.ची प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही. संबंधीत विषयाच्या पुस्तकाचे अवलोकन करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थीला कायदयाच्या तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी कायदयाची नांवे सांगण्यात आली व त्यामुळेही त्यांचे समाधान झालेले नाही व त्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात आले. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिशाभूल व त्रोटक माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. वास्तविक अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

(पान २ वर ..)

जी माहिती दिली ती योग्य आहे. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे आदेश किंवा जी.आर. नसून सदरची बाब ही कायदयाने निश्चित केलेली आहे. व त्यांना हिंदु विषयक हक्क कायदयाच्या तरतुदी पाहाण्यास सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९७/२००९**

**१) श्री गुणवंत चतुरदास तेजसिरी,**
**कार्यालय, विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,**
**नागपूर विभाग, कॅाटन मार्केट, वेअर हाऊस, नागपूर-४४००१८. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे एकुण २१ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून यते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.४.२००९ रोजी २१ मुद्यांवर उत्तर दिलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलात पुन्हा १९ मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.६.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यात आलेले आहे. त्यात या कार्यालयाशी संबंधीत नसलेली माहिती मा.उपसंचालक, भूमी अभिलेख, प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घेणे कामी अर्जाची प्रत त्यांना सादर करावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व इतर मुद्यांच्या संदर्भात सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना दिशाभूल करणारी

( पान २ वर ..)

माहिती मिळाली आहे व काही माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अर्जात जे २१ मुद्दे उपस्थित केलेले आहे त्यात माहिती मागण्यापेक्षा तक्रारीचे स्वरुप आहे. व त्यांच्या पत्नीच्या शासकिय कामाच्या संदर्भात त्यांनी सदरचे २१ मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आयोगानी सुध्दा त्यांच्या माहितीच्या २१ मुद्यांचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, माहिती मागण्यापेक्षा त्यांची प्रत्येक मुद्यांत तक्रार दिसून येते. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये त्यांनी विचारलेले मुद्दे येत नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो. तरीही त्यांना मुद्यांची उत्तरे दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक ९७/२००९
**तक्रार** क्रमांक १६२/२००९

**१) श्री विकास गणपतराव शेंडे,**
**नागरी बँक कॅालनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,**
**हिंदनगर, जिल्हा वर्धा ४४२००३.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**अजनी विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १२.३.०९ व दिनांक ८.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या दोनही तक्रारींची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रार क्रमांक ९७/२००९ मध्ये तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २४५०/०७ च्या दिनांक २१.१.२००९ च्या निर्णयाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती निरंक आहे असे कळविल्यामुळे, माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. दिनांक १८.२.०९ रोजी अपीलकर्ता यांचे १९९६ मध्ये अपीलकर्ता विरुध्द पोलीस स्टेशन अजनी येथे तक्रार दाखल असल्यास निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती देण्यात यावी. या आदेशावरुन १९९६ ला पोलीस स्टेशन अजनी येथील पोलीस स्टेशन डायरी व अदखलपात्र गुन्हयाचा रेकार्ड उपलब्ध नाही. तसेच भाग १ ते ५ चे क्राईम रजिस्टर मध्ये अपीलकर्ता यांचे विरुध्द गुन्हा दाखल नसल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते. तरी माहिती निरंक आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे बयाण घेण्यात आले होते. तसेच माहिती १९९८ ला मागितली होती. परंतु त्यावेळेसही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती. अपीलकर्ता यांना इतरही माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, असा आयोगाकडे खुलास दाखल केला आहे. व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

३. तक्रार क्रमांक १६२/०९ मध्ये तक्रारदार यांनी अपील क्रमांक ३३४/०८ मधील दिनांक ४.४.०९ च्या निर्णयाप्रमाणे १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १५.६.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली, ती विलंबाने उपलब्ध करुन दिली असे आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या निर्णयाप्रमाणे आदेश मिळाल्यानंतर १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे आदेश आहे. निर्णयाची प्रत त्यांच्या कार्यालयात दिनांक ८.६.०९ रोजी उपलब्ध

(पान २ वर ..)

झाली व त्यानंतर दिनांक १५.६.०९ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. यावरुन निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु दूस-या विभागाची माहिती सहा. वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून दिनांक २.३.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यातही अपीलकर्ता यांची माहिती मागण्यापेक्षा तक्रार दिसून येते. त्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार क्रमांक ९७/२००९ व तक्रार क्रमांक १६२/२००९ खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २४०/२००९**

**१) श्री वाय.एस. देशभ्रतार,**
**सुगत भवन, कुंभारे नगर, तुमसर,**
**पो.ता.तुमसर-४४१९१२, जिल्हा भंडारा. तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, तुमसर, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २२८६/२००७ च्या दिनांक ५.१२.२००८ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही अशी आयोगाकडे तक्रार दाखल केलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण माहिती ही त्याहीवेळेस उपलब्ध करुन दिली व आताही उपलब्ध करुन दिलेली आहे. ज्या पुतळा समितीने ते काम केलेले आहे, त्या पुतळा समितीकडून मात्र माहिती नगर परिषेदेस उपलब्ध करुन घेता येणार नाही व ती तक्रारदार यांना उपलब्ध करुन देता येणार नाही. मात्र उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे. आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १६७/२००९**

**१) श्री  चंद्रभान सिताराम बारापात्रे,**
**२९९, ओमनगर, नागपूर-४४०००९.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेउ,**
**नंदनवन उपविभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे दिनांक ३०.९.२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सादर केला आहे. व त्यामध्ये तक्रारदार यांना अपील क्रमांक २८७/०८ च्या दिनांक ३१.३.०९ च्या आदेशाप्रमाणे नियमाची मराठी भाषेतील प्रत पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा सदरची तक्रार ही सुनावणीस लावण्यात आली व त्यामध्ये तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना नियमाची माहिती मराठी मध्ये मिळावी. परंतु विद्युत देयक जे दिले जाते त्यामध्ये जी तांत्रिक शब्दरचना आहे व जे दर आकारले जातात त्यातून मराठी नियमाची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही व त्यामुळे निश्चित कोणत्या आदेशाप्रमाणे किंवा नियमाप्रमाणे विद्युत देयकाची दर आकारले जाते याची निश्चित माहिती होत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे आणखी नियमाची प्रत आहे व त्यामध्ये विद्युत देयकाच्या दराच्या संदर्भात एमईआरईसी ने दिलेल्या देयकाची प्रत आहे. व त्याप्रमाणे विद्युत देयक तयार केले जाते. तरीही तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,

( पान २ वर ...)

विद्युत देयकातील प्रत्येक बाबीची गणना व रेट कशा प्रकारे लावले जातात याबध्दलची माहिती ही त्यांच्या लेखा अधिका-याकडून समजावून घेतल्यास त्याबध्दलची तक्रारदार यांची शंकेचे निरसन होईल. व त्याकरीता तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होऊन त्याबध्दलची माहिती समजावून घेतल्यास त्यांच्या शंकेचे निरसन होऊ शकते त्याकरीता सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्यावेळेस उपस्थित झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांची लेखा अधिका-यांबरोबर बैठक घडवून आणावी व त्यांच्या शंकेचे निरसर करावे.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१२/२००९**

**१) श्री जागेश्वर मोहन निनावे,**
**सर्कल नं.१५/२१, वार्ड नं. ४८, घर नं.३६५,**
**पटवी मंदीर गल्ली, गोळीबार चौक, नागपूर ता.जि.नागपूर-१८.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(महसुल),**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००९ रोजी उप जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे जन माहिती अधिकारी म्हणून, मा. जिल्हाधिकारी यांनी भाडेपटटयावरील स्वत/ केलेली स्वाक्षरी कशाचे आधारे खोडलेली आहे या बाबतची तपासणी करुन सविस्तर माहिती देण्यात यावी.(आदेश व स्वाक्षरी खोडलेली भाडेपटटयाची सत्यप्रती सादर करण्यात येत आहे) सदरची माहिती ३१ मे १९९८ ची आहे. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.७.२००९ रोजी अधिनियमाचे कलम २(त्र) व कलम २ (च) अन्वये माहिती नाकारण्यात आलेली आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.७.०९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३१ मे, १९९८ रोजी भाडे पटयावरील स्वतः केलेली स्वाक्षरी कशाच्या आधारावर खोडलेली आहे याबध्दलचे कारण विचारलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, समुारे १० वर्षापुर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी स्वतःची स्वाक्षरी कां खोडली याचे कारण आज उपलब्ध करुन देता येत नाही व ते कागदपत्रामध्ये सुध्दा नाही. व त्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम २(त्र) व कलम २(च) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही, असे कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी कारणांसहित माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते. फक्त अधिनियमाचे कलम देवून माहिती नाकारणे हे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा

( पान २ वर..)

निष्कर्ष होऊ शकतो. प्रथम अपीलात सुध्दा संपूर्ण तपशिल देण्यात आलेला आहे परंतु माहिती कां नाकारण्यात आलेली आहे याबध्दलचे कारण विश्लेषण केलेले नाही. यापुढे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे कलमांचा उल्लेख करताना त्याबाबतची कारण मिमांसा देणे आवश्यक आहे. असे असले तरी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद केल्याप्रमाणे निर्णय योग्य आहे त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१६/२००९**

**१) श्री श्रीराम मन्साराम सेलोकर,**
**मु.पो.कोलारी, ता.लाखनी, जिल्हा भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती लाखनी, ता.लाखनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय कोलारी (पटा.)**
**ता.लाखनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, सरपंच/सचिव ग्राम पंचायत कोलारी यांचेकडे दिनांक ९.१.०९, २४.४.०९ वरील जरुरी मासिक सभेचे नोटीस बुक, सभेचे वृतांत वगैरे.. माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक २५.४.०९ रोजी अर्ज करुन पुन्हा अतिक्रमणाच्या बाबतीत एकाच व्यक्तीवर कार्यवाही कां करण्यात आली असे विचारलेले दिसून येते. दिनांक १.५.०९ रोजी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी तीन मुद्यांच्या माध्यमातून माहिती मागितलेली असून सुध्दा त्याबध्दल एकच प्रथम अपील व एकच द्वितीय अपील सुध्दा एकच दाखल केलेले दिसून येते. व आज अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांच्या कोणत्या अर्जाचे अनुषंगाने सुनावणी घ्यावी ही बाब स्पष्ट होत नसल्यामुळे त्यांच्या दिनांक २५.४.२००९ च्या एका अर्जाचे संदर्भात सुनावणी घेण्यात आली. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.५.०९, २२.५.०९ २९.६.०९ व २९.७.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली असल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे आदेश दिनांक २९.७.०९ व ४.९.०९ रोजी देण्यात आलेले असून जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.९.०९ ला माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली होती. त्यामुळे माहिती नाकारण्यात आलेली होती.

( पान २ वर ..)

परंतु प्रश्नार्थक स्वरुपात जरी माहिती मागितली तरी त्यातून जर झालेल्या कार्यवाहीची माहिती अपेक्षित असेल तर ती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्क असते. व त्यामुळे फक्त प्रश्न विचारलेले आहे या कारणास्तव माहिती नाकारणे हे उचित नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मात्र त्यांच्या आदेशामध्ये ग्रामपंचायतचे सभेचे वृतातांची माहिती उपलब्ध करु द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे त्यानंतर सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी यापुढे ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे हे त्यांच्यावर बंधनकारक आहे याची जाणीव ठेवावी. माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१४/२००९**

**१) श्री मुरलीधर अल्लूजी क-हाडे,**
**रा.पो.सेंदुरवाफा, ता.साकोली, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,**
**नागपूर विभाग, नागपूर. प्लॅाट नं.९०, शिवाजीनगर,**
**नागपूर-४४००१०. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे)**
**मुद्रांक जिल्हाधिकारी, भंडारा जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,**
**भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.०९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दस्तऐवज लेखकाचा मूळ परवाना क्रं.७१/७७ नुतनीकरण परत मिळण्याबाबत. आपले पत्र दिनांक २३.६.२००९ अन्वये लिहिलेल्या पत्रान्वये वयाचे ६० वर्ष पुर्ण केले आहे. याबाबत वयाचे अटीचे संदर्भात प्रकरण सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे कोणत्या याचिका क्रमांकाने आणि कोणत्या तारखेस प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे याची माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.७.०९ रोजी राज्य जन माहिती अधिकारी व सहाय्यक निबंधक वर्ग-१ यांनी टपालाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. त्याकरीता जावक नोंदवहीचा पुरावा त्यांनी सादर केला आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णयाच्या दिवशीच पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दस्तऐवज लेखकाचे मुळ परवाना नुतनीकरण होऊ नये याकरीता माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे किंवा कार्यवाही करण्याची टाळाटाळ केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या संदर्भात वयाच्या अटीचे संदर्भात सर्वोच्च न्यायालयात प्रकरण सुरु असल्यामुळे त्यांना तसे कारण सांगितले होते. त्याकरीता दिनांक ३.९.०९ रोजी सहाय्यक निबंधक वर्ग-१ यांनी

(पान २ वर ..)

त्याप्रमाणे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, म.रा.पुणे यांना पत्र दिलेले दिसून येते. सदरचा प्रस्ताव दिनांक २४.१२.०८ रोजी पाठविण्यात आला आहे व त्या पत्राप्रमाणे काय कार्यवाही झाली याबध्दल माहिती मागितली होती. ज्याअर्थी प्रस्ताव दिनांक २४.१२.०८ रोजी पाठविण्यात आलेला आहे, त्याअर्थी जी माहिती उपलब्ध आहे ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. स्मरणत्र दिनांक ३.९.०९ रोजी दिलेले आहे परंतु उत्तर आलेले दिसून येत नाही. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांना झालेल्या कार्यवाहीची माहिती माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन द्यावयाची आहे ती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे स्मरणपत्र पाठविणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक म.रा.पुणे यांचेकडून झालेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन घेवून पुरविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७३०/२००९**

**१) श्री अरविंद लक्ष्मीनारायण जैस्वाल,**
**बाजार चौक, सिंदेवाही, मु.पो.ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(सं व सु)**
**महा.राज्य विद्युत वितरण कंपनी, गडचिरोली,**
**शिवाजी महाविद्यालयाजवळ, गडचिरोली-४४२६०५. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, (सं. व सु प्रविभाग),**
**म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.गडचिरोली. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता कार्यालय गडचिरोली, म.रा.वि.वि.कं. यांचेकडे, सौ. गितांजली अरविंद जैस्वाल यांच्या मालकीच्या जमीन सर्व्हे नं. २९१/२ मधून गेलेली ११ के.व्ही.लाईन ३० दिवसांचे आंत सदरील जागेमधून काढून टाकण्यावषयी दिनांक २४.८.०७ रोजी झालेल्या निकालाच्या संदर्भात कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माहिती पंजीबध्द डाकेने मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर देण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील २५.३.२००९ रोजी दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ४.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना अधीक्षक अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाच्या संदर्भात युक्तीवाद करताना अपीलकर्ता यांनी सांगितले की, प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना (१) अधीक्षक अभियंता यांचे पत्र क्रमांक ८१० व ८१९ दिनांक १०.१०.२००७ (२) कार्यकारी अभियंता यांना पत्र क्रमांक १२३५ दिनांक १.४.२००८ (३) कार्यकारी अभियंता ब्रम्हपुरी यांचे पत्र क्रमांक १५२ दि. २५ एप्रिल, २००८ चे पत्र त्यांना देण्याचे मान्य केले होते. मात्र ते उपलब्ध करुन दिलेले नाही. परंतु सदरच्या पत्राचा उल्लेख हा प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिसून येत नाही. तसेच अपीलकर्ता

(पान २ वर..)

यांनी माहितीच्या पत्रामध्ये सुध्दा संबंधीत पत्रांचा उल्लेख केलेला दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे पत्र उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना वर निर्णयात नमुद केलेल्या पत्राची माहिती उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१३/२००९**

**१) श्री अरुण महादेवराव कायरकर,**
**स्व.सोनबाजी कायरकर स्मृती सार्व.वाचनालय,**
**प्लॉट नं.४३, सच्छिदानंदनगर, नागपूर.ता.जि.नागपूर-२४. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**कार्यालय-सहाय्यक ग्रंथालय संचालक,**
**आयुक्त कार्यालय परिसर, जिल्हा परिषदेचे मागे,**
**सिव्हील लाईन, नागपूर-१. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.ग्रंथालय संचालक,**
**आयुक्त कार्यालय परिसर, जिल्हा परिषदेचे मागे,**
**सिव्हील लाईन, नागपूर-१. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक यांचेकडे सन २००७-०९ चे तपासणी अहवाल व इतर माहिती ग्रंथालयासंबंधीत एकुण १४ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.६.०९ रोजी एकुण १४ मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.०९ रोजी सहाय्यक ग्रंथालय संचालक, यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.७.०९ रोजी देण्यात आला असून पुन्हा मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु त्यांच्या ग्रंथालयाचे अनुदान सुरु करण्यात यावे याकरीता ही माहिती मागीतलेली आहे. व त्यामुळे त्यांना इतर मुद्यांशी काही कर्तव्य नाही. परंतु त्यांच्या ग्रंथालयाचे अनुदान सुरु होणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या ग्रंथालयाची तपासणी करण्यात आली व अहवाल त्यांना देण्यात आला आहे. त्यामध्ये काही त्रुटी आहे. त्या

( पान २ वर ..)

त्रुटीची पुर्तता केल्यास त्यांच्या ग्रंथालयास अनुदान देण्यात येईल. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.५.०९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६९४/२००९**

**१) श्री विकास गणपतराव शेंडे,**
**नागरी बँक कॅालनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,**
**हिंदनगर, वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व विकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व विकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता कार्यालयात उपस्थित झाले व निवेदन दिले. परंतु सुनावणीस ते गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१ यांचेकडे, सहपत्रात नमुद केल्याप्रमाणे एकुण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००९ रोजी प्रथम अपील महाराष्ट्र गृहनिर्माण व विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन बांद्रा(पूर्वी) मुंबई-५१ यांचेकडेच दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या अनुषंगाने निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता हे कार्यालयात हजर झाले व निवेदन दिले. परंतु ते सुनावणीस गैरहजर आहे. निवेदनात त्यांनी म्हाडा मुंबई या कार्यालयातून मागितलेली माहिती दिली नाही. अपीलाचा निर्णय झालेला नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी असे निवेदन सादर केले आहे. त्यावर नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण या कार्यालयातील उपस्थित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी म्हाडा मुंबई यांनी त्यांना सुनावणीस उपस्थित राहाण्याकरीता प्राधिकृत केलेले आहे. त्यांनी असेही सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्यातील मुद्या क्रमांक १ वगळून एकुण १५ मुद्यांची माहिती ही नागपूर येथील मंडळाच्या कार्यालयातील आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी ती माहिती नागपूर येथील कार्यालयात मागणे आवश्यक होते. त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र

( पान २ वर ..)

गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी अन्वये महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच प्राधिकरणाच्या प्रादेशिक मंडळाच्या स्तरावर माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी निर्देशीत करण्याचे आदेश काढण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी जी माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या जन माहिती अधिकारी म्हणजेच नागपूर येथील कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचेकडेच माहिती मागणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी मुद्या क्रं.१ च्या संदर्भात म्हाडा उपाध्यक्ष यांना जे निवेदन दिलेले आहे त्या निवेदनाच्या संदर्भात मात्र मुंबई येथील कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते असे दिसून येते. त्यातही अपीलकर्ता यांनी निश्चित अशा जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केलेला नसल्यामुळे माहितीचा विषय व माहिती अधिकारी यांना शोध घेणे अतिशय जिकरीचे होते व त्यामुळे ३० दिवसांत माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. व अपीलकर्ता यांनी एक माहिती मुंबई व दूसरी माहिती नागपूरची ही एकाच अर्जात मागितलेली असल्यामुळे त्यांचा अर्ज मुळात अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ग्राहय होत नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा निश्चित अशा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले नाही. व त्यामुळे त्याबाबतही कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली दिसून येत नाही. म्हाडा हे सार्वजनिक प्राधिकरण व त्यातील माहिती ही निरनिराळया विभागामध्ये विभागलेली असते. त्यामुळे अर्जदारास ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता निश्चित असे माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले. त्यावरुन अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मोघम अशी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वर्णन केलेले आहे व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. असे असले तरी दिनांक ४.१२.२००८ च्या म्हाडा उपाध्यक्ष यांना दिलेले निवेदन व टिपणी व केलेल्या कार्यवाहीबध्दल माहिती कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व उर्वरित माहिती करीता सदरचा अर्ज हा नागपूर येथील कार्यालयास हस्तांतर करणे आवश्यक होता, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, निश्चित अर्ज कोणत्या शाखेत दिला हे कळण्यास मार्ग नसल्यामुळे त्याबध्दलची कार्यवाही झाली नाही. असे असले तरी त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही राज्य जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी नागपूर यांनी पाठविलेली आहे. अपीलकर्ता यांना वेळोवेळी ही सर्व माहिती त्यांच्या अनेक अर्जाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व ही सर्व माहिती त्यांना सुध्दा माहित आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता वेळोवेळी माहितीचे अर्ज निरनिराळया कार्यालयामध्ये करीत असतात. परंतु असे असले तरी मुंबई येथील कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी नागपूर येथे आयोगापुढे सुनावणीस उपस्थित राहाणे आवश्यक होते. व त्यातून अपीलकर्ता यांच्या मुख्य तक्रारीचे निराकरण करुन घेता आले असते. व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई

(पान ३ वर ..)

करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.१.०८ च्या अर्जाचे अनुषंगाने महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकार, गृह निर्माण भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१ या कार्यालयातील संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी मुद्या क्रं. १ च्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९०९/२००९**

**१) श्री देवनाथ ताराचंद अतकरी,**
**जूना जरिपटका, माता मंदिर जवळ,**
**सी.एम.पी.डी.आय.रोड, नागपूर-४४००१४. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास नागपूर, ता.जि. नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, ता.जि. नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे जूना जरिपटका आय.आर.डी.पी. रोड मध्ये सौ.इंदुबाई अतकरीचे मालकी हक्काचे पक्के घर बाधीत झाल्याने ना.सु.प्र.ने दिनांक ७.६.०२ ला नोटीस क्रं.२ सौ.इंदुबाई अतकरीला देण्यात आले व सौ. इंदुबाई अतकरीला ना.सु.प्र.ने भूखंड क्रं.८७ वाटप करण्यात आले. नंतर भूखंड क्रं. ८७ बदलवून देण्यात आले. नवीन भूखंडाचे दस्ताऐवज तयार करण्याकरीता इंजी.मोरे यांनी जूने भूखंडाचे दस्ताऐवज (भूखंड क्रं.८७) श्री चिकाटे, ना.सु.प्र.नागपूर येथे जमा करण्यास सांगितले. करीता सौ.ईंदुबाई अतकरी यांना वाटप केलैल्या नवीन भूखंडा संबंधीत माहिती व दसताऐवजाची माहिती देण्यात यावी. ना.सू.प्र.ने नवीन भूखंडाचे दस्ताऐवज देण्यास फार जास्त विलंब केल्या कारणास्तव भूखंडावर विनाकारण व्याज आकारण्यात येत असल्यामुळे ते व्याज ई.डब्ल्यू.एस.नियमाप्रमाणे कमी करण्याबाबतची माहिती देण्यात यावी व आता पर्यंत भूखंड क्रं. ८७ ची जमा केलेल्या रक्कमे विषयी माहिती देण्यात यावी. ना.सु.प्र.ने बाधील लोकांना भूखंड क्रं.७७,७८,७९, ८० व ८१चे भूखंडा संबंधीत संपूर्ण माहिती सुधारित यादी प्रमाणे देण्यात यावी. वरील माहिती नोंदणी डाक द्वारे देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधन न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी

(पान २ वर ..)

दिनांक १७.८.०९ रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.९.०९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना १५ दिवसांचे आंत कार्यकारी अधिकारी तथा माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून संबंधीत संबंधीत नस्तीचे निरीक्षण करावे व आवश्यक असलेल्या कागदपत्रांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु निरीक्षण केल्यानंतर सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यात विभागीय अधिकारी (उत्तर विभाग) तथा माहिती अधिकारी यांनी भूखंड अदलाबदलीचा प्रस्तावा संदर्भात माहिती देण्यास नकार देवून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. माहिती अधिकारी यांनी भूखंड ८० बाबत दिशाभूल करणारी माहिती दिली. भूखंड ८० हा सौ.इंदुबाई ताराचंद अतकरी यांना अदलाबदलीच्या पस्तावा नुसार देण्यात आला आहे. हे दिलेल्या तीन प्रत नुसार सिध्द होत आहे. दप्तर दिरंगाईमुळे व्याज कमी करण्याबाबत व इ.डब्ल्यू.एस.नियमाप्रमाणे व्याज कमी करण्यात माहिती देण्यात आली नाही. सोबत भूखंड अदलाबदलीच्या संदर्भात त्यांनी तीन प्रती सादर केल्या आहेत. त्यामध्ये सचिव नागपूर यांनी दिलेल्या एका पत्राखाली श्रीयुत मोरे साहेब श्री अतकरी यांना पूर्वी भू.क्रं.१८ व ८७ देण्यास प्रस्तावित केले होते. परंतु नि.अ.यांनी पाठविलेल्या यादी देवनाथ यांना भू.खं.७९ व श्रीमती इंदुबाई यांना भू.क्रं.८० प्रत्येकी ५०० चौ.फुट वाटपाचे प्रस्तावित करण्यात आले असे नमुद केलेले दिसून येते.

तोंडी युक्तीवाद करताना अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ५ वर्षापासून ते ना.सु.प्र. कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जात आहे. परंतु त्यांना माहिती कोणीही देत नाही. व अशा प्रकारे कोणताही प्रस्ताव नाही असे उत्तर देतात. परंतु त्याच कार्यालयातून जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यामध्ये ७९ क्रमांकावर श्रीमती इंदुबाई ताराचंद अतकरी ११८, ३८.०० G+१ पक्का ८७, ५०० व शेवटच्या रकान्यात- T.S.No.११८ (malik makbuja) & १०२(Nazul Plot) belong to Smt. Indubai Tarachand Atkari & Shri Devnath Tarachand Atkari respectively. Earlier plot Nos. ८७ (५०० sq,ft.) & १६ ()३०० sq.ft. were proposed for allotment in favour of the two Atkari family. As per the request of the applicants & looking to the area of construction affected ११४१ sq.ft.of G+१ structure combinedly, allotment of two adjacent plots of ५०० sq.ft. (plot No.७९ & ८०) are recommended for approval instead of two plots of ८०० sq.ft.area against the two properties., अशा प्रकारची माहिती ही अपीलकर्ता यांना ना.सु.प्र.च्या कार्यालयातून उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ४.८.२००९ रोजी जी माहिती दिली ती चुकीची, अपूरी व दिशाभूल करणारी आहे असे दिसून येते. ना.सु.प्र.कार्यालयातील आज हजर झालेले जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा प्रस्ताव नसेलही. परंतु त्याच्या कार्यालयात निश्चितपणे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निर्णय झालेला आहे, हे वरीलप्रमाणे दिसून येते व ती ना.सु.प्र.कार्यालयाची जबाबदारी आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाहीव अपीलकर्ता

(पान ३ वर ..)

यांनी निरीक्षण करावे असे आदेश देवून जबाबदारी टाळलेली दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी सादर केलेल्या ना.सु.प्र.च्याच कार्यालयातील कागदपत्राच्या प्रमाणे अपीलकर्ता यांना भू.क्रं. ७९ व ८० च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.७.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी ना.सु.प्र.कार्यालयातून चौकशी करुन योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही ना.सु.प्र.चे अध्यक्ष यांनी करावयाची आहे. व त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने, अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

३) अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८२८/२००९**

**१) श्री इमरान इनायतुल्लाह चिश्ती,**
**हॉटेल अल जम जम चे मागे, आझमशहा चौक, मस्जिदजवळ,**
**सेंट्रल एव्हेन्यू रोड, नागपूर-२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(मुख्यालय),**
**नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, मा.कक्ष अधिकारी, वि.बा.सुपेकर, नगर विकास विभाग यांनी सभापती ना.सु.प्र.यांना पाठविलेले पत्र क्रामंक नासुप्र २२०७/पृष्ठ १७४/नवि-२६ दिनांक २७.८.२००८ या पत्राच्या अनुषंगाने नासुप्र कडून पाठविण्यात आलेल्या अहवालाची छायांकित प्रत मिळण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना कक्ष अधिकारी यांनी दिनांक २७.८.२००८ च्या पत्रान्वये अहवाल शासनास पाठविण्यात आलेला नाही. वरील पत्राच्या अनुषंगाने अहपाल पाठविण्यासंबंधी कार्यवाही सुरु आहे, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.९.०९ रोजी दिलेला दिसून येतो. व त्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत उपलब्ध असलेली माहिती देणे अपेक्षित आहे.

( पान २ वर ..)

कोणतीही कार्यवाही करुन माहिति देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलार्थी यांचे समाधान झाल्यामुळे तसेच शासनास अजून पर्यंत प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही असे अपीलार्थी यांना सांगितलेले आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यात आले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २७.८.०८ च्या पत्राप्रमाणे अजून पर्यंत प्रस्ताव कां पाठविण्यात आला नाही, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा विषय हा धोरणात्मक बाब असल्यामुळे त्यावर विचार विनियम सुरु असून ही प्रक्रिया सुरु आहे व त्यामुळे वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१०/२००९**

**१) श्री टिकाराम शिवराम सोनटक्के,**
**ट्रेझरी कॅालनी, पांढराबोडी रोड, भंडारा, ता.जि.भंडारा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर,**
**सिव्हील लाईन, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, चंद्रपूर, ता.जि.चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, चंद्रपूर यांचेकडे गृह निर्माण सहकारी संस्था भंडारा मार्फत शासनाकडून घरबांधणीकरीता रुपये ३८,८५०/- कर्ज घेतलेले होते. कर्ज वसुली वेतनातून दरमहा रुपये २१०/- प्रमाणे सुरु होती. परंतु शासनाने वरील ३ महिन्याची वसुली अप्राप्त असल्याचे कळविल्यामुळे व त्या कालावधीत मी का.अ.पाट.प्रकल्प अन्वेषण विभाग, चंद्रपूर येथे कार्यरत असल्याने माहिती पाठविण्याबाबत पत्रव्यवहार सुरु आहे, अशी माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.६.०९ रोजी आपण मागीतलेली माहिती फार जूनी असून जूने अभिलेख तपासून माहिती देण्याकरीता बराच विलंब लागणार आहे, असे कळविलेले दिसून येते. तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २६.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.९.०९ रोजी दिलेला दिसून

(पान २ वर..)

येतो.व अपीलकर्ता यांना दिनांक ११.९.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांना दिनांक ११.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८३३/२००९**
**अपील क्रमांक ८३४/२००९**
**अपील क्रमांक ८३५/२००९**

**१) श्री प्रमोदकुमार हरीश्चंद्र अग्रवाल,**
**मनोहर चौक, पोलीस लाईन समोर, गोंदिया,ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.अहेरी,**
**ता.अहेरी, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.अहेरी,**
**ता.अहेरी, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. परंतु त्यांना माहिती मिळाल्याबाबतचे निवेदन त्यांचे आयोगाकडे सादर केलेले आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक २.११.२००९ अन्वये, त्यांच्या वरील अपीलांचे संदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगास लेखी निवेदन सादर केले असून अपील खारीज करण्याबाबत विनंती केली आहे. त्यामुळे सदरचे तीनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील **क्रमांक ८३३/२००९, अपील क्रमांक ८३४/२००९ व अपील क्रमांक ८३५/२००९ खारीज करण्यात येत आहेत.**

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१९/२००९**

**१) श्री बाबुराव मारोती ठवकर,**
**रा.लोहारा, ता.कुही, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, कुही,**
**तहसिल कार्यालय, कुही, ता.कुही, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा पटवारी प.ह.नं.५२, चिपडी,**
**ता.कुही, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा पटवारी, प.ह.नं.५२, चिपडी, ता.कुही यांचेकडे, मौजा कटारा प.ह.नं.५२ येथील गट नं.१६२/१ व गट २००/२ या शेतावर दिनांक १३.२.२००९ रोजी घेतलेल्या फेर फार कोणत्या आदेशाप्रमाणे घेतले. (२) सदर जिल्हा न्यायालय नागपूर केस नं. २३९/२००२ चे आदेशाप्रमाणे अपील सुरु असताना व दिवाणी न्यायालय, कुही यांचे आदेशाला स्थगिती असतांना असा फेर फार कोणत्या कायदयानुसार घेण्यात आला, अशी माहिती रजिस्टर पोस्टाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे, प्रश्नांची उत्तरे देण्याची तरतुद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नाही. करीता सदर प्रश्नांची उत्तरे देण्याची कार्यवाही या कार्यालयातून करता येणार नाही, असा निर्णय दिल्याचे दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे वकील ॲड.श्री लिखीते यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आतापर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १६.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु कोणतेही पत्र त्यांना आतापर्यंत मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच दिनांक २५.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांचा मुलगा यांना रेकार्ड उपलब्ध करुन दिला होता व त्याबध्दलची पोच ग्राम अधिकारी श्री तितीरमारे यांनी सादर केली. परंतु, अपीलकर्ता यांचे आजही असे म्हणणे आहे की, त्यांना अजूनपर्यंत माहिती दिली नाही. व माहिती देण्याची

( पान २ वर ..)

टाळाटाळ केली जाते. जन माहिती अधिकारी यांनी मात्र पत्र पाठविलेल्या पत्राची कोणतीही प्रत सादर केली नाही. परंतु पोस्टाची दिनांक १६.७.२००९ ची पाठविल्याची रसिद दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना त्यांना प्रश्नांच्या संदर्भात माहिती देता येत नाही, ऐवढेच ज्ञान आहे असे दिसून येते. परंतु, प्रश्न उत्तर कोणत्या स्वरुपाचे आहे. त्यातून विचारलेल्या माहितीची कार्यवाही झालेली आहे काय, त्या कार्यवाहीची कागदपत्रे, टिपणी किंवा निर्णय अर्जदारास अपेक्षित असतात. व त्यामुळे कोणत्याही प्रकारचा प्रश्न विचारला की, प्रश्न उत्तर विचारता येत नाही असे ठोकळेबाज उत्तर दिले जाते. यापुढे तसे आढळून आल्यास त्या त्या अधिका-यांना शास्ती करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. प्रश्न काहीही असो, त्याबाबत विचार करुन माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असते. त्यासाठी थोडी बुध्दी असल्यास ती चालवायची असते ! जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपीलकर्ता हे त्यांचे नातेवाईक आहे. परंतु ते कार्यालयात येतात व त्यांना कागदपत्रे दाखविली की ते घेत नाही व निघून जातात. असे असल्यास अपीलकर्ता यांना दिनांक १६.७.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी ती संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना पुन्हा कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अर्जदाराने मागितलेली संपूर्ण माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्या, अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८२७/२००९**

**१) श्री जागेश्वर गजलाल लिल्हारे,**
**विद्यानिकेतन कनिष्ठ महाविद्यालय, देवरी रोड, आमगांव,**
**पो.ता.आमगांव, जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,**
**सिव्हील लाईन्स, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,**
**सिव्हील लाईन्स, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, यांचेकडे अधिक दोन स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रमातील निर्देशकांना त्यांचे प्रथम नियुक्ती पासून नियमित मान्यता व वेतनवाढ प्रकरण या संबंधाने एकुण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सद्यस्थितीत आपल्या प्रस्तावावर कार्यालयीन कार्यवाही सुरु आहे ती पुर्ण झाल्यावर माहिती पुरविण्यात येईत व त्यामुळे प्रश्नांची उत्तरे किंवा खुलासा देणे अपेक्षित नाही, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.४.०९ रोजी देण्यात आलेला असून कार्यवाही काय झाली हे अभिलेख स्वरुपात नाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती व माहितीचा अधिकार या व्याख्येप्रमाणे विशिष्ट नमुन्यात माहिती तयार करुन देणे व प्रश्नांची उत्तरे देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अपील निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भामध्ये आकलन झालेले दिसून येत नाही. एखादया प्रश्नावर कार्यवाही काय झाली हा जरी पश्न असला तरी झालेल्या कार्यवाहीची किंवा टिपणीची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित

(पान २ वर ..)

असते. जन माहिती अधिकारी यांचे मत विचारले तर माहिती देता येत नाही. परंतु कार्यवाहीतून उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तथापि, जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रश्नांचे स्वरुप समजून घेवून उत्तरे देणे अभिप्रेत आहे. माहितीच्या अधिकारात अशा प्रकारचे उत्तर दिल्यास कोणत्याच अर्जाच्या बाबतीत माहिती देणे शक्य होणार नाही. परंतु प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे ही, माहिती दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यांत येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १३६/२००९**

**१) श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे,**
**शिवशक्ती नगर, सुतगिरणी जवळ,**
**अमरावती.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अमरावती.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ६.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार आज गैरहजर आहे. तक्रारदार जेलमध्ये असल्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकत नाही असे त्यांच्या मुलाने पत्र दिले आहे. गैरतक्रारदार तथा उत्तरवादी हजर आहेत. व त्यांनी खुलासा सादर केला आहे.

२. तक्रारदार यांचे आयोगापुढील अपील क्रमांक २३३१/०७ मध्ये दिनांक १२.१२.०८ रोजी आपल्या निर्णयाच्या आदेश क्रमांक १ प्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी तक्रार केलेली आहे. त्यावर गैरतक्रारदार यांनी असे सांगितले की, तक्रारदार यांना दिनांक १७.२.२००९ रोजी संपुर्ण मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली आहे. दिनांक १२.१२.०८ रोजी जर निर्णय झालेला असेल तर त्या निर्णयाच्या प्रती हया जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झाल्यानंतर १० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतरही तक्रारदार यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे आक्षेप घेणारे पत्र दिलेले आहे. त्यात सुनावणी दरम्यान पोलीसकडे पाठविलेल्या दस्तऐवजांच्या बडतर्फ आदेशांच्या प्रती व इतर सर्व दस्तऐवजाच्या प्रतीची माहिती पुरविण्याबाबत झेरॉक्स प्रतीवर प्रमाणित करुन आदेश केलेले आहे असे कळविलेले आहे असे नमुद केले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी तथा गैर तक्रारदार यांनी असे सांगितले की, त्याबाबतही त्यांना दिनांक १७.२.२००९ च्या पत्रात कळविले आहे की, वरील सर्व वसुलपात्र

(पान २ वर ..)

रकमेचे पारित मुळ प्रमाणक हे पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांचेकडे तपास व पुराव्याचे कामी त्यांनी मागणी केल्यामुळे सादर केले आहे व त्यामुळे ते पुरविता येत नाही. दिनांक १७.२.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती संपूर्ण माहिती ही त्यांच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात उत्तर देण्यात आलेले दिसून येते. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ती उत्तरे अपेक्षित नाही. तरी सुध्दा ती दिलेली आहे. कार्यकारी अभियंता यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

खुलासाः "(१) मा.राज्य माहिती आयोग, नागपूर यांचे दिनांक १२.१२.२००८ चे पारीत आदेशात दिलेल्या निर्देशानुसार मुद्येनिहाय माहिती बाबत अर्जदार श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे, सहाय्यक अभियंता (यां) यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिप/पाबं/स्था-१/६१८/२००९ दिनांक १७.२.२००९ नुसार पंजिबध्द डाकेने अहवाल पत्र पाठविण्यात आलेली आहे. त्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आली आहे. (२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश क्रमांक जि.प./पाबं/स्था-१/७१२/२००३ दिनांक २८.२.२००३ नुसार श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे, सहायक अभियंता (यां), सिंचन विभाग, जि.प.अमरावती यांचे विरुध्दचे खाते चौकशीमध्ये चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त(चौकशी) आयुक्त कार्यालय, अमरावती यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. चौकशी अधिका-याने संबंधीतास चौकशी मध्ये नैसर्गिक न्याय तत्वानुसार संधी देण्यात आलेली होती. चौकशी अधिका-याने सादर केलेल्या चौकशी अहवालाची पडताळणी करुन श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे, सहायक अभियंता (यां.) हे रुपये ७५,१९,८५७/- चे वसुलीस पात्र असल्याचा निष्कर्ष काढल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांनी चौकशी अहवालाची तपासणी करुन मु.का.अ. यांचे आदेश क्रमांक जिप/पाबं/स्था-१/२२८०/२००७ दिनांक ६.६.२००७ नुसार अंतिम आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांनी केलेला आरोप मान्य करता येणार नाही. (३) परिच्छेद क्रं.३ मध्ये नमुद केलेल्या बाबी हया असंसदीय भाषेत असल्यामुळे मान्य करता येणार नाही. (४) श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे, सहाय्यक अभियंता(यां) यांचे विरुध्दचे खाते चौकशी प्रकरणात त्यांनी मागितलेले दस्ताऐवज त्यांना दिनांक १५.११.२००० रोजी पुरविण्यात

( पान ३ वर..)

आलेले आहे. (५) या प्रकरणी पुढील सखोल चोकशी ही राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांचेकडे तपासणीसाठी कार्यान्वीत आहे. तेव्हा सत्यता पडताळून पुढील कार्यवाहीची दिशा ठरेल. (६) हया प्रकरणाचे संबंधीत जबाबदार असणा-या वरिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांचेवर फौजदारी गुन्हा दिनांक २६.६.२००६ रोजी पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती येथे दाखल करण्यात आलेला आहे. हया प्रकरणाची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांचे मार्फत सुरु आहे तेव्हा श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे, सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) यांना आकसापोटी त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला असे त्यांचे म्हणणे योग्य नाही. करीता श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे, सहाय्यक अभियंता(यांत्रिकी) यांनी आयोगास पुन्हा सुनावणी घेण्याबाबत केलेली विनंती मान्य करुन पुन्हा सुनावणी घेणे उचित होणार नाही. कारण सदर प्रकरणाचे अनुषंगाने कार्यवाही जवळजवळ पुर्ण झ ालेली आहे."

वरील खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना खुलाशाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२५/२००९**

**१) श्री महादेव बाजीराव वाघमारे,**
**मु.कवडशी, पो.तळोधी, ता.चिमुर, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, चिमूर, ता.चिमुर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, चिमूर, ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, पंचायत समिती चिमूर यांचे कार्यालयात, (१) दिनांक १९.६.०९ ला सं.वि.अ. यांना श्री जगदीश रामाजी ठाकरे यांनी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. (२) दिनांक ५.११.०८ ला संविअ पंस चिमूर यांना दिलेल्या श्री महादेव बाजीराव वाघमारे यांचे अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (३) अमोल श्रीराम पाटील मु.कवउसी यांचे घरकुल संबंधी सर्व कागदपत्रे, चौकशी अहवाल, पात्रतेसंबंधी ग्रामसभेचा ठराव जागेचा नकाशा, कर आकारणी बिपीएल दाखला व इतर घरकुलात आवश्यक असलेली सर्व माहिती (४) वामन सुकरु मेश्राम, कवसाबाई सुकरु मेश्राम, राजू मंगरु रामटेके, अरुण मोतीराम शेंडे, नाना कवडु शंभरकर यांचे घरकुल संबंधी मुद्या क्रमांक ३ प्रमाणे सर्व माहिती, मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.९.२००९ रोजी कनिष्ठ अभियंता श्री आर.बी. चंदनखेडे यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे दिनांक २३.९.२००९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता गैरहजर असले तरी अपूरी माहिती दिली व रशिरा दिली या कारणास्तव अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने देण्याचे संदर्भात आयोगाचे निदर्शनास आणले की, सदरची माहिती श्री आर.बी. चंदनखेडे, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, चिमूर यांचेकडे असल्यामुळे दिनांक ३०.६.२००९ रोजी त्यांना माहिती सादर करावी याकरीता पत्र दिले होते. व त्यानंतरही माहिती सादर केली नाही म्हणून वारंवार

( पान २ वर ...)

स्मरणपत्रे देण्यात आलेली आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती विलंबाने उपलब्ध करुन दिली. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा श्री आर.बी. चंदनखेडे उपस्थित झ ााल्याशिवाय कोणत्याही प्रकारे निर्णय देता येत नव्हता. त्यामुळे श्री आर.बी. चंदनखेडे यांना बरेच पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही सुनावणी झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिली आहे. यावरुन श्री आर.बी. चंदनखेडे, कनिष्ठ अभियंता जबाबदार आहे असे दिसून येते व अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात. अपूर्ण माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी जी माहिती विचारलेली आहे त्या संदर्भात तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना १९ पाने देण्यात आली व गट विकास अधिकारी यांचेकडे माहिती मिळाल्याचे मान्य केले. परंतु, अर्जदाराच्या दिनांक ५.११.२००८ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे कदाचित अपीलकर्ता यांनी माहिती अपूर्ण मिळाली असे म्हटले असावे. परंतु मुद्या क्रमांक ३,४ व ५ च्या संदर्भात माहिती दिलेली दिसून येते. मात्र दिनांक १९.६.२००९ व दिनांक ५.११.२००८ च्या तक्रारीवर कोणतीही चौकशी केलेली आहे असे दिसून येत नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांना त्याबध्दलची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्रं. १ व २ मध्ये उल्लेख केलेल्या तक्रारीच्या चौकशीचा अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२३/२००९**

**१) श्री सत्यजीत गौरीशंकर चंद्रीकापूरे,**
**कनिष्ठ लिपिक(करमणुक कर विभाग)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालयात,(१) ज्या कर्मचा-यांनी विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण केलेली नाही परंतु वेतन वाढ देण्यांत आलेली आहे. तसेच अश्या कर्मचा-यांना पाचवा वेतन व सहावा वेतन आयोगाच्या शिफारशी देण्यात आलेल्या आहेत. त्याची यादी वर्गवारी नुसार (एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., व्ही.जे., एन.टी., ओपन) (२) दुय्यम परीक्षा व महसुल अर्हता परीक्षा पास नाही परंतु अ.का. व नायब तहसिलदार या पदाची वेतन श्रेणी देण्यांत आलेल्या कर्मचा-यांची/अधिका-यांची यादी वर्गवारी नुसार. माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.९.२००९ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे अपील खारीज केलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्या संदर्भात प्रथम अपीलाचे निर्णयात जे विवेचन केलेले आहे ते स्वयंस्पष्ट आहे. जी माहिती उपलब्ध आहे तीच उपलब्ध करुन देता येते. माहिती तयार करुन देता येत नाही. त्यामुळे सर्वच कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्या लागतील व त्याकरीता येणारा खर्च अपीलकर्ता यांनाच करावा लागेल. व त्यामुळे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या

( पान २ वर ..)

माहितीच्या संदर्भात पुर्वी कार्यालयात संकलीत केलेली नसेल तर यापुढे तशा प्रकारची माहिती अधिनियमाचे कलम ४ प्रमाणे अपेक्षित असल्यामुळे ती तयार करुन ठेवणे आवश्यक आहे. व त्याकरीता जिल्हाधिकारी यांनी विशेष आदेश काढून तशा प्रकारची माहिती अद्यावत असण्याच्या दृष्टीने व कलम ४(१) चे अंमलबजावणीचे दृष्टीने तयार करणे आवश्यक आहे. तथापि, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे. परंतु अधिनियमाचे कलम ४(१) च्या अंमलबजावणी करीता मात्र आदेश देणे आवश्यक आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे. तथापि, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी ज्या कर्मचा-यांनी विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण केलेली नाही परंतु वेतन वाढ देण्यात आलेली आहेत. तसेच अशा कर्मचा-यांना ५ वा व ६ वा वेतन आयोगाच्या शिफारशी देण्यात आलेल्या आहेत त्यांची यादी वर्गवारीनुसार (एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., व्ही.जे., एन.टी., ओपन) तसेच दुय्यम परीक्षा व महसुल अर्हता परीक्षा पास नाही परंतु अ.का. व नायब तहसिलदार या पदाची वेतन श्रेणी देण्यांत आलेल्या कर्मचा-यांची/अधिका-यांची यादी वर्गवारी नुसार अद्यावत करुन अधिनियमाचे कलम ४(१) ची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने कार्यालयात हा निर्णय मिळाल्यापासून ३ महिन्याचे कलावधीत उलब्ध करुन ठेवण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, नागपूर यांना स्वतंत्रपणे, पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२४/२००९**

**१) श्री गणपत पांडुरंगजी निमसटकार,**
**ह.मु.मॅा भवानी इलेक्ट्रीकल्स वर्क, पोस्ट ऑफिसजवळ,**
**गडचांदूर ता. कोरपना, जिल्हा चंद्रपूर-४४२९०८.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, वणी**
**ता.वणी, जिल्हा यवतमाळ.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालाठी, साजा क्रं.३०,**
**मौजा ब्राम्हणी, ता. वणी, जिल्हा यवतमाळ-४४५३०४.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिलदार कार्यालय, वणी, जिल्हा यवतमाळ यांचेकडे, सौ.मंजूळा(बहिण) हिचे नांव ७/१२ मधून कमी करण्याबाबत अहवाल मिळण्याबाबत माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २१.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २९.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना तहसिलदार यांनी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व ते माहिती घेण्यास जातात परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन देत नाही. परंतु जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासाः "अहवाल सादर करण्यात येते की, अर्जदार श्री गणपत पांडुरंग निमसटकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नमुना नं. १ जोडपत्र-अ मध्ये दिनांक ५.६.२००९ रोजी बहिन सौ. मंजूळा रामचंद्र माणुसमारे हिचे नांव ७/१२ मधून कमी करण्याबाबत अहवाल मिळण्याबाबत तहसिलदार वणी यांच्याकडे अर्ज केला त्यानुसार लगेच अर्जदारास दिनांक ६.६.२००९ रोजी योग्य ती शासकिय फी चा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत पोस्टाने पत्र देवून कळविण्यात आले. त्याची पोच उपलब्ध दप्तरी आहे. त्यानुसार अर्जदार दिनांक ६.७.२००९ रोजी

( पान २ वर ..)

माझ्या कार्यालयात माहिती घेण्यास हजर झाले. त्यांनी माहितीच्या अर्जाद्वारे दोन अर्ज जोडपत्र-अया कार्यालयात सादर केले होते. त्यापैकी त्यांनी एका अर्जाची माहिती शासकिय फी चा भरणा करुन ताब्यात घेतली. परंतु बहिनीचे नांव ७/१२ मधून कमी करण्याबाबतच्या अहवालाची माहिती घेण्यास नकार दिला.

(२) यांनतर अर्जदारांनी दिनांक २१.७.२००९ रोजी नमुना-ब मध्ये सादर केलेला अर्ज पोस्टाद्वारे दिनांक २४.७.२००९ रोजी या कार्यालयात प्राप्त झाला. त्यानुसार दिनांक २९.७.२००९ रोजी अर्जदार श्री गणपत पांडुरंगजी निमसटकर यांना पुन्हा शासकिय फी चा भरणा करुन माहिती घेवून जाण्याबाबत कळविण्यात आले. तशी पोस्टाची पोच दप्तरी आहे.

(३) अर्जदार श्री गणपत पांडूरंग निमसटकर व त्यांची बहिन नामे मंजूळा ज.रामचंद्र माणुसमारे यांचा प्रापर्टीवाद असून यतीने अर्जदाराचे बनावट सहया घेवून माझा हक्क हिरावत असल्याबाबत मा. उपविभागीय अधिकारी वणी यांचेकडे तक्रार दाखल केली त्यानुसार कार्यवाही झालेली आहे.

(४) पुनश्च १७.८.२००९ रोजी अर्जदारास माहिती घेवून जाण्याबाबत पोस्टाने पत्र देवून कळविण्यात आले व पोस्टाची पोच दप्तरी लावण्यात आली परंतु अर्जदार श्री गणपत पांडुरंग निमसटकर हे माहिती घेवून जाण्यासाठी कार्यालयात हजर न रहाता पत्रव्यवहार करतात. त्यावरुन त्यांना काय म्हणावयाचे आहे हे कळत नाही."

यावरुन अपीलकर्ता हेच माहिती उपलब्ध करुन घेत नाही असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्र उपलब्ध होतात व अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावयाची आहे. ती प्रक्रिया ही वेगळी असून त्याचा संबंध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीशी नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या प्रकरणात कार्यवाही करुन देण्याच्या दृष्टीने माहिती घेणे न घेणे असेच त्यांचे वर्तन दिसून येते. त्यांना माहिती घ्यावचाची असल्यास अतिरिक्त खर्चाचा भरणा करणे आवश्यक आहे. व माहिती अपूर्ण असेल तर त्याप्रमाणे तक्रार करणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती घ्यावयाची असल्यास खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२७/२००९**

**१) श्री उमेश गोंडू भारशंकर,**
**मु.तिमरम, पो.गडडीगुडम, ता.अहेरी, जि.गडचिरोली.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी, जि.गडचिरोली.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**शासकिय माध्यमिक आश्रम शाळा, देवलीपेठा, ता.अहेरी,**
**जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, (१) सत्र २००९-१० मध्ये शा.मा.आश्रम शाळा देचलीपेटा ता.अहेरी यांना शासनाकडून शालेय क्रिउांगणाकरीता निधी पुरविण्यात आला असून त्याचा इस्टीमेट व नकाशाची माहिती मिळण्याबाबत. (२) सत्र २००९-१० मध्ये शा.मा.आश्रम शाळा देचलिपेठा ता.अहेरी शालेय क्रिडांगणाकरीता केलेल्या खर्चाच्या पावत्या मिळण्याबाबत. (३) तसेच श्री टि.बी. मेश्राम त्याची पत्नी यांनी अर्जदाराच्या कुटूंबाची बदनामी केली त्याबध्दल आपले कार्यालयीन पत्र क्रं.आस्था-०९/प्र.क्र./का-१/(ब)/२४४५/०९ कार्यालय प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभाग, अहेरी जि.गडचिरोलीच्या अनुषंगाने आपल्याकडे पाठविण्यात आलेल्या अहवालाच्या प्रत मिळण्याबाबत., अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.१०.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी तथा सहायक प्रकल्प अधिकारी यांनी मुख्याध्यापक, शासकिय मा. आश्रम शाळा यांना माहितीच्या संदर्भात आदेश देण्यात आलेले दिसून येते. त्यावर मुख्याध्यापक शासकिय मा.आश्रम शाळा देचलीपेटटा यांनी प्रकल्प अधिकारी यांचेकडे सदर पत्रातील माहितीच्या छायांकित प्रती मागण्यात आल्या होत्या. या ठिकाणी छायांकित प्रती काढण्याची सुविधा नसल्यामुळे व दुर्गम भाग असल्यामुळे त्यासाठी विलंब झाला. अर्जदाराने मागितलेली माहिती पुर्ण देण्याचा प्रयत्न केला

( पान २ वर ..)

आहे. अर्जदाराने मागितलेली माहिती दिनांक ८.९.२००९ रोजी रजिस्टर पोस्टाने ३० दिवसांचे आंतच पाठविली. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी मुद्या क्रं. २ ची माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जामध्ये त्या देयकाची छांयांकित प्रत त्यांनी मागितलेली नव्हती. त्यानंतर मागितलेली आहे. त्यामुळे दिली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, ते अत्यंत दुर्गम भागात व महाराष्ट्र राज्याच्या छत्तीसगड राज्याशी लागून असलेल्या हद्यी जवळ राहातात. व झेरॉक्स करावयाची असल्यास त्यांना २० कि.मी. अंतर जावे लागते. तरीही अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२८/२००९**

**१) श्री रमेश रामाजी राठोड,**
**२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-४४००३४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव, ता.जि.जळगांव** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**पोलीस उपविभागीय कार्यालय, पाचोरा, ता.पाचोरा, जि.जळगांव.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा यांचे कार्यालयात, दिनांक २८.५.०९ रोजी पो.स्टे.पिंपळगांव (हरे) येथे अश्विनी वंजारी व इतर यांचे विरुध्द तक्रार अर्ज दिला होता. त्यावर कोणती कार्यवाही झाली, त्याची माहिती हवी आणि त्याची प्रत हवी, अशी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक २०.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून यते. परंतु समाधान न झ ााल्यामुळे त्यांनी दिनांक २०.८.२००९ रोजी प्रथम अपील हे अप्पर पोलीस अधीक्षक तथा पोलीस अधीकारी कार्यालय, जळगांव यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्ता सुनावणीस हजर न राहील्यामुळे अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

(पान २ वर..)

३. अपीलकर्ता यांना दिनांक २०.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून ती स्वयंस्पट असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४५/२००९**

**१) श्री रामजीलाल सत्यनारायण शर्मा,**
**तंबाखु ओठी, कामठी, ता.कामठी, जिल्हा नागपूर-४४१००२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(सं.व सं.),**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.विभाग क्रं.१,**
**काटोल रोड, सदर नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता(सं.व सं.),**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.विभाग क्रं.१,**
**काटोल रोड, सदर नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, हमारे घर क्रमांक एन/७१३/, ७१४ (गुड ओली कामठी स्थित) के उपर से जो अतिक्रमण घातक लधुदाब विज वाहिणी (एल.टी.लाईन) पोल क्रं.के.आर.१९ (नया बाजार विज वितरण केंद्र) के माध्यम से हमारे घर को विशेष धेरे में लेते हुये इसी घर के बाजू स्थित छोटी संक्रि गली में स्थित ट्रांसफार्मर तक जा रही है उसे अतितत्काल तौर पर हटाने संबधी कार्यवाही एवंम कारवाई से संबधीत जानकारियां प्राप्त करने हेतू, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी एकुण ३ मुद्यांच्या संदर्भात सविस्तर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात पुन्हा अपीलकर्ता यांना सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परतु, तरीही समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा अर्थबोध होत नाही असे दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. वास्तविक त्यांच्या अर्जाचे

( पान २ वर..)

संदर्भात कोणत्याही माहितीचे निश्चित असे वर्णन केलेले नसल्यामुळे तो अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून संपूर्ण प्रकरण समजून घेतल्यानंतर, अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना योग्यरित्या माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या घराच्या बाजूला विज चोरी पकडण्यात आलेली होती. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ती विज चोरी त्यांची नाही. परंतु त्याबाबत प्रकरण सुरु आहे व न्यायालयात केस दाखल आहे असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आतापर्यंत त्यांनी अनेक तक्रारी केल्या आहेत परंतु चौकशी झालेली नाही व त्याबाबतचे उत्तर सुध्दा देण्यात आलेले आहे. त्यातही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांना पत्र क्रमांक २१९३, दिनांक २०.८.२००९ अन्वये त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना स्वत: त्या पत्राची कार्यवाहीची गरज नसल्यामुळे ते दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध झाली आहे असे भासवित आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४४/२००९**

**१) श्री तात्यासाहेब तुकारामजी डाहाके,**
**१६, बँक कॅालनी, दुर्गानगर, मानेवाडा रोड, नागपूर**
**ता.जिल्हा नागपूर-४४००२४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**४ था माळा, मंत्रालय, मुंबई-३२.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी (वि.शि.)**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था माळा मंत्रालय, मुंबई-३२.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे शासन निर्णय क्रं.केएसयु-१७९९/(१०९)/विशि-२, दिनांक ४.१०.२९९९. उपरोक्त शासन निर्णयानुषंगाने ४ थ्या वेतन आयोगातून ५ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीच्या मंजूरीच्या टिपणीच्या प्रती जी वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांकाने निर्गमित झालेल्या दिनांक ४.१०.९९ च्या शासन निर्णया संबधीत आहे. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.१०.२००९ रोजी कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी श्री विकास तु.कदम यांनी, उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित अर्जात नमुद करण्यात आलेल्या कार्यवाहीची नस्ती या कार्यालयात शोध घेतला असता आढळून येत नाही. तरी नस्तीच्या टिपणीची प्रत आपणास उपलब्ध करुन देणे शक्य नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ााल्यामुळे दिनांक ३.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी ४ थ्या वेतन आयोगातून ५ व्या वेतन आयोगाच्या संदर्भात सुधारित वेतन श्रेणीच्या मंजूरीच्या संदर्भात कनिष्ठ वेतन श्रेणीला जास्त वेतन श्रेणी व वरिष्ठ वेतन श्रेणीला कमी वेतन श्रेणी याबाबतची तफावत

( पान २ वर..)

आयोगाचे निदर्शनास आणली. व त्याकरीता त्यांना त्या टिपणीची आवश्यकता आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मुळात दिनांक ४.१०.१९९९ चा शासन निर्णय चुकीचा आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे व त्याकरीता शासनाकडे तक्रार करणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना टिपणीची आवश्यकता आहे असे त्यांचे म्हणणे आहे व त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी पुन्हा सदरच्या नस्तीचा कसून शोध घ्यावा व अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत संबंधीत नस्तीचा कसून शोध घेवून टिपणी विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, संबधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९४/२००९**

**१) श्री संजय लक्ष्मण ढोरे,**
**वार्ड क्रं.३, हॅाटेल एम्बसीजवळ, खापरखेडा,**
**ता.सावनेर, जिल्हा नागपूर-४४११०२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक,**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपविभागीय अधिकारी,**
**कामठी विभाग, ता.कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय कामठी, ता.कामठी यांचेकडे पो.स्टे.खापरखेडा येथील कर्मचारी तसेच अधिका-यांच्या घरभाडे भत्याबाबत एप्रिल २००८ ते आजपर्यंत. पो.स्टे.खापरखेडा येथील पोलीस शिपाई, अधिकारी व जे विदयुत मंडळाच्या गाळयामध्ये राहतात त्यांची संपूर्ण यादी व दरमहा, घरभाडे भत्ता घेत असलेल्याची माहिती देण्याची तसदी घ्यावी, अशी माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (त्र) अन्वये आपण मागितलेली माहिती व कागदपत्रे कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंधीत असल्याचे दिसून येत नाही. सदरची माहिती ही पोलीस विभागाची आंतरिक व्यवस्थापनाचा प्रयत्न असून आपला याबाबत कोणताही संबंध दिसून येत नाही. करीता माहिती नाकारण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.९.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे विरुध्द पोलीस स्टेशन

(पान २ वर ..)

मध्ये फसवणुकीच्या गुन्हयाच्या संदर्भात गुन्हा दाखल झालेला असल्यामुळे त्यांची सदरची माहिती मागण्याचा प्रयत्न केला आहे, असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. व त्यामुळे मागितलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाशी व हितसंबंधाशी संबंधीत नसल्यामुळे उपलब्ध करुन देण्यात आली नाही असे आयोगास सांगितले. परंतु त्याबाबतही कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही त्यांच्या स्वहिताकरीता त्रास देण्याचे दृष्टीने मागीतलेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिक व्यापक हिताशी संबंधीत नसून त्यांच्या स्वहिताच्या संदर्भात असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४३/२००९**

**१) श्री पांडुरंग गणपतराव सपकाळ,**
**रा.करंभाड, पो.ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर-४४११०५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,**
**शिक्षण विभाग, पंचायत समिती, पारशिवनी,**
**ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**शिक्षण विभाग, पंचायत समिती, पारशिवनी,**
**ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती, पारशिवणी यांचेकडे, शालेय पोषण आहारामध्ये झालेल्या गैर व्यवहाराच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीचे वर्णन त्यांनी योग्यरित्या केलेले दिसून येत नाही. व त्याबाबत अपीलकर्ता यांना दिनांक २३.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ३.११.०९ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांनी, माहितीचा केवळ वर्णनात्मक स्वरुपात उल्लेख केलेला आहे त्यामुळे त्या वर्णनाचे अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती योग्य आहे याची आपणास जाणिव करुन देण्यात येत आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदयानुसार जि.प.प्राथ शाळा पारशिवनी क्रं.१ मधील कोणत्याही शिक्षकांविरुध्द विभागाने कार्यवाही प्रस्तावित केलेली नाही त्यामुळे आपण मागीतलेला तपशिल पुरविण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. व त्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे दिसून येते. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती

( पान २ वर..)

दिशाभूल करणारी आहे व कोणत्याही प्रकारची कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने संपूर्ण माहिती तपशिलात कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना पुन्हा पोस्टाने दिनांक ३.११.२००९ चे पत्राचे उत्तर पाठविण्यात आलेले आहे व त्यातून त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध होईल. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९६०/२००९**

**१) श्री  शिरीष वामनराव नागपूरकर,**
**महानगर पालिका हॅास्पीटल समोर, झेंडा चोक,**
**झिंगाबाई टाकळी, नागपूर-४४००३०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,**
**मेडीकल कॅालेज, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,**
**मेडीकल कॅालेज, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे, अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याचे दृष्टीने अर्जदार श्रीमती माया प्रदिप नागपूरकर यांचा वारसदार मुलगा मयुर प्रदिप नागपूरकर यांचा नावाचा समावेश करण्याबाबत. संबंधीत प्रकरणातील दस्ताऐवज पुरविण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.७.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मुद्या क्रमांक १,३ व ४ मधील त्यांना पत्रव्यवहाराच्या प्रतीची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली होती. तसेच टिपणीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाही. मुद्या क्रमांक २ प्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये जी पत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत ती त्यांनाच पाठविलेली पत्रे दिलेली आहेत व त्यामुळे

( पान २ वर..)

जी माहिती त्यांनी मागितली नाही किंवा जी माहिती त्यांना पुर्वीच उपलब्ध आहे तीच पत्रे त्यांना पाठविलेले आहे. यावरुन त्यांची दिशाभूल केलेली आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही.त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,(त्यांनी अर्ज वाचलेला आहे) असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अर्जदाराच्या अर्जात जी माहिती मुद्येनिहाय मागितलेली असते ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते व त्यावरुनच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी पाहिलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये स्पष्टपणे माहिती मागितलेली आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी, नागपूर यांना पाठविलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती तसेच त्यांचेकडून प्राप्त पत्रव्यवहाराच्या प्रती, संबंधीत प्रकरणात आपण आपल्या वरिष्ठ कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व त्यांचेकडून प्राप्त पत्रव्यवहाराच्या प्रती, तसेच संबंधीत प्रकरणातील टिपणी किंवा मा.खासदार यांनी पाठविलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती एवढया स्पष्ट शब्दात माहिती मागितलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सुनावणी घेतली नाही व त्यांना दिलेली वैधानिक जबाबदारी टाळलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना एकुण ४ मुद्यांच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.६.२००९ च्या अर्जातील मागितलेली माहिती मुद्येनिहाय कागदपत्राच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकता्र यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी कार्यालयीन कामकाजाची तारीख व वेळेत संपर्क साधून प्रती उपलब्ध करुन घ्याव्या. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहील, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५२/२००९**

**१) श्री अशोक एकनाथ कुकडे,**
**मु.बांधोना, पो.गिलगांव, ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**पंचायत विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.) यांचेकडे, कंत्राटी ग्रामसेवक पदभरती प्रक्रिया सन २००० सन २००१ (१२/१८ जुलै, २००९) कं.ग्रामसेवक पदभरतीचे खुल्या संवर्गातील उमेदवारांचे लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे व तोंडी परीक्षेतील गुण तसेच इमाव प्रवर्गातील उमेदवाराचे लेखी परीक्षेमधील प्रश्न पत्रिकेचे झेरॉक्स व तोंडी परीक्षेचे गुणांची माहिती मिळणेबाबत. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.७.०९ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.७.०९ व २७.७.०९ च्या अर्जाचे संदर्भात शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्रं.एपीटी-२००६/प्र.क्र.२७०/आस्था-८/ दिनांक २३.६.२००८ नुसार लेखीपरीक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती, पात्र उमेदवाराची यादी प्रकाशित केल्यावर ५ दिवसांचे आंत संबंधीत उमेदवाराने मागणी केल्यास रुपये २००/- इतके शुल्क आकारुन देण्यात येईल. तेव्हा लेखी परीक्षेच्या २५

( पान २ वर ..)

प्रश्नपत्रिकाचे रुपये ५०००/- इतके शुल्क होईल. अन्य दस्तऐवजाचे छायांकित प्रतीची फी रक्कम रुपये २५०/- असे एकुण रुपये ५२५०/- या कार्यालयात रोखशाखेत जमा करुन घ्यावे जेणेकरुन आपणांस माहिती उचल करता येवू शकेल. तसेच शासन निर्णयाच्या संदर्भात स्पष्टता दिसून येत नाही, खुलासा करावा, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ५२५०/- चा भरणा केलेला आहे. त्यानंतर दिनांक १२ ऑगष्ट, २००९ रोजी माहिती अधिकारी तथा अधीक्षक, पंचायत विभाग यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्रं. १,३ व ४ बाबतची माहिती तयार आहे. सदर माहिती उचल करावी. मुद्या क्रं. २ संदर्भात प्रश्नउत्तरपत्रिकेच्या प्रमाणित प्रती बाबत कळविण्यात येते की, शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्रं.संकिर्ण-२००८/प्र.क्र.२६६/आस्था-८, दिनांक २.४.२००९ नुसार एखादया उमेदवाराने उत्तरपत्रिकेची प्रत मागविली किंवा माहितीच्या अधिकारात उत्तरपत्रिकेची प्रत मागविली तर त्या उमेदवारास सदर उत्तरपत्रिकेची प्रत देण्यात येवू नये असे शासन निर्देश आहेत. त्यामुळे आपणांस उत्तरपत्रिकेची प्रत देता येणार नाही. तरी आपण प्रश्न उत्तरपत्रिका मिळण्यांसाठी कार्यालयात भरणा केलेले शुल्क रक्कम रुपये ५०००/-(पाच हजार फक्त)आपण उपस्थित होऊ रोख शाखेतून परत घेवून जावे, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी २४.८.२००९ रोजी एकुण ४४ पृष्ठये, शासन निर्णयाची प्रत, उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेमधील गुण व उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र पडताळणीचे प्रपत्र अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे उर्वरित रुपये ५१६२/- रोखपाल यांचेकडून उचल करावी असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ९.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.९.०९ रोजी देण्यात येवून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला असून अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना सर्व प्रश्नांच्या उत्तरपत्रिका सुरुवातीला पुरविण्याचे मान्य केले होते. त्यानंतर शासन निर्णयाप्रमाणे अमान्य केलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे शासन निर्णयामध्ये माहितीच्या अधिकारात

(पान ३ वर..)

उत्तर पत्रिकाची प्रत मागीतली तर सदर उत्तर पत्रिकाची प्रत देण्यात येवू नये असे जे नमुद केलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणारे आहे. शासन अशा प्रकारचे बंधन हे माहितीच्या अधिकारावर घालू शकत नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांनी त्रयस्थ पक्षारी म्हणजेच इतर उमेदवारांची उत्तरपत्रिका मागितलेली असल्यामुळे त्यांना त्रयस्थ पक्षाची उत्तर पत्रिका उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाचे कलम ८ मधील तरतुदी प्रमाणे उपलब्ध करुन देणे म्हणजेच त्या त्रयस्थ पक्षाची खाजगी माहिती उपलब्ध करुन देण्यासारखे असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही. त्यांची स्वतःची उत्तरपत्रिका त्यांना मिळु शकेल. त्याकरीता अपीलकर्ता यांना मात्र विभागाच्या नियमाप्रमाणे रुपये २००/-भरणे आवश्यक आहे. व त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या स्वतःची उत्तरपत्रिकाकरीता रुपये २००/- चा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात करावा व त्यानंतर अपीलकर्ता यांना त्यांची स्वतःची उत्तरपत्रिकाची छायांकित प्रत माहितीच्या अधिकारात दिली, अशा प्रकारचे प्रमाणित करुन द्यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४९/२००९**

**१) श्री वाय.एस.देशभ्रतार,**
**सुगत भवन, कुंभारे नगर, तुमसर**
**पो.ता.तुमसर, जिल्हा भंडारा-४४१९१२. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद तुमसर, ता.तुमसर, जिल्हा भंडारा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा शिक्षण लिपिक,**
**नगर परिषद कार्यालय, तुमसर, जि.भंडारा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, तुमसर यांचेकडे चतुर्थ वेतन आयोगातील(चटोपाध्याय कमीशन) शिफारशी नुसार निवडश्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र आहेत परंतु तुमसर नगर परिषद अंतर्गत माध्यमिक शाळेतील ज्या माध्यमिक शिक्षक/शिक्षिका यांना निवडश्रेणीचा लाभ अद्याप मिळालेला नाही, अशा शिक्षक/शिक्षिका यांची यादी, याबध्दल माहिती देण्यात यावी. अशी माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.८.२००९ रोजी, आपण दिलेला अर्ज तीनही शाळेच्या मुख्याध्यापकांना हस्तांतरीत करण्यात आलेला आहेत. करीता नेहरु/माकडे/कस्तुरबा कन्या विद्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावे, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.०९ रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.९.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले. माहिती अधिकारी हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरु शकतात. माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येते की, अर्जदाराने मागितलेली माहिती १० दिवसांचे आंत निशुल्क अर्जदारास पुरवावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर दिनांक ९.१०.२००९ रोजी मुख्याध्यापकाकडून उपलब्ध झालेली माहिती अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली दिसून येते. त्यामुळेही समाधान न

(पान २ वर..)

झाल्यामुळे अपीलीकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.
३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती संपूर्ण माहिती ही नगर परिषद कार्यालयात उपलब्ध आहे व सर्व
मुख्याध्यापकांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी कळविले असून सुध्दा त्यांनी सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांना काही कारण नसतांना पाठविले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निष्कर्ष काढलेला असल्यामुळे व आयोगापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, ही संपूर्ण माहिती पुर्वीसुध्दा कार्यालयात होती. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नाही असे पुन्हा पुन्हा आयोगास सांगितले. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा सांगितले की, पुर्वीसुध्दा माहिती उपलब्ध आहे व ती त्यांनी द्यावयास पाहिजे होती. त्यामुळे त्यांनी तसा निष्कर्ष काढलेला आहे. प्रथम अपीलातील निष्कर्ष योग्य असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळाटाळ केलेले आहे अश आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर रुपये १०,०००/-(रुपये दहा हजार फक्त) शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.८.२००८ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये जन माहिती अधिकारी यांचेवर रुपये १०,०००/-(रुपये दहा हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन ती "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४८/२००९**

**१) सौ.शांता रामभाऊ वावरकर,**
**साई मंदिराजवळ, तकिया वार्ड, भंडारा, मु.पो.ता.जि.भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडार. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचकडे अनुकंपा तत्वावर चपराशी पदावर नियुक्ती झालेली कल्पना प्रेमदास गजभिये हिच्या जन्माचा दाखला व जातीचा प्रमाणपत्र याची चौकशी करण्याबाबत विनंती, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.८.०९ रोजी आपण मागितलेली माहिती ही प्रश्न विचारणे, मत स्वरुपात आहे, ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे नाही. त्यामुळे ती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.१०.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीचे अपील बयान दिनांक ७.१०.२००९ अन्वये कु.कल्पना प्रेमदास गजभिये यांचा कार्यालयीन रेकार्डमधील नगर परिषद भंडारा

( पान २ वर ..)

यांचे कार्यालयाचा जन्माचा दाखला अपीलार्थी यांना पुरविण्यात आलेला आहे व राजस्व अभिलेखागार भंडारा यांचेकडे सन १९६९ च्या नंतरचा जन्म मृत्यूचा(कोतवाली पंजी) रेकार्ड जमा करण्यात आला नसल्यामुळे सदरहु प्रकरणात पुढील कार्यवाहीची गरज नसल्याने अपीलकर्त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असून प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ९५४/२००९

**१) श्री सतिश रामकृष्णराव धाबेकर,**
**क्वा.नं. ५/८४, छोटा ताजबागजवळ, रघुजी नगर,**
**नागपूर-२४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)**
**गृहनिर्माण भवन, आमदार निवास जवळ, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर-०१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)**
**गृहनिर्माण भवन, आमदार निवास जवळ, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर-०१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ(म्हाडा)नागपूर यांचेकडे, नांव दर्ज करण्याबाबत दि. १५.५.०८ ला मी सादर केलेल्या अर्जावर आजपर्यंत काय कारवाई करण्यात आली त्याची माहिती द्यावी. वरील माझ्या अर्जावर कारवाई प्रलंबित असल्यास त्या कारणांची माहिती द्यावी. वरील माझ्या अर्जावर कारवाई

( पान २ वर ..)

प्रलंबित ठेवणा-या संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांच्यावर काय कारवाई करण्यात आली याची माहिती द्यावी, अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.७.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक १४.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीने मागितलेली माहिती यापुर्वीच त्यांना दिलेली असल्यामुळे प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या अपील क्रमांक १२९/०७ चा निर्णय दिनांक ७.३.०९ रोजी झालेला असून याच संदर्भात त्यांनी माहिती मागितलेली आहे व ती, त्या अपीलांमध्ये त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले आहे. आयोगाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता तसेच जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याचे अवलोकन केले असता ती माहिती योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २३८/२००९**

**१) श्री भिमराव रघुनाथ बागडे,**
**नवीन बिनाकी मंगळवारी, सिध्दार्थ हायस्कुल जवळ,**
**नागपूर-४४००१७. तक्ररकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**सेंट डॉन बॉस्के हायस्कुल, मनकापूर,**
**कोराडी रोड, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.११.२००९)**

**निर्णय**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ८२६/२००८ मधील दिनांक ११.६.२००९ च्या निर्णयाप्रमाणे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक २४.९.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला होता. परंतु कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही व त्यामुळे तक्रारीची सुनावणी ठेवण्यात आली.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी हजर झाल्यावर असे सांगितले की, त्यांना तक्रारीच्या सुनावणीची नोटीस मिळाली. अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली व अपीलाच्या सुनावणीस ते हजर होते. परंतु निर्णयाची प्रत त्यांना मिळाली नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. वास्तविक अपीलकर्ता आयोगाकडून पाठविलेली नोटीस व निर्णय हे सर्व एकाच पत्यावर पाठविले आहे. परंतु निर्णयाची प्रत मिळाली नाही हे मुख्याध्यापक यांचे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही. त्याकरीता ते शास्तीस पात्र आहे. त्याबध्दल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, माहिती उपलब्ध आहे व ती द्यावयास तयार आहे.

( पान २ वर..)

त्यावर तक्रारदार यांनी असे सांगीतले की, मला माहिती उपलब्ध झाल्यास माझी तक्रार राहाणार नाही. त्यामुळे तक्रारदार हे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे सोबतच सकाळी माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी गेले व ४.०० वाजेपर्यंत परत आले नाही. यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २३४/२००९**

**१) श्री मुरलीधर पुंडलीकराव सहारे,**
**५९, नवीन गणेश मंदीर समोर, वैशाली नगर, नागपूर. तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक,**
**कळमेश्वर ता.कळमेश्वर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १०.८.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ४७१/०८ चा निर्णय दिनांक २३.४.०९ प्रमाणे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. त्या तक्रारीप्रमाणे दिनांक २४.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागविण्यात आला होता. खुलासा सादर केला असून तो खालीलप्रमाणे आहे.

खुलासाः "उपरोक्त विषयाबाबत संदर्भ पत्र क्रं. १ ते ३ याची पडताळणी करुन मी आपला खुलासा खालीलप्रमाणे सादर करीत आहे. दुय्यम निबंधक कार्यालय येथे स्थावर मिळकती बाबत खरेदी विक्रीचे दस्त नोंदणी करण्यात येतात, दस्तासोबत मिळकतीचा ७/१२, अकृषक आदेश, मंजूर नकाशा, घर असल्यास ग्राम पंचायत यांचे प्रमाणपत्र कर पावती व गांव नमुना-८ दस्ताचा पुरक भाग म्हणून घेण्यात येतात. पक्षकारास एखादया दस्ताची साक्षांकित प्रत पाहिजे असल्यास अर्जात दस्त क्रमांक व दिनांक नमुद असणे आवश्यक आहे. किंवा पक्षकार स्वतः येवून उपरोक्त बाबीचा कार्यालयीन अभिलेखावरुन शोध घेवू शकतो. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीत मुद्या क्रं. १ ते ५ मधील बाबी जसे, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, वारसान

( पान २ वर ..)

असल्याबाबत मुळ प्रमाणपत्र बाबत माहिती दुय्यम निबंधक कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे दिलेली नाही. तक्रारकर्ता यास पाहिजे असलेली माहिती दुय्यम निबंधक कार्यालयाशी संबंधीत असल्यास त्यांना ती ताबडतोब देण्यात येते. यात कोणाचाही शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान करण्याचा उद्येश नसतो. दुय्यम निबंधक कार्यालयात उपलब्ध विक्रीपत्राची व पुरक साक्षांकित प्रत तक्रारकर्तास विनामुल्य दिलेली आहे. त्यामुळे मी प्रभारी दुय्यम निबंधक असताना दिलेली माहिती योग्य आहे."

यावरुन दिलेली माहिती योग्य आहे असा निष्कर्ष काढण्यात येत असून तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (३) अंतर्गत अपील -**

**तक्रार क्रमांक २२६/२००९**

**१) श्रीमती वर्षा घनश्याम गौरकर,**
**द्वारा हेमंत गौरगर, एफ-२, बालाजी अपार्टमेंट,**
**के.डी.के.कॅालेज रोड, नंदनवन, नागपूर. तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय),**
**नागपूर ग्रामीण, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक १३.८.२००९ रोजी अपील क्रमांक २३६/२००९ चा निर्णय दिनांक २३.७.२००९ च्या आदेशाप्रमाणे निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३.१.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्या क्रं. ४ व ५ ची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी. अपीलकर्ता यांनी अतिरिक्त माहितीकरीता खर्चाचा भरना केलेला असल्यास, आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत परत करण्यात यावे, या निर्णयाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती दिनांक २०.२.२००९ तारीख असलेली अपूर्ण माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार तथा उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती दिनांक २०.२.२००९ रोजीच जी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता तेवढीच माहिती आहे. तसेच तक्रारदार यांनी सांगितले की, आयोगाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यांचे भाऊ श्री घनश्याम

( पान २ वर ..)

गौरकर यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे असे दिसून येते, अशा प्रकारचे विश्लेषण जे निर्णयात आलेले आहे ते योग्य नाही कारण त्यावेळेस त्यांना माहिती उपलब्ध झालेली नव्हती. परंतु, त्या संदर्भामध्ये दिनांक २३.७.२००९ रोजी जो खुलासा आयोगाकडे दाखल केला आहे त्यामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अपीलकर्ता यांनी ती उपलब्ध करुन घेतलेली नाही. तसेच दिनांक ३.३.०९ रोजी सुध्दा तक्रारदार यांना अप्पर पोलीस अधीक्षक श्री रुडे यांनी जे पत्र दिलेले आहे त्या पत्रामध्ये माहिती तातडीने घेवून जाण्यासाठी दिनांक २८.२.०९ रोजी पत्र दिले होते. परंतु, ते घरी हजर नसून आपले भाऊ श्री गौरकर यांनी पत्र घेण्यास नकार दिला असे दिले आहे. त्यानंतर दिनांक १६.३.०९ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला व त्याकरीता पत्र दिले आहे असे पत्र त्यावेळेस दाखल केलेले होते व त्यामुळेच तशा प्रकारे निर्णयामध्ये घेण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलात सुध्दा दिनांक ३.१.२००९ च्या मुळ अर्जातील मागविलेली माहिती अर्धवट दिलेली आहे अशा प्रकारे नमुद केलेले आहे. द्वितीय अपीलात सुध्दा मागीतलेली माहिती टाळण्यास्तव अर्धवट माहिती दिली, माहिती उपलब्ध असूनही उपलब्ध नाही, असे कळविले वगैरे.. या त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केलेले असल्यामुळे तसे निर्णयात आलेले आहे असे दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना आदेशात नमुद केल्याप्रमाणे मुद्या क्रं. ४ व ५ ची माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु ती उपलब्ध करुन दिलेली नाही.

३. आयोगानी निर्णय दिल्यानंतर अधिनियमाचे कलम ८ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे पुन्हा म्हणता येत नाही. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती कोणत्याही प्रकारे आयोगाचे निर्णयाचे आकलन न करता उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण व अर्धवट आहे असाच निष्कर्ष पुन्हा काढावा लागतो. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ते लपवित आहे व कुणालातरी वाचविण्याकरीता माहिती देण्याचे टाळाटाळ करीत आहे. व त्यामुळे आयोगाच्या आदेशानंतर सुध्दा त्यांच्या दिनांक ३.१.०९ च्या अर्जातील मुद्या क्रं. ४ व ५ ची माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली

(पान ३ वर..)

नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. व त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त)ची शास्ती अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या बध्दल विचारले असता त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे शास्ती लावण्यात येवू नये, असे सांगितले. परंतु तरीही आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असेच खुलाशावरुन दिसून येते व तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार दिसून येते. व त्यामुळे सदरची तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून अपील क्रमांक २३६/२००९ चे निर्णय दिनांक २३.७.०९ मधील आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांनी करावयाची असून ती "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".या लेखा शिर्षात जमा करण्यात यावी.

२) तक्रारदार यांना त्यांच्या दिनांक ३.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मुद्या क्रं. ४ व ५ ची माहिती ज्या कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. अन्यथा पुन्हा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वंतत्रपणे, पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १६९/२००९**

**१) श्री देवनाथ ताराचंद अतकरी,**
**जूना जरीपटका, सी.एम.पी.डी.आय रोड,**
**माता मंदीर जवळ, नागपूर-१४.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(उत्तर),**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक२७.१०.२००९ रोजी त्यांचे अपील क्रमांक ३६४/२००८ मध्ये दिनांक ८.४.२००९ रोजी झालेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांना आदेशात म्हटल्याप्रमाणे आय.आर.डी.पी.रोड मध्ये बाधीत झालेला जागेचा देऊ केलेला टी.डी.आर.संबंधामध्ये जी टिपणी उपलब्ध असेल किंवा नियम उपलब्ध असेल किंवा चलान तयार केले असतील त्याबाबतची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पुर्वीही तीच माहिती उपलब्ध करुन दिली होती व निर्णयाप्रमाणे सुध्दा तीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्या निर्णयाप्रामणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा असे सांगितले की, रस्ता रुंदीकरणाखाली बाधीत झालेल्या आपल्या जागेचा मोबदला नागपूर सुधार प्रन्यासच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुार आपणांस मालकी हक्काचे कागदपत्रे व इतर

( पान २ वर..)

कागदपत्रे तपासून हस्तांतरण केलेल्या जागेवर १०० टक्के टी.डी.आर./चटई क्षेत्र निर्देशांक अथवा डी.सी.आर. नियमानुसार मोबदला आपंणास देण्यात येईल, असा निर्णय झालेला होता. त्याप्रमाणे तक्रारदार यांना नासुप्रच्या निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती आहे त्यात अथवा, अथवा असले तरी अपीलकर्ता हे प्रत्येक पर्यायाची माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी भूमीका घेत आहे. त्यांना नागपूर सुधार प्रन्यासने जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे त्याप्रमाणे मोबदला देत असल्यामुळे प्रत्येक पर्यायातून ते देण्याची आवश्यकता नसते व त्यामुळे तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १९५/२००९**

**१) श्री विवेक देवराव रासेकर,**
**मु.पो.पांढरपौनी, ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय, पांढरपौनी,**
**ता.राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १७.७.०९ रोजी त्यांचे अपील क्रमांक ४३९/०९ मधील दिनांक २२.४.२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे २० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत पांढरपौनी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही तहसिल कार्यालयातील अभिलेखागारातील अधिकारी/कर्मचारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश असल्यामुळे दिनांक ५.६.०९ ला आदेश पारित झाल्यानंतर दिनांक ५.६.०९, १७.६.०९ व २२.६.०९ रोजी तहसिलदार, राजूरा यांचेकडे गावठाण संबंधीच्या माहितीची मागणी केली व त्याबध्दल तक्रारदार यांना वारंवार कळविण्यात आले आहे. परंतु तहसिलदार यांचेकडून मला माहिती प्राप्त झाली नाही व त्यामुळे मी तक्रारदार यांना माहिती पुरवू शकलो नाही. मा. तहसिलदार यांनी सदर माहिती उपविभागीय अधिकारी राजूरा यांचेकडून मागविण्यात आल्याचे मला पत्र देवून कळविले आहे. व तसे मी दिनांक २०.७.०९ च्या पत्रान्वये मा. आयोगास कळविले आहे. यावरुन असे दिसून येते की, अपीलाच्या निर्णयापुर्वी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी तहसिल कार्यालयातून माहिती मागितली होती. परंतु ती त्यांना मिळाली नाही व त्याबध्दलचे उत्तर सुध्दा आलेले दिसून येते. तसेच अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी तहसिल कार्यालयात माहिती मागितली होती परंतु त्यांच्याकडून मिळाली नाही व उपविभागीय अधिकारी यांचेकडूनही मिळाली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नाही. परंतु अपीलाच्या निर्णयामध्ये तहसिलदार कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून शास्ती लादण्यात येईल असा निर्णय दिलेला असल्यामुळे तहसिल कार्यालयातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियामाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती लादणे

(पान २ वर..)

आवश्यक आहे. सदरच्या शास्तीची वसुली तहसिल कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संबंधात जबाबदार असतील त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन सदरच्या शास्तीची वसुली करणे संयुक्तिक राहील. अन्यथा तहसिलदार यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक राहील व त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना अपील क्रमांक ४३९/०८ च्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्यामुळे तहसिल कार्यालयाती संबंधीत जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली तहसिल कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संबंधात जबाबदार असतील त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शास्तीची वसुली तहसिलदार यांनी करावी व ती या "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".लेखाशिर्षात जमा करावी. अन्यथा तहसिलदार यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

२) तक्रारदार यांना, तहसिलदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध असल्यास ती छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १८१/२००९**

**१) श्री कृष्णा के. चांदेकर,**
**पोवारा वसाहत, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था-२८,**
**क्वीन्स गार्डन, पुणे-१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी अपील क्रमांक १५३/२००८ मधील दिनांक १२.३.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १७.८.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला व त्याप्रमाणे दिनांक ३१.८.२००९ रोजी खुलासा दाखल केलेला आहे. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांनी आयोगाकडे खुलासा करता असे म्हटले आहे की, संचालक, समाज कल्याण, म.रा. पुणे यांचेकडून, अपील क्रं.१५३/२००८ मध्ये दिनांक १२.३.२००९ रोजी पारित केलेले आदेशानुसार माहिती मागविण्यात आली होती. परंतु अद्यापपावेतो सदर माहिती संबंधित विभागाकडून अप्राप्त असल्याने अपीलार्थी श्री कृष्णा के. चांदेकर यांना पुरविण्यात आलेली नाही. यावरुन संचालक, समाज कल्याण संचालनालय यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. आयोगाचा निर्णय स्पष्टपणे असून समाज कल्याण विभागाकडून माहिती उलपब्ध करुन घ्यावी असे त्यात दिलेले असल्यामुळे समाज कल्याण विभागाने त्याची दखल घेवून माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्यामुळे समाज कल्याण विभाग यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येवून संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये, शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांचे दिनांक १४.५.२००९ च्या पत्राप्रमाणे कोणत्याही प्रकारचे उत्तर किंवा माहिती दिलेली नसल्यामुळे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

( पान २ वर..)

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून संचालक, समाज कल्याण संचालनालय, म.रा., ३, चर्च रोड, पुणे-१ यांचे कार्यालयातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण यांचे पत्र दिनांक १४.५.२००९ च्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, समाज कल्याण संचालनालय, म.रा., ३, चर्च रोड, पुणे-१ यांचेकडे स्वतंत्रपणे, पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८१/२००९**

**१) श्री ॲड.अरविंद तुलारामजी लोधी,**
**रा.सावनेर, अवधुत वाडी, वार्ड क्रं.२,**
**ता.सावनेर, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद सावनेर, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**नगर परिषद सावनेर, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद सावनेर यांचेकडे दि. १५ जून २००९ ते १५ ऑगष्ट, २००९ पर्यंत सावनेर न.प.द्वारे बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा व इतर विभागातील बोलविलेल्या विभिन्न निविदा व इतर जाहिरातीच्या वृत्तपत्राच्या छायांकित प्रतिसह माहिती मिळण्याबाबत. माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.९.२००९ रोजी आपणास आवश्यक असलेल्या छायांकित प्रतीसाठी प्रत्येकी रुपये २/- प्रमाणे शुल्क जमा करुन प्रती घेवून जाव्यात, असे कळविलेले दिसून येते. परंतु दिनांक २४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. व माहिती सुध्दा उपलब्ध झाली नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते पैसे भरण्यास तयार होते. परंतु पैसे किती भरावे हे कळविलेले नसल्यामुळे पैसे भरता आले नाही. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय हा ३० दिवसांचे आंत देण्यात या शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केलेले आहे. वास्तविक, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी किती पृष्ठे माहिती होते त्या पृष्ठांची संख्या कळविणे आवश्यक असते व ती कळविलेली नसल्यामुळे माहिती

( पान २ वर..)

उपलब्ध झालेली दिसून येत नाही. त्यामुळे सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत बांधकाम विभाग, विद्युत विभाग व पाणी पुरवठा या तीनही विभागाची १५ जून, २०९ ते १५ ऑागष्ट, २००९ या कालावधीतील माहिती विनामुल्य, व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८२/२००९**

**१) श्री महेश चैतराम पाली,**
**३६६, धरमपेठ, टांगा स्टँड, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१, अमरावती विभाग,**
**अमरावती. शासकिय तंत्र निकेतन समोर, गाडगेनगर, अमरावती.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१, अमरावती विभाग,**
**अमरावती. शासकिय तंत्र निकेतन समोर, गाडगेनगर, अमरावती.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी गडरिया जातीचे दिनांक १४ फेब्रुवारी, २००१ पासून आज पावेतो किती प्रकरण जात पडताळणी करीता आले. किती लोकांना गडरिया जातीचे वैद्यता प्रमाणपत्र देण्यात आले वगैरे.. तसेच नव नियुक्ती किंवा शिक्षणाकरीता आलेले प्रकरणामध्ये उमेदवाराचा/विद्यार्थ्याचा प्राथमिक शाळा सोडल्याचा दाचाला, वडीलाचे प्राथमिक शाळेचे प्रमाणपत्र, जन्म मृत्यू कोतवाल पंजी.. वगैरे माहिती उपलब्ध करुन द्यावी, सदरची माहिती स्पीड पोस्टाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.७.२००९ रोजी कार्यालयातील अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध आहे, आपण आपल्या सोयीनुसार नोंदवहयांची तपासणी करुन आवश्यक असलेली माहिती घेऊ शकता. मुद्या क्रं. १ बाबत या कार्यालयाने जातनिहाय स्वतंत्र माहिती ठेवलेली नाही. व मुद्या क्रं. २ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ९.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात आलेला असून नागपूर येथे राहात असल्यामुळे रेकार्ड पाहू शकत नही, माहिती स्पिड पोस्टाने पाठवावी असा आग्रह अपीलकर्ता यांनी धरला त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्या प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, गडारिया जातीच्या संदर्भात दिलेले जात पडताळणी प्रमाणपत्र कोणत्या आधारावर दिले याबाबतची माहिती त्यांना आतापर्यंत

( पान २ वर..)

मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ७.७.२००९ रोजी म्हणजेच अर्ज करण्यापुर्वीच भटक्या जमाती-क या प्रवर्गात अ.क्रं.२९ वर धनगर या मुख्य जातीची उपजात/तत्सम जातीचा म्हणून गडारिया या जातीचा समावेश करण्यात आला आहे. तसेच इतर मागास वर्गाच्या यादीत अ.क्रं. ३२८ वर गडरिया जातीचा उल्लेख आहे. यासोबत जातीची यादी जोडली आहे, इ. माहिती अपीलकर्ता यांना कळविलेली दिसून येते. तसेच शासन निर्णयाप्रमाणे जात पडताळणी समिती निर्णय देत असते जातीच्या संशोधना संदर्भात किंवा शासन निर्णयाचे संदर्भात राज्य मागासवर्ग आयोग हे निर्णय घेत असतात व त्याप्रमाणे शासन निर्णय काढल्यानंतर जातपडताळणीची प्रक्रिया असते. त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध इ ाालेली आहे व त्यांना काही शंका असल्यास मा. उच्च न्यायालयामध्ये जावून न्याय मागणे उचित राहील असे सांगितले. यावरुन अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८३/२००९**

**१) श्री  धर्मदाय विश्वनाथ लभाने,**
**महेश ज्ञानपीठजवळ, मारोती वार्ड नं.२, हिंगणघाट,**
**ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा  अप्पर जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा, ता.जि.वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा  उपविभागीय अधिकारी,**
**हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांचेकडे, भुखंड प्रकरण क्रं.३:एन.ए.पी./३४/८०-८१ आदेश दिनांक ३०.३.१९८१ या विषयाचे अनुषंगाने एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती स्वत: घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक  ३०.६.२००९ रोजी प्रकरणाचा शोध घेतला असता प्रकरण आढळून आले नाही. तथापि, प्रकरण आढळून आल्यास माहिती पुरविण्यात येईल असे उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांनी कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.८.२००९ रोजी देण्यात आला असून प्रकरणाचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आलेले आहे. मात्र त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, आता सदरच्या प्रकरणाचा शोध घेतल्यावर पटवारी यांचेकडे त्याप्रकरणातील एन.ए.पी. व नकाशाची छायांकित प्रत उपलब्ध झाली आहे. परंतु अपीलकर्ता यांना १९८० ची प्रत पाहिजे आहे. परंतु त्यांच्या अर्जात दिनांक ३०.३.१९८१ च्या आदेशाची प्रत मागितलेली असल्यामुळे तीच आदेशाची प्रत ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात, नकाशाच्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध झालेली आहे. परंतु मुळ प्रकरण मात्र मिळाले नाही. ज्या छायांकित प्रती आता मिळाल्या आहेत त्या त्यांना मिळालेल्या आहे, त्या त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तो नकाशा त्यांचेकडे आहे. एन.ए.पी. आदेशच दिनांक ३०.३.८१ चे

( पान २ वर..)

असल्यामुळे त्यापुर्वीचे कोणतेही कागदपत्रे ही अधिकृत कागदपत्रे होऊ शकत नाही. व त्यामुळे मुळ प्रकरणाचा शोध हा जिल्हाधिकारी अभिलेखागारात किंवा तहसिल हिंगणघाट अभिलेखागारात शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रकरणाचा शोध जिल्हाधिकारी अभिलेखागारात किंवा तालुका हिंगणघाट अभिलेखागारात शोध घेवून प्रकरण उपलबध झाल्यास त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९७७/२००९**
**अपील क्रमांक ९७८/२००९**

**१) श्री विष्णु राजाराम वैरागडे,**
**०८, न.प.शॉ.कॉम्पलेक्स, देसाईगंज,**
**ता.देसाईगंज, जिल्हा गडचिरोली. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

अपील क्रमांक ९७७/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली,ता.जि.गडचिरोली. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली. जि.गडचिरोली. — उत्तरवादी**

अपील क्रमांक ९७८/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद देसाईगंज, जिल्हा गडचिरोली. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, नगर परिषद, देसाईगंज,**
**ता.देसाईगंज, जिल्हा गडचिरोली. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ९७७/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, गडचिरोली यांचेकडे, देसाईगंज येथील बोगस पॅथालॅाजीबाबत झालेल्या तक्रारीच्या कारवाईबाबत दिनांक १० सप्टेंबर,०९ ते आजपर्यंत या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध आहे व ती माहितीचा खर्च रुपये २५४/- कार्यालयात जमा करावा जेणेकरुन माहिती पुरविणे सोईचे होईल असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये, चुकीची व अपूरी माहिती दिली याबध्दल तक्रार असल्यास प्रत्यक्ष येवून भेटावे असे अपीलीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांनी कळविलेले दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

( पान २ वर..)

३. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा : "उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणांस सादर करण्यांत येते की, श्री विष्णु राजाराम वैरागडे, ०८ न.प. शॅापींग कॅाम्प्लेक्स, देसाईगंज जिल्हा गडचिरोली यांनी देसाईगंज येथील बोगस पॅथालॅाजीबाबत झालेल्या तक्रारीच्या कार्यवाहीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दिनांक २४.९.२००९ अन्वये माहिती मागितलेली होती. त्यानुसार या रुग्णालयातील डॅा. आर.एस.फारुकी, वर्ग-१ शल्य चिकित्सक यांनी श्री अर्जून कुमार स्वर्णकार, देसाईगंज यांचे मायक्रो पॅथालॅाजी लेबॅारेटरी, देसाईगंज(वडसा) व श्री ज्ञानेश्वर तु. पगाडे, संकल्प पॅथालॅाजी लेबारेटरी, देसाईगंज यांचे पॅथालॅाजी येथे तंत्रज्ञाच्या शैक्षणिक अर्हता तपासणी व पडताळणी खालील प्रमाणे करण्यात आले.

श्री अर्जूनकुमार स्वर्णकार देसाईगंज यांनी लोककल्याण शिक्षण संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या राणी आवंतीबाई पॅरामेडीकल कॅालेज, गोंदिया या संस्थेमधून डी.एम.एल.टी. जिजामाता विद्यापीठ, जळगांव यांचेशी संलग्ण आहे.

सदर डी.एम.एल.टी.कोर्स संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक ४.१.२००० अन्वये संचालक, राणी अवंतीबाई पॅरॅामेडीकल कॅालेज जिल्हा गोंदिया यांना सुधारित प्रस्ताव प्रोजेक्ट रिपोर्टसह सादर करण्यांकरीता सुचविले होते. परंतु संचालक, राणी अवंतीबाई गोंदिया यांनी आवश्यक पुर्तता केलेली नाही व मान्यता प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

तसेच श्री अर्जूनकुमार स्वर्णकार यांनी दिनांक ११.८.२००९ ला गडचिरोली सिव्हील कोर्ट(सिनिअर डिव्हीजन) येथे ॲप्लीकेशन U/s ३९, Rule १.२ of C.P.C. R/W Sec. १५१ of C.P.C. अन्वये याचिका दाखल केलेली आहे. याचिका ही खालीलप्रमाणे.

१) श्री दुबे, संपादक, त्रिकालनेत्र, देसाईगंज
२) चीफ एडीटर, दैनिक सकाळ, हिंगणा नागपूर
३) डिस्ट्रीक्ट रिप्रेझेंटेटिव्ह दैनिक सकाळ, आरमोरी रोड, गडचिरोली
४) सीटी रिप्रेझेंटेटिव्ह दैनिक सकाळ, देसाईगंज जिल्हा गडचिरोली
५) चीफ एडीटर, दैनिक देशोन्नती, धंतोली नागपूर
६) डिस्ट्रीक्ट रिप्रेझेंटेटिव्ह, दैनिक देशोन्नती, आरमोरी रोड, गडचिरोली
७) तालुका रिप्रेझेंटेटिव्ह, दैनिक देशोन्नती, देसाईगंज जिल्हा गडचिरोली
८) एडीटर लोकल डेली महासागर, चामोर्शी रोड, गडचिरोली.

त्यांचे विरुध्द दाखल केलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे वि.मान कोर्टाच्या निर्णयानुसार कार्यवाही करणे बाहय राहील, तोपर्यंत Status Quo applicable राहील. तसेच श्री ज्ञानेश्वर पगाडे, देसाईगंज यांनी डी.एम.एल.टी. कोर्स इंडिया इंस्टीटयूट ऑफ मेडीकल टेक्नॅालॅाजीजिस्ट कोलकाता येथून उत्तीर्ण आहे. सदर अभ्यासक्रम स्टेट फॅकल्टी ऑफ वेस्ट बंगालने मान्य केलेला आहे. परंतु सदर अभ्यासक्रम हे महाराष्ट्र टेक्नीकल बोर्ड ऑफ एज्युकेशन यांनी मान्य केलेला नाही."

४. असे असेल तर जिल्हा शल्य चिकित्सक यांनी असे सांगितले की, पॅथालॅाजीला परवानगी डी.एम.आर.ई. ही देतात व त्यामुळे त्यांचेकडे तक्रार करणे आवश्यक होते. परंतु

( पान ३ वर ..)

जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे तक्रार केल्यावर पॅथालॉजीची तपासणी केली परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई करता आलेली नाही. व त्या संदर्भात सदर पॅथालॉजीच्या मालकांनी ८ पत्रकारांच्या विरुध्द कोर्टात याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, त्यामुळे कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु तरीही जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे पॅथालॉजीबाबत कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्यास तक्रारीची चौकशी करण्याचे अधिकार त्यांना नाही. असे असताना त्यांच्याकडून माहितीची अपेक्षा करणे गैर आहे असे दिसून येते. ज्या प्राधिकरणाने पॅथालॉजीला मंजूरी दिलेली आहे त्याच प्राधिकरणाकडे तक्रार करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक ९७८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००९ रोजी माहिती अधिकारी, आरोग्य विभाग, नगर परिषद, देसाईगंज यांचेकडे, श्री ज्ञानेश्वर पगाडे यांची संकल्प पॅथालॉजी लेबॅरेटरी व अर्जून स्वर्णकार यांची मायक्रो पॅथालॉजी लेबॅारटरी बाबत एकुण १२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.९.२००९ रोजी एकुण ११ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१०.२००९ रोजी दिलेला असून अपील फेटाळलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

६. अपीलकर्ता यांनी सांगितले की, ५ मुद्यांची माहिती मिळावी व ७ मुद्यांची माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांची बरीच माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे ती उपलब्ध करुन दिलेली नाही. मुद्या क्रं.६ बाबत अपीलकर्ता यांनी मत मागितले आहे. मुद्या क्रं. ७ व ८ च्या बाबत कळविण्यात आलेले आहे. मुद्या क्रं. ९ बाबत १ ते ४२ दस्तऐवजाचा संच उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मुद्या क्रं. १० बाबत अर्जदारानी विचारलेली माहिती श्री अे.एस.माडावार,लिपिक यांनी जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे ती माहिती अर्जदाराला उपलब्ध करुन देता आली नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संचात मुद्या क्रं.१० ची माहिती नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण आहे असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना, मुद्या क्रमांक ६,८,१०,११ याची माहिती उपलब्ध असल्यास ती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. आरोग्य लिपिक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे माहिती पुरविता आली नाही असे अपीलीय अधिकारी यांनी सांगितलेले असल्यामुळे आरोग्य लिपिक श्री माडावार यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यांना जन माहिती अधिकारी समजून माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते शास्तीस पात्र आहे. परंतु आज आरोग्य लिपिक हजर नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे

( पान ४ वर..)

कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९७७/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९७८/२००९ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या मुद्या क्रं. ६, ८, १० व ११ ची माहिती जी कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असले ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांना आरोग्य लिपिक श्री अे.एस.माडावार यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांना माहिती पुरविता आली नाही. त्याकरीता श्री अे.एस.माडावार यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई मुख्याधिकारी, नगर परिषद देसाईगंज यांनी करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९७६/२००९**

**१) श्री  विजय झुंगरुजी नगराळे,**
**मालवीय वार्ड, रेल्वे पुलाजवळ, वरोरा,**
**ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा  मुख्याधिकारी,**
**नगर परिषद वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**नगर परिषद वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १३.८.१९८२ ते ३१.३.२००९ पर्यंतचे सौ. विमल नगराळे (शिक्षिका) यांचे काढलेले वेतन व भत्ते आणि कपाती तसेच थकीत रक्कमांची देयके वगैरे..बाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.७.२००९ रोजी रुपये ५/- नगर परिषद फंडात जमा करावे व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना नस्ती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.१०.०९ रोजी दिलेला असून अपीलार्थीस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अपीलार्थीस लेखी कळविण्यात यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक २९.१०.२००९ रोजी आपल्या मागणी नुसार उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. उर्वरित माहिती ही फारच जुनी स्वरुपाची असून तीचे शोधन करुन सुध्दा उपलब्ध नसल्यामुळे पुरविण्यात येवू शकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना एकुण २७ वर्षापैकी २३-२४ वर्षाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जी माहिती उपलब्ध नाही ती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले असले तरी

(पान २ वर..)

पुन्हा शोध घेवून व माहिती उपलब्ध झाल्यास उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उर्वरित माहितीचा शोध घेवून उपलब्ध झाल्यास ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९९६/२००९**

**१) श्री विजयकुमार पांडुरंग आगळे,**
**औषधी निर्माता, प्रा.आ.केंद्र केसलवाडा/वाघ,**
**ता.लाखनी, जिल्हा भंडारा-४४१८०९. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,**
**भंडारा, ता.जि. भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा हिवताप कार्यालय, भंडारा, ता.जि.भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालय, भंडारा यांचेकडे श्री बी.के. मांढरे, आ.सहा. यांचे सेवाविषयक एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००९ रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांच्या एकुण १० मुद्यांच्या संदर्भात त्यांना जिल्हा हिवताप अधिकारी, भंडारा यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना १९ प्रकारच्या कागदपत्रांची माहिती देण्यात आलेली आहे. परंतु जी माहिती अपूर्ण आहे ती माहिती काढून ठेवलेली आहे. परंतु माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे व ते व्यक्तीशः माहिती घेण्यास आलेले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. अपीलकर्ता यांनी प्रत्येक वेळेस मी समक्ष येवून माहिती घेवून जाईल असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांना माहिती घेवून जा असे कळविले नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी

(पान २ वर..)

जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः जावून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून उर्वरित माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९९४/२००९**
**तक्रार क्रमांक १५२/२००९**

**१) श्री गिरीश मोरेश्वर खोरगडे,**
**६९२, श्री निवास, गीतानगर, झिंगाबाई टाकळी,**
**I/F/O भारतीय कृषि विद्यालय, नागपूर-३०. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी, आरोग्य विभाग,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी, आरोग्य विभाग,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माहिती: "(a) Whether your department has any knowledge about health effects of electromagnetic radiations emissions emitted from antema of mobile tower. If yes, please provide the same. (b) Whether your office has or adopted any information/rules/by laws/regulation/norms for installing antennas and to control frequency of radiation emission. If yes please provide the same. (c) Whether your office has any monitoring officer to monitor electromagnetic radiations emissions emitted from antennas of mobile towers. If yes, please provide his/her name and nature of work. (d) Whether your department will take responsibility if any problem arise or hazards cause to any person or suffer from any disease

( पान २ वर..)

due to such electromagnetic radiation emissions of antennas mounted on mobile tower within the jurisdiction of NMC. (e) If your office has no any knowledge or information about health effects of electromagnetic radiations emissions emitted from antenna of Mobile Tower, then why this office has not taken any initiative to study such effects. Why this department blindly allowing the Mobile Tower Companies to erect the same at any place in the city of Nagpur without rectifying the technology of electromagnetic radiations. (f) Whether there is national agency or department to take care of such electromagnetic radiations."

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी अपीलासोबत तक्रार सुध्दा दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दिनांक ८.६.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला होता. खुलाशामध्ये माहिती रेडीओलॉजी विभाग गर्व्हमेंट मेडीकल कॅालेज व रुग्णालय नागपूर तसेच प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय उद्योग भवन, सिव्हील लाईन नागपूर व पत्रातील इतर माहितीकरीता सहाय्यक संचालक नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर यांना पत्र पाठवून मागीतलेली आहे. तरी माहिती प्राप्त होताच आपणास तक्रारीच्या अनुषंगाने खुलासा देण्यात येईल, असे म्हटलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ४.९.२००९ रोजी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने शासकिय मेडीकल कॅालेज व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सिव्हील लाईन, नागपूर यांनी मागितलेली माहिती त्यांच्या विभागाशी संबंधीत नाही असे पत्र पाठविले आहे. आरोग्य विभागातर्फे मोबाईल टावर लावण्याची परवानगी देण्यात येत नाही. या माहितीबाबत नगर रचना विभाग, मनपा, नागपूर यांना अर्जदारास संबंधीत माहिती परस्पर देण्याचे पत्र दिनांक २१.७.०९ ला पाठविण्यात आलेले आहे, असा पुन्हा खुलासा केलेला आहे. सोबत

(पान ३ वर..)

माहिती अधिकारी यांनी आरोग्य अधिकारी(माबाईल) यांना दिनांक २०.८.२००९ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत जोडलेली आहे. आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांनी उपप्रादेशिक अधिकारी-१, प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी पाठविलेल्या पत्राची प्रत जोडलेली आहे. यावरुन माहिती ही आरोग्य विभागाशी संबंधीत नाही तरी सुध्दा आरोग्य विभागाने इतर विभागांना पत्रे देवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मागितलेली माहिती त्याही विभागाशी संबंधीत आहे असे दिसून येत नाही. अंतिमतः दिनांक ९.९.२००९ रोजी सहाय्यक संचालक, टाऊन प्लॅनिंग यांनी सुध्दा त्यांच्या विभागाशी माहिती संबधीत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ज्या विभागाशी संबधीत असेल त्या विभागाकडे माहितीचा अर्ज करावा म्हणजे त्यांना माहिती उपलब्ध होईल. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५९/२००९**

**१) श्री भागवत रामचंद्र निकाळजे,**
**द्वारा-किरण पॅलेस, प्लॉट नं.५३,**
**न्यू गार्डन ले आऊट,बेझनबाग, नागपूर-४४०००४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्रं.२, नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पाचपावली विभाग, नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग नागपूर यांचेकडे, दिनांक १७.६.२००८ व दिनांक ३०.१२.२००८ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जरिपटका पोलीस स्टेशन यांचेकडे केलेल्या अनुसूचित जाती जनजाती प्रतिबंधक कायदा १९८९ प्रमाणे तक्रारीच्या झालेल्या कार्यवाहीची माहिती एकुण ९ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.३.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यासाठी अर्ज सादर केला. सदर अर्जाची चौकशी पोलीस स्टेशन येथे सुरु असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(ज) जिच्यामुळे गुन्हेगाराचे अन्वेशन करण्यास किंवा त्यांना अटकाव करण्यास किंवा त्यांच्यावर खटला दाखल करण्यास अडथळा येईल अशी माहिती उघड करण्यास सुट या तरतुदीनुसार अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जात नमुद प्रमाणे (क ते झ) पुरविणे शक्य नाही. चौकशी पुर्ण होताच अर्जदारास माहिती पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक १७.३.२००९ रोजी प्रथम अपीलाच्या संदर्भात आपण माहितीचा अर्ज दिनांक २८.२.२००९ रोजी दिलेला असून मुदतीच्या आंत प्रथम अपील करणे योग्य नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक २०.५.२००९ रोजी पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती

( पान २ वर ..)

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्यांच्या दोनही तक्रारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्यावेळेस अर्ज केला होता त्यावेळेस तक्रारीची चौकशी सुरु होती त्यामुळे अधिनियमाचे कलम ८(ज) अन्वये माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगीतले की, आता संपूर्ण चौकशी झालेली आहे व त्याबाबतची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. परंतु अपीलकर्ता यांचे त्यामुळेही समाधान झालेले दिसून येत नाही. चौकशी पुर्ण
झालेली असेल व गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात अंतिम निर्णय झालेला असेल्यास त्याबाबत तक्रार दाखल करण्यापासून तर अंतिम कार्यवाही होईपर्यंतच्या संपूर्ण कागदपत्रांच्या व पत्रयवहाराच्या प्रती यासह संपूर्ण माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात अपीलकर्ता यांना विना मुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची, बयाण, पत्रव्यवहार, संबंधीत अधिका-यांकडून आलेला अहवाल व त्याचा निर्णय ही संपूर्ण माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २४२/२००९**

**१) श्री डॉ. भिमराव राजारामजी सरायकर,**
**एल.आय.जी.७७, नंदनवन कॅालनी, नागपू-९.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**सिटी सर्व्हे विभाग क्रं.१, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ९.६.२००९ रोजी, राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी त्यांचे अपील क्रमांक १९६५/२००७ मधील निर्णय दिनांक १०.९.२००८ च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. सुनावणीमध्ये तक्रारदार यांनी असे सांगितले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे आम्ही जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सदरच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन घेण्याकरीता वारंवार गेलो होतो. परंतु त्या कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन न देता अनेक कारणे सांगून परत पाठविण्यात आले. माहिती उपलब्ध होत नाही, त्यामुळे दिनांक २८.१.२००९ रोजी संबंधीत अधिकारी यांचेकडे तक्रार सुध्दा दाखल केलेली आहे. त्यांनी आम्हाला दिनांक १६.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती जरी उपलब्ध झालेली असली तरी ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे व आयोगाच्या निर्णयाचे पालन झालेले नाही व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे निर्णय घ्यावा अशी आयोगास विनंती केली. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आयोगाचा निर्णय झाला त्यावेळेस श्री गुलाब हिरामण टेकाडे हे जन माहिती अधिकारी होते व ते जुलै, २००९ मध्ये सेवा निवृत्त झालेले आहे. परंतु त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. मात्र विद्यमान माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २६.२.२००९ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ८ महिन्याच्या कालावधीत तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु, आज तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवा निवृत्त झालेले आहे व ते अपीलाच्या सुनावणीस हजर नाही. असे असले तरी त्यांनी ८

( पान २ वर ..)

महिन्याच्या कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे सत्य आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून वसुल करुन ती "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करावी.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १९.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २१९/२००९**

**१) श्री  हिराजी माधवराव काळे,**
**मु.पो.ता. गोंडपीपरी, मेन रोड, ग्राम पंचायत जवळ,**
**गोंडपीपरी, जिल्हा चंद्रपूर-४४२७०२.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा  मुख्याध्यापक,**
**श्रीमती सुभद्राबाई सांगडा पाटील माध्यमिक शाळा,**
**ता.गोंडपीपरी, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ अपील क्रमांक ७०८/०८ व अपील क्रमांक ७०९/०८ च्या दिनांक १५.५.२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव अधिनियमाचे कलम १८(१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांना दिनांक ९.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु ती अपूर्ण आहे असे तक्रारदार यांनी त्यांच्या निवेदनात सादर केले आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की, आयोगाचा निर्णय हा दिनांक १५.५.०९ चा असला तरी तो दिनांक ९.७.०९ रोजी त्यांना प्राप्त झाला व त्याच दिवशी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तक्रारदार यांनी पुर्वी सुध्दा अनेक मुद्यांवर माहिती मागितलेली होती व ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, मुद्या क्रं. ४ मध्ये सन २००३-०४ पासून तर २००७ चे गोपनिय अहवाल अजूनपर्यंत पुर्नविलोकन समितीकडे असल्याने उपलब्ध नाही. मुद्या क्रं. ५ जी.पी.एफ.चा रेकार्ड उपलब्ध नाही. मुद्या क्रं. १७ हा संस्थेस मिळालेल्या अनुदाना संबंधी असून आकडे मोडकरुन माहिती दिलेली आहे. कार्यालयीन रेकार्डची सत्यप्रत नाही. मुद्या क्रं. १८,१९ व २१ संबंधीची माहिती एम.सी.सी. अनुदानाबाबतची असून त्याची जबाबदारी मा. शारीरिक शिक्षकावर ढकलण्यात आली व संबंधीत शारीरीक शिक्षकाकडील नोंद पुस्तक गहाळ झाल्याचे नमुद करण्यात आले. परंतु हया आर्थिक नोंदीची जबाबदारी झटकून मा.माहिती अधिकारी आर्थिक अपहाराला पाठीशी घालत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जी माहिती उपलब्ध आहे ती दिलेली आहे. शोध घेवून पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करता येईल. व त्यामुळे गैरतक्रारदार यांनी सदरची माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा जन माहिती यांचे विरुध्द शास्ती

( पान २ वर ..)

लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांचे तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारकर्ता यांना वर विवेचनात नमुद केल्याप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७८/२००९**

**१) श्री अश्विनकुमार उत्तमचंद लाड,**
**कार्यालय उद्योग सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, गोंदिया. ता.जि. गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी अपील क्रमांक ४६५/०८ मधील दिनांक २३.४.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या कारणास्तव सदरची तक्रार राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, तक्रारदार यांच्या वैद्यकिय प्रतिपुर्ती देयकाचा शोध घेण्यात आला व त्या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, गोंदिया यांना पत्र देण्यात आले होते. परंतु टिपणीची प्रत मिळाली नाही. गट विकास अधिकारी पंचायत समिती, गोंदिया यांचे पत्र दिनांक २६.१०.२००९ अन्वये कार्यालयीन अभिलेखाचे वर्गीकरण करणे सुरु असताना सदर नस्ती मिळाली असून टिपणीची छायांकित प्रत सोबत आणलेली आहे. ती तक्रारदार यांना देण्यात येईल. टिपणीची प्रत न देण्याबाबत कोणत्याही प्रकारचा दुर हेतू नव्हता असे त्यांनी सांगितले. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांना टिपणीची प्रत जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २२१/२००९**

**१) श्री जावेद अली जुल्फेकार अली,**
**नातील चौक सर्कल नं.१, भालदारपूरा, नागपूर.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकरी,**
**प्रशासकिय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक २६.८.२००९ रोजी अपील क्रमांक ९३८/०८ मधील दिनांक १८.६.२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही महणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने ३.९.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला. सदरच्या खुलाशाप्रमाणे मागितलेली माहिती पुरविण्यासंबंधी शोध घेतला असता सदरच्या माहितीचे पत्र या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येणार नाही असे कळविले होते. तरी उपरोक्त आपले दिनांक १८.६.२००९ चे आदेशान्वये याबाबत सदरचा रेकार्ड संबंधी इतरत्र संस्था व संबंधीत महाविद्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे. त्याप्रमाणे दिनांक २७.८.२००९ रोजी अर्जदारास कळविले आहे. व त्या पत्राची प्रत जोडण्यात आलेली आहे. परंतु दिनांक २७.८.२००९ च्या पत्राप्रमाणे श्री आर.एम.खान नायडू, सचिव, बाबुराव काळे शिक्षण प्रसारक मंडळ व प्राचार्य, पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत व्यक्ती व संस्थेवर त्यांना असलेल्या अधिकाराप्रमाणे प्रशासकिय

(पान २ वर..)

कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी श्री आर.एम.खान नायडू, सचिव, बाबुराव काळे शिक्षण प्रसारक मंडळ तसेच प्राचार्य, पुरुषोत्तम थोट समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांचे विरुध्द हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांना असलेल्या अधिकारात प्रशासकिय कार्यवाही करावी व तक्रारदार यांना माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २०८/२००९**

**१) श्री सुरेंद्रकुमार ताराचंद सोनवाने,**
**बब्बा भवन, बिल्डींग जवळ, श्रीनगर गोंदिया.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(सा.प्र.वि.)**
**जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक१३.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २५८१/०७ च्या दिनांक २.२.०९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक ५ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २९.८.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला होता. खुलाशामध्ये अर्जानुसार मागितलेल्या माहितीच्या बाबत तपासणी होणे बाकी आहे. तपासणी होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल, असे तक्रारदार यांना कळविले होते. परंतु आयोगाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा नंतर चौकशी अहवाल उपलब्ध करुन न दिल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारकर्ता यांना, जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत चौकशी अहवाल उपलब्ध करुन द्यावा.

२) अपील क्रमांक २५८१/०७ च्या निर्णयाप्रमाणे सुध्दा चौकशी अहवाल किंवा मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची

( पान २ वर..)

कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना पुढील कार्यवाहीसाठी प्रत.

४) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७५/२००९**

**१) श्री तरुण चतुरभाई परमार,**
**१८, भूपेश नगर, पोलीस लाईन टाकळीच्या मागे,**
**नागपूर-१३.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**गुन्हे शाखा, नागपूर शहर, प्रशासकिय इमारत क्रं.१,**
**सिव्हील लाईन्स, नागपूर-१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १८.६.२००९ रोजी अपील क्रमांक ५८९/०८ मधील दिनांक ४.५.२००९ च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारीचा खुलासा दिनांक २३.७.२००९ रोजी मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे दिनांक ३१.७.२००९ रोजी खुलासा करण्यात आला असून तक्रारदार यांना पोलीस नियमावली भाग-१ ची छायांकित प्रत व श्रीमती पुष्पा एकनाथ उबरहांडे यांना गैरअर्जदार तरुण चतुरभाई परमार याने फोनवर दिलेल्या धमकीबाबत तक्रार अर्जाची चौकशी संबंधातील टिपणी पत्राची प्रतसह दोन्ही कागदपत्रे अपीलार्थी यांस निर्णयाच्या अधिन राहून विहित मुदतीत माहिती दिनांक ९.५.२००९ रोजी पुरविण्यात आली. स्वाक्षरीची पोच जोडलेली आहे, असे नमुद केले आहे. परंतु तक्रारदार यांनी असे सांगितले की, त्यांना कोणत्या डी.सी.पी.ने मोबाईल वरुन आदेश दिले होते त्यांचे नांव उपलब्ध करुन दिले नाही. त्यामुळे सदरचे नांव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

( पान २ वर..)

**आदेश**

१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून ज्या डी.सी.पी.ने मोबाईल

वरुन आदेश दिले होते त्या डी.सी.पी.चे नांव तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पुरविण्यात यावे अन्यथा जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९९/२००९**

**१) श्री मोहन वासुदेव केळकर,**
**९०, उषःकाल बिल्डींग, गांधीनगर, नागपूर**
**ता.जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(पदुम)**
**कृषि, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(पदुम-६),**
**कृषि, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांचेकडे विभागीय चौकशीच्या संदर्भातील फाईलवरील टिपणीच्या सत्यप्रती मागितलेल्या दिसून येते. परंतु सदरची माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(त्र) अन्वये गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही असे त्यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक २८.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.१०.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व आयोगाकडे केलेल्या खुलाशावरुन असे दिसून

( पान २ वर..)

येते की, सदरची माहिती ही विभागीय चौकशीच्या संदर्भात सन ९२-९३ मधील असून चौकशी पुर्ण होऊन अहवाल शासनास सादर होऊन १० वर्ष झालेले आहे व चौकशी अधिकारी यांनी त्यांना त्याबाबत निर्दोष सोडलेले आहे. सदर चौकशीत गोपनिय असे काहीही राहीलेले नाही, त्यामुळे त्यासंबधातील माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची गोपनियता असण्याचे कारण नाही, असे त्यांनी सांगितले. व असेही चौकशी अहवाल पुर्ण होऊन १० वर्ष झाले असल्यामुळे व त्यात अंतिम निर्णय झालेला नसेल तर व तो आणखी १० वर्ष होणार नसेल तर अपीलकर्ता यांना माहिती नाकारणे हे त्यांच्यावर अन्यायकारक होईल. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली मुद्या क्रं. १ व २ ची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितलेली त्यांच्या विषयीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी अन्यथा शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९७५/२००९**

**१) श्री फैजान अख्तर व.अब्दुल खालीफ,**
**हन्डी ओली, गुजरी बाजार, कामठी, ता.कामठी,**
**जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष,**
**राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा,**
**काळभैरव मंदिर के पास, नया बाजार, कामठी,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा,**
**काळभैरव मंदिर के पास, नया बाजार, कामठी,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे रामा शंकर मिश्रा, सहायक शिक्षक की नियुक्ती के लीये समाचार पत्र में दिये जाहिरात का सत्यप्रत (२) इस नियुक्ती के लिये आवेदन किये उमेदवारों की यादी (३) रामाशंकर मिश्र को दिये गये पगार का प्रमाणपत्र (४) रामा शंकर मिश्र को दिये नियुक्ती आदेश की सत्यप्रत (५) हिंदी अथवा अंग्रजी माध्यम का शिक्षक उर्दू माध्यम में नियुक्त हो सकता है इस संबंध में माहिती अधिकार की व्याख्या के अनुसार परिपत्रक, आदेश, प्रसिध्दीपत्रक अथवा अभिप्राय जो भी आपके पास हो उस की सत्यप्रत., इ.माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.७.०९ रोजी १०/- रुपये पाच पृष्ठांचे व ३०/- रुपये पोस्टल चार्जेस असे मिळून एकुण ४०/- रुपयाची मागणी केलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १४.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१०.२००९ रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे असे कळवून वारंवार माहिती मागून त्रास देण्यात येऊ नये असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे

(पान २ वर ..)

समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक १४.८.२००९ रोजी त्यांना माहिती मिळाली होती. परंतु जाहिरातीची सत्यप्रत मिळाली. परंतु नियुक्ती के लिए आवेदन किये उमेदवारों की यादी नही मिली. पगार का प्रमाण नही मिला. और नियुक्ती आदेश नही मिला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ही माहिती अर्जदारास दिली नाही हे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. त्यांना वेगळीच माहिती देण्यात आली असे अपीलकर्ता यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची शाळा ही विना अनुदानित आहे. व त्यामुळे पगार रोखीने दिला जातो. त्यात कोणत्याही प्रकारचे वेतन देयक नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक होते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रं. २, ३ व ४ ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०१२/२००९**

**१) श्री नारायण गोविंदराव नंदनवार,**
**पंचायत समिती, रामटेक, ता.रामटेक, जि.नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),**
**जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे २० ऑगष्ट, १९९६ रोजी निलंबित केलेल्या प्रकरणाचा झालेल्या निर्णयाबाबत माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.१२.२००७ रोजी सदर प्रकरणात संपूर्ण अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी यांना या कार्यालयास सादर करण्याबाबत दिनांक २५.१२.२००७ चे पत्रान्वये कळविले आहे. तरी सदर्हु माहितीच्या अनुषंगाने प्रकरण निकाली काढण्याचे दृष्टीने आपण आपले म्हणणे मांडण्याकरीता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दिनांक २८.१२.२००७ ला उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. दिनांक ७.३.२००८ रोजी सुनावणीस हजर राहाण्यास कळविले व त्यावेळेस अपीलकर्ता यांना निलंबन प्रकरणात सविस्तर माहिती देण्यात आली व निलंबन प्रकरणावर अंतिम निर्णय देण्यास्तव या कार्यालयाचे पत्र दिनांक २९.९.२००९ अन्वये वसुलपात्र रकमेबाबत खुलासा मागविला आहे. श्री एन.जी. नंदनवार यांचा खुलासा दिनांक १२.११.२००८ ला प्राप्त झाला असून निर्णयाकरीता नस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आली आहे. निर्णयाची आदेश प्रत क्रं.१०५१८ दिनांक २४.११.२००९ अन्वये अर्जदारास पाठविण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांच्या १९९६ मध्ये झालेल्या निलंबनाच्या संदर्भात आतापर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही व ते सेवानिवृत्त झाल्यास त्यांना निवार्ह वेतन सुध्दा मिळणार नाही. त्यामुळे त्यांनी माहिती मागितली होती. जन माहिती

(पान २ वर..)

अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची नस्ती उपलब्ध झालेली नाही व ही माहिती पारशिवनी येथे आहे. नस्ती उपलब्ध न झाल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे व त्याबाबतची माहिती अवगत करण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना प्रकरणात झालेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत, प्रकरणात झालेल्या कार्यवाहीची व पुढे होणा-या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १२१/२००९**

**१) श्री शरद बळीरामजी ढगे,**
**नवी शुक्रवारी फवारा चौक,**
**हनुमान मंदिरा समोर, नागपूर. तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमि अभिलेख कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. तक्रारकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दिनांक ८.४.२००९ च्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु सदरची माहिती अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयात उपलब्ध नाही, असे मात्र त्यांना कळविण्यात आलेले आहे, त्या पत्रावर तारीख नाही. व सदरचा अर्ज हा नगर भूमापन अधिकारी, क्रं.१ यांचे कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे असे कळविले होते. परंतु त्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. व ते त्या कार्यालयात पत्र घेवून गेले असता त्यावर तारीख नाही या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास असमर्थता व्यक्त केली असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांची मुळ तक्रार जी आहे त्यात नगर भूमापन कार्यालयातील श्री सावरकर यांनी अतिक्रमण केलेले असल्यामुळे ते माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे. वास्तविक, तक्रारदार यांनी दिनांक ८.४.२००९ रोजी तक्रार केल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) प्रमाणे सदरचा अर्ज हा ५ दिवसांचे आंत संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर करणे आवश्यक असते. सदरचा अर्ज हा दिनांक २४.४.२००९ रोजी हस्तांतर करण्यात आला, हे जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. परंतु सदरची तारीख ही नंतर टाकण्यात आली असे दिसून येते कारण तक्रारदार यांच्या पत्रावर तारीख नाही. व विलंबाने हस्तांतरण करण्यात आलेले असल्यामुळे संबंधीत कनिष्ठ लिपिक किंवा इतर कोणीही संबधीत लिपिक हे जर त्यास जबाबदार असल्यास त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत नगर भूमापन अधिकारी क्रं.१, नागपूर यांचे

( पान २ वर..)

कार्यालयातून उपलब्ध करुन घेवून विनामुल्य रजिस्टर पोस्टाने तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास संबंधीत जन माहिती अधिकारी, अधीक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालय, हे शास्तीस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

२) तक्रारदार यांच्या अर्जाचे हस्तांतरण ५ दिवसांचे आंत न केल्यामुळे जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येते. सदरची विभागीय चौकशी ही सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची आहे. त्याकरीता निर्णयाची एक प्रत, उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी प्रत.

४) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९७९/२००९**
**अपील क्रमांक ९८०/२००९**

**१) श्री वामन निळकंठ देशपांडे,**
**एम.आय.जी.२४/४, भामटी परसोडी, हाऊसिंग बोर्ड कॅालनी,**
**त्रिमुर्ती नगर, रिंग रोड, नागपूर-२२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर.**
**ता.जि. नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर.**
**ता.जि. नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखले केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ९७९/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे श्री वामन निळकंठ देशपांडे व स्व. म.नि.देशपांडे, २४/४ यांचेकडे असलेल्या एकुण थकबाकीची सविस्तर माहिती देण्याचे करावे. भूभाडे, सेवा आकार, सरचार्ज एकुण कालावधी, दर काढलेली रक्कम ..वगैरे माहिती सुरुवातीपासून मार्च, २००९ पर्यंत. भूखंडाचे समायोजन भविष्यातील भूभाडयात करण्यात येईल असे मान्य करुन मंडळास या दोघांना देणे असलेली रक्कम कळविली. तीचा विचार थकबाकी दाखवताना केला होता. प्राधिकरणाचा खास आक्षेप नव्हता. तर मग थकबाकी कशी राहील याची माहिती द्यावी. सेवा आकार मार्च २००२ नंतर वाढवला, हे कोणत्या पत्राद्वारे कळविले याची माहिती द्यावी व विलंबाकरीता आम्ही जबाबदार असे सिध्द करणारे परिपत्रक देण्याचे करावे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही.

३. अपील क्रमांक ९८०/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी कै. म.नी. देशपांडे, एम.आय.जी. २४/३ भामरी परसोडी हाउसिंग बोर्ड, कॅालनी यांचा भाऊ व वारसदार, यांचे संदर्भात प्राधिकरणास दिनांक ८.४.२००९ च्या पत्राद्वारे तक्रार देण्यात आली होती. त्याच्या कार्यवाहीची माहिती द्यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.६.२००९ रोजी, सदरचा अर्ज नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीत असल्याने मुळ अर्ज मुख्य कार्यकारी

( पान २ वर.. )

अधिकारी, नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचेकडे परस्पर पाठविण्यात आला आहे, असे त्यांना माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,यांनी कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक १४.७.२००९ रोजी मिळकत व्यवस्थापक, तथा माहिती अधिकारी, नागपूर गृह निर्माण क्षेत्र विकास मंडळ यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये उपलब्ध झ ाालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००९ रोजी दोन प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक २६.१०.२००९ रोजी माहिती उलपब्ध करुन दिलेली दिसून येते. व दूस-या अर्जाच्या संदर्भात प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना भूभाडयाचे समायोजन भविष्यातील भूभाडयात करण्यात येईल असे मान्य केल्यानंतर थकबाकी कशी राहील ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच मुद्रांक शुल्क रुपये ८५०/- जास्त घेण्यात आले, त्याबध्दल कोण जबाबदार आहे याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तसेच सुरुवातीपासून मार्च, २००९ पर्यंतची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, भूभाडयाच्या समायोजनाच्या संदर्भात थकबाकी कशी राहील याबध्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल व सुरुवातीपासून मार्च, २००९ पर्यंतची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. तसेच मार्च, २००२ नंतर सेवा आकार वाढवीला हे कोणत्या पत्राद्वारे कळविले याबध्दलची माहिती सुध्दा उपलब्ध करुन देता येईल. परंतु २००२ पर्यंत कोणत्या प्रकारे वाढ करण्यात आली हे काढण्यात आलेले नसल्यामुळे ते आता काढून देता येणार नाही असे सांगितले. मात्र त्या नंतरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. तसेच रुपये ८५०/- जास्तीचे घेण्यात आले याबध्दल कोण जबाबदार आहे याबध्दल सुध्दा नांव उपलब्ध करुन देता येईल. तसेच २८० एम.आय.जी. भामरी परसोडी गाळयाची मुळ किंमत अंदाजे म्हाडा नियमानुसार रुपये ७७१००/- होते. परंतु किंमत अंदाजित असल्यामुळे म्हाडाच्या नियमानुसार वर्गवारी व किंमत निश्चित झाल्यानंतर फरकाची रक्कम रुपये १०,०००/- सर्व गाडेधारकांना परत करण्यात आली. त्यात अपीलकर्ता अपीलकर्ता श्री वा.नी. देशपांडे यांनी सुध्दा रक्कम परत घेतली. सुधारित किमतीवर प्रत्यक्ष किती मुद्रांक शुल्क होईल याबाबत कळविण्यात आले. तसेच शासनाच्या योजनेचे जाहिर पत्र दिलेले आहे. त्यावर त्यांनी आक्षेप घेतला की, ८५०/- रुपये जास्त घेण्यात आले. वरील कळविलेल्या किमतीची माहिती मुद्रांक शुल्क विक्रेत्याला कळवावी जेणेकरुन समाधान होईल असे पत्र सुध्दा त्यांना देण्यात आले. तसेच रुपये १०,०००/- त्यांना परत करण्यात आले असले तरी गाळयाची किंमत ६७,१००/- रुपये ऐवजी रुपये ७७,१००/- दाखविण्यात आली. त्यामुळे रुपये ८५०/- मुद्रांक शुल्क जास्त झालेले आहे. त्याबध्दल जबाबदार कोण याची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. त्याकरीता दोनही अपीले मंजूर करण्यास पात्र आहे.

( पान ३ वर..)

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९७९/२००९ व अपील क्रमांक ९८०/२००९ हे मंजूर

करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.७.०९ व दिनांक २५.५.०९ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुद्येनिहाय हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०१०/२००९**

**१) श्री एम.जी. गंथाळे,**
**द्वारा-श्रीमती सुशिला गोपीचंद गंथाळे, वार्ड क्रं.१५ ते ३० च्या मागे,**
**इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,**
**इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,**
**(मेयो), नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,**
**(मेयो), नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मा.अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांचेकडे, मा.औद्योगिक न्यायालय नागपूर यांचे आदेशाला अधिन राहून क लिपिक या पदावर पदोन्नती बाबत दिनांक ३.११.२००४ रोजी पासून आज पर्यंत सादर केलेल्या विनंती अर्जा बध्दल केलेली कार्यवाही संबंधी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती शिघ्रपोस्टाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २९.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी अयोगापुढे सांगितले की, त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात व मानीव दिनांकाच्या संदर्भात जे प्रस्ताव पाठविण्यात आले होते त्या संदर्भात अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. संचालक यांचेकडून आलेल्या पत्राची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे त्यांना अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली हे सिध्द होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे जी माहिती पुरविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली, ती माहिती त्यांनी अपीलकर्ता यांना कळविली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी त्या पत्राची प्रत आयोगास दाखविली व ते पत्र वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालक यांचेकडून अधिष्ठाता यांचेकडे दिलेले असून त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांचेकडेच आहे. व त्याबाबत पदोन्नती व **(पान २ वर..)**

मानीव दिनांकाचा प्रस्ताव पाठवावा असे दिलेले असले तरीही कार्यालयातून असा प्रस्ताव पाठविला जात नाही त्यामुळे वरील माहिती मागितलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.९.२००९ रोजीचे अर्जात मागितलेली माहिती वेळीच संचालक व सचिव यांचेकडून आपलेल्या पत्रव्यवहाराची माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०११/२००९**

**१) श्री डी.नंदन लोहारुका,**
**६२-ए, साई महिमा कॅालनी, चिच भवन, वर्धा रोड,**
**नागपूर-४४०००५. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. स्टेशन रोड, सदर नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(नि)(पश्चिम),**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. स्टेशन रोड, सदर नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे खालीलप्रमाणे ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

१. What is the status of Development or initiatives of the NIT/NMC sanctioned lay out No.३८१ under scheme of ५७२ lay out. (२) Please inform in year wise break up that how much amount has been collected under development scheme. (३) Who and which Deptt.Officer is responsible for the stand still development of the said lay out and sufferings of residents without basic amenities, means & needs since २००२. (४) Till which date Development of said lay out No. ३८१ of NIT is expected to be initiated or will be completed.

अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.४.२००९ रोजी माहिती या शब्दाच्या व्याख्येत येत नसल्यामुळे माहिती देता येणार नाही. तसेच खसरा क्रं. ६३/१-२, मौजा चिंचभवन, बहुजन समाज आवास निवास निवारण गृहनिर्माण सहकारी संस्था, अभिन्यास क्रं. ३८१/५७२ ची जागा नागपूर शहराच्या विकास आराखडया नुसार मिहान प्रकल्प हद्यी अंतर्गत येत असल्याने सद्यस्थितीत या अभिन्यासाची नियमितीकरणाबाबतची कार्यवाही थांबविण्यात आलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयात १५ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिले व त्यानंतर दिनांक १७.९.२००९ रोजी

( पान २ वर..)

तसेच दिनांक २५.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिलेली आहे. व त्याबाबत त्यांनी युक्तीवाद करताना आयोगास सांगितले की, त्यांना संपूर्ण माहिती दिलेली नाही व जी माहिती दिलेली आहे त्यातही ब-याच व्यक्तींची नांवे सोडलेली आहेत. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही जूनी आहे व ती माहिती संपूर्ण तयार करुन द्यावयाची झाल्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. तसेच मिहान प्रकल्पामुळे सदरच्या जमीनीवरील विकासाचे कामकाज बंद करण्यात आलेले होते. त्याबध्दलचा शासन निर्णय आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना अर्जाचे अनुषंगाने माहिती ही संपूर्ण उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी अर्ज वाचावा व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १९.३.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अर्जाचे वाचन करावे व माहिती द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १८८/२००९**

**१) श्री संजय गोविंदरावजी कांबळे,**
**मु.पो.सुरगांव, ता.सेलु, जि. वर्धा.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
**राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर रुग्णालय,**
**तुकडोजी चौक मानेवाडा, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.११.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १७.७.२००९ रोजी अपील क्रमांक ५२९/२००८ च्या दिनांक २८.४.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

सदरच्या तक्रारीच्या संदर्भात प्रशासकिय अधिकारी, श्री एस.के.नायर यांनी खुलासा दाखल केला आहे. त्यात राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पीटल व रिसर्च सेंटर यास अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाही असे कळविलेले आहे. तसेच जी माहिती मागितलेली होती त्या माहितीच्या संदर्भात श्रीमती वंदना स. कांबळे यांनी माहिती उपलब्ध करुन देवू नये असे कळविले होते. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती. व त्यामुळे त्यांचे विरुध्दचे शास्तीचे आदेश रद्द करण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी तक्रार दाखल केलेली दिसून येते. पुन्हा तक्रारीच्या संदर्भात प्रशासकिय अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. व त्यामध्ये त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे व त्यांनी आक्षेप घेतलेला असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असेच कळविलेले आहे. व म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली नाही. व तसा खुलासा दिनांक २६.८.२००९ रोजी दाखल

( पान २ वर..)

केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असे दिसून येते. व त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.११.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 795/2009

श्री ज्ञानेश्वर गो. डायगव्हाणे
प्लॉट नं. 10 मंगलधाम सोसायटी
श्रामकृष्ण हॉल समोर दत्तवाडी नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
2) श्रीमती हेमलता गोविंदराव सावरकर
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका
स्वामी विवेकानंद हायस्कूल वडधामना
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर नाहीत. परंतु त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका स्वामी विवेकानंद हायस्कूल वडधामना यांचेकडे मा. प्रशासक स्वामी विवेकानंद हायस्कूल वडधामना यांनी घेतलेल्या सभांच्या प्रती मिळण्याबाबत (शाळा समितीचा व सल्लागार समितीचा) मा. प्रशासक यांनी श्री अ.बा.उमरेडकर विवेकानंद हायस्कूल वडधामना यांनी दि. 3.5.08, 20.9.2008, 17.1.09, 3.3.09, 13.3.09 ला सभा घेण्यात आली. वरिल सर्व सभेच्या बैठकीचे संपूर्ण ठरावाचे इतिवृत्ताच्या छायांकीत प्रती प्रशासक साहेबांच्या स्वाक्षरी असलेले. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा रजिष्टर पोष्टाने असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.4.2009 रोजी मागितलेल्या माहितीच्या खर्चाची रक्कम रु. 44/— शाळेत जमा करावे. त्यानंतर शाळेत उपलब्ध असलेली माहिती आपणास देण्यात येईल. अशी सुचना करण्यात आली. त्यानुसार आपण अर्जात लिहीलेल्या पत्त्यानुसार शाळेत उपलब्ध असलेली माहिती रजिस्टर्ड पोष्टाने या पत्रासोबत

पाठविण्यात येत आहे असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा अर्ज केला. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 2.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी मुख्याध्यापिका यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा दंडास पात्र राहाल पत्र त्यांनी दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना शाळेत उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु प्रशासका संबंधी जी माहिती आहे ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असही कळविलेले आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी जी माहिती त्यांनी मागीतलीच नाही ती माहिती त्यांना रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी शाळा समितीचे पुर्वीचे ठराव मागितलेले नव्हते तर प्रशासक यांनी दि. 3.5.08, 20.9.2008, 17.1.09, 3.3.09, 13.3.09 रोजी सभा घेवून ठराव पारीत करण्यात आलेले आहे त्या ठरावाची माहिती मागितलेली होती. सभेच्या इतिवृत्ताचे एकच रजिस्टर आहे. कोणतेही प्रशासक त्यांची मुदत संपल्यानंतर कागदपत्र घेवून जात नाहीत. त्यांच्या या सर्व सभांना शिक्षक हजर होते. प्रशासकानी घेतलेल्या सभाची अंमलबजावणी मुख्याध्यापिकेनी करावयाची नसल्यामुळे त्या माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे असे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण प्रक्रिया ही 30 दिवसामध्ये पूर्ण करावयाची असते. परंतु अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 23.3.2009 चा असून सुध्दा व त्यात मागितलेली माहिती ही सुस्पष्ट असुन सुध्दा त्यांना ठरावाच्या प्रतीकरीता 30 व्या दिवशी म्हणजे दि. 24.4.2009 रोजी खर्चाचा भरणा करण्यास पत्र देण्यात आले. यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ होत आहे हे सिध्द होते. तसेच अपीलकर्ता यांनी असे सांगितले की खर्चाचा भरणा केल्यावर सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती. परतु प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांनी जी माहिती दिली ती न मागीतलेली दि. 12.7.2005 च्या ठरावाची माहिती त्यांनी दिली. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्या सल्लागार समितीच्या सचिव आहेत. त्यामुळे त्यांना त्या ठरावाच्या प्रती दिल्या. वास्तविक अपीलकर्ता यांनी अर्जात स्पष्टपणे तारखा दिलेल्या आहेत ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रशासकाच्या संदर्भातील माहिती त्यांचेकडे नसली तरी त्यांनी तसे लेखी कळविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केले नाही. प्रशासकांना सर्वच प्रक्रिया माहिती असते व माहित असुनही त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश मुख्याध्यापिका यांना दिलेले होते. परंतु आदेशाचे पालन मुख्याध्यापिका यांनी कलेले नाही. त्यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका

हया शास्तीस पात्र आहेत. तसेच अपीलकर्ता यांना रु. 44/- भरणा करावा असे शेवटच्या दिवशी कळविलेले असल्यामुळे व माहिती सुध्दा जी मागितलेली नाही ती दिलेली असल्यामुळे सदरचे रु. 44/- परत करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 23.3.2009 च्या अर्जात आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णनामध्ये दिलेल्या तारखाच्या ठरावाच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.
2) अपीलकर्ता याच्या दि. 23.3.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा खर्च हा शेवटच्या दिवशी कळविलेला असल्यामुळे व त्यानंतरही माहिती दिशाभूल करणारी दिलेली असल्यामुळे रु. 44/- हे अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत परत करण्यात यावी.
3) माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा आदेश सुध्दा पाळलेला नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचे विरुध्द रु. 1000/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
4) सदरची कार्यवाही ही प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांनी करावयाची आहे
5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 951/2009**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जनार्धन भानुशाली
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता रो.ह.यो.( सार्वजनिक बांधकाम )
विभाग गोंदिया ता. जि. गोंदिया

2) सौ. जया ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम उप विभाग अर्जुनी मोर.
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.5.2009 रोजी ( दि. 26.5.2009 रोजी ) जन माहिती अधिकारी उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग अर्जुनी मोर. यांचेकडे मौजा जानवा येथील अंदाजे दि.16.12.2008 मध्ये शासनाकडुन सार्वजनीक बांधकाम मिळाले आहे व आंगनवाडीजवळ लेआऊट घेण्यात आला होता. परंतु अजुनपर्यंत बांधकाम चालू झालेला नाही. कारण काय? बांधकाम आलेला किंवा नाही माहिती मागीतली असता मिळाली नसल्याने ती देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.8. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही प्रथम

अपीलाचा निर्णय झाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या वेगवेगळया अर्जाच्या संदर्भात आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कार्यकारी अभियंता यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे तो येणेप्रमाणे.

1. दि.16.3.2009 ला सरपंच ग्रा.पं.जानवा यांनी मौजा जानवा येथे सन 2009 मध्ये सार्वजनीक बांधकाम मिळाले आहे. आंगनवाडीजवळ दोन महिन्यापूर्वी लेआऊट घेण्यात आला होता. परंतु बांधकाम सुरु झाले नाही. अशी माहिती विचारली होती.

2. दि. 22.5.2009 रोजी सदर कामासंबंधी माहिती उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग अर्जुनी मोर. यांना विचारली. त्यात दि.16.12.2008 लेआऊट घेतल्याचे कळविले परंतु त्यांना कोणत्या कामाचा लेआऊट घेण्यात आला याचा उल्लेख नाही.

3. दि. 10.8.2009 ला कार्यकारी अभियंता रो.ह.यो.( सार्वजनिक बांधकाम ) विभाग गोंदिया यांना वरील कामासंबंधी माहिती विचारली होती.

4. या कार्यालयाचे पत्र क्र. 7279 दि. 3.10.2009 रोजी सहा. अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग अर्जुनी मोर. यांना सदर कामाची माहिती मागितली होती.

5. सहा. अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग अर्जुनी मोर. यांनी श्री नानाजी जैदास रामटेके रा. जानवा पो. इटखेडा ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया यांना त्यांचे पत्र क्र. 854 दि. 9.10.2009 रोजी पोष्टाने माहिती पाठविली आहे. त्यात सार्वजनिक बांधकाम उप विभाग अर्जुनी मोर. आंगनवाडीजवळ कोणत्या कामाचे लेआऊट घेण्यात आलेले नाही. श्री नानाजी जैदास रामटेके रा. जानवा यांचे माहिती अर्जात कोणत्याच कामाचे उल्लेख नाही तसेच त्यांना वेळोवेळी लेआऊट च्या तारखा दि.16.12.2009 व 16.12.2008 अशा वेगवेगळया तारखा दिलेल्या आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांच्या गावामध्ये बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्याच बांधकामाचे एस्टिमेट त्यांना उपलब्ध करुन द्यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना झालेल्या बांधकामाचे एस्टिमेट हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत पुर्वी उपलब्ध करुन दिलेले नसल्यामुळे उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 800/2009

श्री मोहन वासुदेव केळकर
90 उषःकाल बिल्डींग गांधीनगर
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन)
आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय
प्रशासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग
वरळी सीफेस मुंबई 400018

2) जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय
प्रशासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग
वरळी सीफेस मुंबई 400018 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. सदरचे अपील हे दि. 7.10.2009 रोजी सुनावणीस ठेवण्यात आले होते. त्यावेळेस सर्व अधिकारी हजर होते व त्यावेळेस त्यांनी कागदपत्रे ठेवली होती. परंतु अपीलाची सुनावणी होवू न शकल्यामुळे आज दि.3.11.2009 रोजी सुनावणीस ठेवण्यात आले व त्यामुळे प्रादेशिक कार्यालयातील अधिका–यांना प्राधिकृत करण्यात आलेले दिसून येते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी दुग्धव्यवसाय विकास विभाग आयुक्त यांचे कार्यालयामध्ये अपीलासंबंधात विवरण पत्र क नुसार माझा फॅक्स संदेश दि. 3.6.2008 व माझा अर्ज दि. 19.7.2008 तसेच माझा अर्ज दि. 8.5.2009 चे संदर्भात अंतिम आदेशाची प्रत देण्यात यावी. सोबत सुलभ संदर्भासाठी दि. 8.5.2009 च्या अर्जाची छायांकीत प्रत जोडलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक

28.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (प्रशासन) यांनी दि.21.8. 2009 च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती देण्यात आलेली आहे. उपरोक्त आदेशान्वये सदर अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जी माहिती मागितलेली होती ती माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही व जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती सुध्दा त्यांनी विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. अपीलकर्ता यांचे अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता व अपीलकर्ता यांना दि. 21.8.2009 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबाबतचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांच्या दिनांक 3.3.08 च्या अर्जाच्या अनुषंगाने नियतकालीक बदल्यांचेवेळी दि. 31.5.2008 चे आदेशान्वये आपली विनंतीनुसार बदली करण्यात आलेली आहे. सोबत अर्जाची प्रत जोडली आहे. त्यामुळे आपले दि. 31.5. 2008 च्या बदली आदेशास शुध्दीपत्र काढण्याची आवश्यकता नाही असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना दि. 3.3.2008 च्या अर्जाप्रमाणे कार्यवाही ही करण्यात आलेली आहे. मात्र त्यांच्या दि. 19.7.08 व दि.8.5.09 च्या अर्जाच्या संदर्भात आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोतील विवरणपत्राप्रमाणे जे विश्लेषण केलेले आहे ते विश्लेषण हे पुर्णतः त्यांनी बदलीच्या संदर्भामध्ये वापरलेल्या भाषेच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या सवरुपात जशी माहिती आहे तशी मिळते. कोणत्याही प्रकारे त्या प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत माहिती आयोगास तपासणी करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी विश्लेषण केलेले असले तरी ते गैरलागू आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयामध्ये सुनावणी दि. 17.8.2009 रोजी ठेवण्यात आली असे नमूद केलेले आहे. परंतु पुढे निर्णयामध्ये दि. 21.8. 2009 च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती देण्यात आलेली आहे. याचा अर्थ सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नव्हती मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना तो दि. 28.8.2009 रोजी दिला. म्हणून जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची संधी देवून निर्णय दिलेला आहे. परंतु मुळातच जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा त्यांच्या दि. 8.6.2009 च्या अर्जा मधील विवरणपत्रात म्हटल्याप्रमाणे दि. 19.7.08 व दि.8.5.09 च्या अर्जाच्या संदर्भात अंतीमतः आदेशाची प्रत त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांच्या दि. 8.6.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय प्रशासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग वरळी सीफेस मुंबई 400018 यांनी करावयाची आहे.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय प्रशासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग वरळी सीफेस मुंबई 400018** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 969/2009

सौ. ज्योती गौतम वानखेडे
155 नझुल लेआऊट बेझनबाग
नगपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गांधी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर

2) श्री एम. एस. बेग
जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक
नगर परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी विभाग नगर परिषद चंद्रपूर श्री रतन कांशीराम खैरे रा. तुकुम चंद्रपुर यांचे घर टॅक्स बाबत वर्ष 2008 ते 2009 च्या कालावधीतील मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 3.3. 2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 15.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.7.2009 रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात आले. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. माहिती मिळाली परंतु भाडेकरुकडे लोक राहतात असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अशी माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसते व त्यामुळे ते उपलब्ध करुन देता येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 963/2009

श्री संजयकुमार भीकचंद पाटनी
अगस्ती मार्ग जाजुवाडी
आर्वी 442201 ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिपक बरबटीकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री दिलीप खंडेलवार
जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक
नगर परिषद कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय यांचेकडे मधुकर मुकुंदराव देशापांडे यांच्या मौजा शहापूर सर्व्हे नं. 61 या जागेवर कशाचे बांधकाम आहे व त्यांना केव्हा परवानगी दिली व विद्युत पुरवठयाचे ना हरकत प्रमाणपत्र केव्हा देण्यात आले वगैरे माहिती 1954 ते 2009पर्यंत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना यांनी दि. 29.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना त्या घराच्या बाबत संपूर्ण माहिती जी उपलब्ध आहे ती सर्व कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. फार वर्षापासूनचे बांधकाम आहे. त्याबद्यलची मालकी हक्क दिलेली आहे. नवीन बांधकामाबाबत परवानगी दिलेली असल्यामुळे माहिती उपलब्ध नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 967/2009

श्री भास्कर तुळशीराम वाढई
गंगाबाई घाट रोड जुनी मंगळवारी
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. एन. रामबाबु
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक
वन विभाग नागपूर
शासकिय मुद्रणालय जवळ सिव्हील लाईन नागपूर
2) श्री एस. बी. भलावी
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी
शासकिय मुद्रणालय जवळ सिव्हील लाईन नागपूर
वन विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय वन अधिकारी वन विभाग यांचेकडे मे 02 ते जानेवारी 2006 या कालावधीतील प्रवास भत्त्याच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 31.7.2009 रोजी प्रवास भत्ता बिलाबाबत सन मे 2002 ते जानेवारी 2006पर्यंत मागणी केलेली माहिती संबंधीत वनपरिक्षेत्र द. उमरेड उ. उमरेड यांचेकडून मागणी केली असता अजूनपर्यंत अप्राप्त आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 2.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5.10.2009 रोजी निर्णय दिलेला असून शासकीय माहिती अधिकारी यांनी पोच पावती विभागीय कार्यालयातील प्रवासभत्ता कक्षाकडून तसेच सहा. माहिती अधिकारी वनपरिक्षेत्र द. उमरेड यांचेकडून अपीलकर्ता यांनी विहीत नमुन्यात बनविण्याकरीता नेलेले बिल प्राप्त झाल्याची पोचपावती प्राप्त करुन सदर माहिती अपीलकर्ता यांना दि. 10 ऑक्टोबर 2009 पर्यंत विनामुल्य पुरवावी. त्याप्रमाणे दि. 14. 9.2009 ला अपीलकर्ता यांना 19 बिलाची माहिती मिळाली व 10 बिलाची माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

परंतु वनपरिक्षेत्र द. उमरेड वन अधिकारी यांनी मा.को.नी. नमुना 18 नियम 249 आणि 272 च्या विहित प्रपत्रात सादर करण्याकरीता उर्वरीत प्रवास भत्ता बिले परत करण्यात आलेले असून अद्यापपावेतो सादर करण्यात आलेले नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याबद्यलचा तपशिल सुध्दा त्यांनी दिलेला आहे. असे असले तरी पुन्हा शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या एकुण 10 प्रवास भत्ता देयकाची परत शोध घेवून त्याबद्यलची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 968/2009

श्री भास्कर तुळशीराम वाढई
गंगाबाई घाट रोड जुनी मंगळवारी
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. एन. रामबाबु
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक
वन विभाग नागपूर
शासकिय मुद्रणालय जवळ सिव्हील लाईन नागपूर
2) श्री एस. बी. भलावी
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी
शासकिय मुद्रणालय जवळ सिव्हील लाईन नागपूर
वन विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय वन अधिकारी वन विभाग यांचेकडे सन 1995 ला सादर केलेले वैद्यकिय बिल रु. 3740.63 चे मला अजुनपर्यंत मंजुर होवून मिळालेले नाही. त्यांची सद्य स्थिती काय आहे. ते कुणकडे पेंडींग आहे त्यांचे नाव व पद यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.7.2009 रोजी वैद्यकिय बिलाबाबत सन 1995 ची माहिती संबंधीत वनपरिक्षेत्र हिंगणा द. उमरेड उ. उमरेड यांचेकडून मागणी केली असता अजूनपर्यंत अप्राप्त आहे. तरी माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दि. 18.8.2009 रोजी प्राप्त झालेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5.10.2009 रोजी निर्णय दिलेला असून शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांनी विभागीय कार्यालयातील लेखापाल आस्था कक्ष व यासंबंधात वरिष्ठ कार्यालयास

पत्रव्यवहार झाला असल्यास वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त करुन सदर माहिती अपीलकर्ता यांना दि. 10 ऑक्टोबर 2009 पर्यंत विनामुल्य पुरवावी असे आदेश दिलेले आहेत. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यात 10 देयकाच्या बाबत माहिती नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यावर सुध्दा संबंधीत अधिका–याने काही देयके अपीलकर्ता यांना परत करण्यात आलेली आहे व तशी जुनी माहिती असल्यामुळे व तसेच अपीलकर्ता यांचे वेगवेगळया रेंज मध्ये नियुक्ती असल्यामुळे त्या त्या रेंजकडून अतिशय जुनी माहिती उपलब्ध करुन घेणे हे विहित मुदतीत शक्य नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे असे सांगितले. त्यावर 1997 ला शासनाकडे देयके पाठविलेले आहे. परंतु ती मंजुर होवून आलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे शासनाकडे जर पाठविलेले असतील तर अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्याकरीता ज्याप्रमाणे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे दि. 25.7.2009 रोजी पत्र पाठविलेले आहे त्याप्रमाणे शासनाकडे पुन्हा रु. 3740.63 च्या करीता वैद्यकीय खर्चाच्या बिलाकरीता पाठपुरावा करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत शासनाकडे पाठपुरावा केल्याची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 965/2009**

सौ. प्रमिला राजेश मेश्राम
के.ऑफ श्री दामोधर खोब्रागडे प्लॉट नं. 56
उंटखाना नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्र. 4 अजनी नागपूर
2) श्री बहुरे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
अजनी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचेकडे एकुण 1 ते 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना दि. 27.5.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपुर्ण माहिती मिळाली या कारणास्तव दि. 30.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.7.2009 रोजी देण्यात आलेला असून वेळेच्या आत 9 मुद्यांवरील माहिती देण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

अपीलार्थी सौ. प्रमिला राजेश मेश्राम के.ऑफ श्री दामोधर खोब्रागडे यांचेकडे किरायाने प्लॉट नं. 56 उंटखाना नागपूर यांनी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त अजनी नागपूर शहर यांचेकडे दि.15.5.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये दिलेल्या अर्जामधील नमुद प्रमाणे 1. मी दि.7.6.07 14.12.07, 26.1.08, 18.12.07, 31. 12.07, 29.1.08, 2.12.08 रोजी आपले पो.स्टे. ला केलेल्या तक्रार अर्जाचा निपटारा ज्या अधिनियमांचे अंतर्गत केला गेला त्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

2. दि.25.6.07 म्हणजेच समझौता झाल्याचे दिवशीच दि.25.6.07 रोजी राजेश मेश्राम यांनी माझे विरोधात रजि. पोष्टाने पाठविलेला तक्रार अर्ज (माझे चारिऱ्यावर शिंतोडे उछविल्याबाबत व मी पागल मानसिक रोगी असल्याबाबतचा) व यावर आपले पो.स्टे.ने जो निपटारा केला गेला मग तो समारात्मक असो किंवा नकारात्मक असा तेव्हा वापरात आणलेल्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

3. दि.7.6.07 ते 16.6.07पर्यंतचे हजिरी पट ची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

4. प.ख.क्र.19/08 भा.द.वि. कलम 498अ,34 मु.दा.दि.12.2.08 या गुन्हयामध्ये घटनास्थळ मी सांगितल्याप्रमाणे रा.भागिरथाबाई ढेंगरे 57 उंटखाना नागपूर असे न लिहीता चंदननगर असे तपासी अंमलदार यांनी स्वतःचे मर्जीने लिहल्या गेले. तेव्हा ज्या अधिनियमांचे अंतर्गत घटनास्थळ लिहल्या गेले त्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

5. प.ख.क्र.19/08 भा.द.वि. कलम 498अ,34 मु.दा.दि.12.2.08 या गुन्हयामधील संपूर्ण आरोपी व आरोपीचे साक्षीदार यांचे घेतलेले बयानांची माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

तसेच हे बयान ज्या अधिनियमांचे अंतर्गत घेण्यात आले त्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

6. प.ख.क्र.19/08 भा.द.वि. कलम 498अ,34 मु.दा.दि.12.2.08 या गुन्हयामधील भंते सुगत बोधी, भागिरथाबाई ढेंगरे, प्रकाश सोनटक्के, सौ.आशा लोखंडे, सौ.विमल खोब्रागडे, सौ कविता फलझेले, सौ.अलका बुलकुंडे यांचे घेण्यात आलेले बयान तेव्हा वापरात आणलेल्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

7. वरील गुन्हयामध्ये माझे दि.17.2.08 रोजी घेतलेले बयान आणि याच गुन्हयासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांपैकी 14.12.07, 26.1.08, 18.12.07, 31.12.07, 29.1.08, 2.2.08 या तक्रारीच्या प्रती व दि.1.2.08 रोजीचे महिला सेलचे लेटर फायनल फेरीसह दाखल करण्यात आलेले नाही. तेव्हा ज्या अधिनियमांचे अंतर्गत दाखल करण्यात आलेले नाही त्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

8. वरील गुन्हयामध्येच गुन्हयाच्या तपासाच्या निकालाची माहिती मला ज्या अधिनियमांचे अंतर्गत पुरविल्या गेलेली नाही त्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत कृपया देण्यात यावी.

9. वरील गुन्हयामध्येच असणारे आरोपी जय मोटघरे यांचे विरोधात दि.22.4.08 रोजी तक्रार अर्ज केला होता. तेव्हा तो अपराध ज्या अधिनियमांचे अंतर्गत कॉग्निझेबल अपराध ठरु शकला नाही. त्या अधिनियमाचे नाव कलम व कार्यपध्दती चे माहितीची सत्यप्रत देण्याबाबतची माहिती मागण्यात आली होती. शासकीय माहिती अधिकारी अजनी नागपूर यांनी अपीलार्थी यांना त्यांचे कार्यालयीन जा.क्र.सपोआ/आवि/माअ/1010/09 दिनांक 27. 5.09 अन्वये उपलब्ध असलेली मुद्येनिहाय माहिती अपीलार्थीस दि. 1.6.09 रोजी देण्यात आलेली आहे. शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अपीलार्थीचे समाधान न झाल्याने अपीलकर्ती यांनी दि.30.6.2009 रोजी स्वतः कार्यालयात हजर येवून

अपील अर्ज आणुन दाखल केला. त्यांनी सदरचा अर्ज मुदतीचे आत दिल्याने त्याचा अपील अर्ज विचारात घेण्यात आला.

अपीलार्थी यांचा अर्ज आणि जन माहिती अधिकारी अजनी नागपूर यांनी सादर केलेल्या माहितीचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी यांना अपील अर्जासंबंधाने दिनांक 14.7.09 रोजी बोलावुन त्यांचे म्हणने ऐकुन घेण्यात आले. सदर अपीलीचे सुनावणीदरम्यान अपीलार्थीने आपले अपिली संदर्भाने व शासकिय माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीस अनुरुप म्हणणे सादर करांना प्रश्नार्थक व कारवाई कां करण्यात आली नाही. अशा प्रकारचे माहिती अधिकारात अभिप्रत मुद्दे उपस्थित केले अपिलार्थी हि प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान तीला देण्यात आलेली माहिती कशा प्रकारे खोटी व बनावटी आहे याबाबत कुठलाही ठोस पुरावा किंवा स्पष्टीकरण सादर करु शकली नाही. तसेच अपिलार्थीने अपिल मध्ये उपस्थित केलेले मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये येत नाही. अपिलार्थी दि. 15.5.09 रोजी मागितलेली मुद्देनिहाय माहिती तिला प्राप्त झालेली आहे.

एकंदरीत अपिलकर्ता यांनी केलेली द्वितीय अपील अर्ज तथ्यहिन, प्रश्नार्थक व असंयुक्तीक मागणी बाबत असल्याने उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यास विनंती आहे.

यावरुन जन माहिती अधिकारी तसेच पोलीस उपआयुक्त यांचे निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 824/2009

श्रीमती बिलकीस बानो जो.शेख शब्बीर
रुईगंज कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रशांत प्रधान
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर

2) श्री रमेश काटरपवार
जन माहिती अधिकारी तथा
कर अधिक्षक
नगर परिषद कार्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.11.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून नगर परिषद कार्यालय कामठी यांचेकडे मकान नं. एनएल/117 हलीमा बी जौ. सिधेक कि नामे या इस का मोटेशन खातीजा कि शेख सुभाल के नामे किया गया है खातीजा बी ने मोटेशन करने के लिये जो अर्जी कि थी उस अर्जी कि अर्जी के सात जो कागज दिये थे उस कि सत्यप्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या

निर्णयानुसार सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की मकान हे हलीमा बी जौ. सिघीक यांचे नावे होते व त्या मकानाचे कर अजुनही अर्जदार स्वतः भरत आहे. परंतु सदरचे घर मकान खातीजा बी यांचे नावे करण्यात आले. व ते सुध्दा सदर मकानाचे कर भरत असतात परंतु कर डिमांड ची पावती त्यांचेकडे स्वतःकडे येत असते व त्यामुळे सदरचे घर मकान हे खातीजा बी यांचे नावावर कसे करण्यात आले त्यांनी त्याकरीता दिलेल्या अर्जाची सत्यप्रत मागितलेली आहे. परंतु तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन न देता यह मोटेशन बहुत पुराना होने की वजह से केस कार्यालय मे उपलब्ध नही है असे कर अधिक्षक नगर परिषद कामठी यांनी कळविलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी अपीलार्थीने कसल्याही प्रकारचे कागदपत्रे सादर न केल्यामुळे अपीलार्थीची अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये कागदपत्राचा शोध घेवून ती माहिती उपलब्ध आहे किंवा नाही व सदरच्या मकानाच्या संदर्भामध्ये कोण कराचा भरणा करतो हे तपासणे आवश्यक होते व अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले हे मान्य करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे जी माहिती उपलब्ध करुन दिली त्यावरुन असे दिसून येते की सदरच्या घरा च्या संदर्भामध्ये अर्जदार सुध्दा कर भरणा करीत आहे व खातीजा बी यांचेकडून सुध्दा कर भरणा होत आहे. जर घर मकान हे खातीजा बी यांच्या नावावर आहे तर देयक हलीमा बी चया नावावर कसे दिले जाते व हलीमा बी च्या नावावर देयक दिले जाते तर खातीजा बी यांचे नाव त्या घराला कसे लावण्यात आले व ही बाब अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होते. तसेच अर्जदार यांनी महाराष्ट्र नगर परिषद अधिनियमाच्या अंतर्गत मुख्याधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे तक्रार अर्ज दाखल करणे संयुक्तिक राहिल. त्या तक्रार अर्जाच्या संदर्भात चौकशी होवून त्यांना न्या मिळू शकेल. मात्र माहिती मिळणेसाठी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 19.11.2008 च्या अर्जाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी चौकशी करुन माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 826/2009**

श्री बंडु सोपानजी लांबसोंगे
मु. पो. कान्होलीबारा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री उमरेडकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री प्रमोद बापुराव शेरेकर
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
श्रीमती चित्रलेखादेवी भोसले हायस्कूल
कान्होलीबारा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक श्रीमती चित्रलेखादेवी भोसले हायस्कूल यांचेकडे 1. मा. मुख्याध्यापक साहेब नियुक्ती तारीख किंवा आर्डरची सत्यप्रत 2. बी.ए. व बी.एड.पूर्ण झाल्याची मार्कलिस्ट सत्यप्रत 3. संस्थेच्या पदाधिका–याच्या पदनामासह सन 1998–99 च्या सत्रामधील माहितीची सत्यप्रतीलीपी मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही. त्याकरीता श्री उमरेडकर गट शिक्षणाधिकारी यांनी सदर अपील खाजगी शाळेबाबत असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. नागपूर हे आहेत. व त्यांनी अपील हे गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगणा यांचेकडे केलेले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही. परंतु गट शिक्षणाधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. व माहिती पं. स. शिक्षण विभाग यांचेकडे 2 दिवसाचें आंत सादर करावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यातही मुख्याध्यापक यांनी गट शिक्षणाधिकारी यांना माहिती ही त्रयस्थानी मागितलेली वैयक्तीक माहितीशी संबंधीत आहे व त्यांना ती उपलब्ध करुन देण्यात येवू नये असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना सदरची माहिती सादर करण्यात आलेली नाही असे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरची माहिती ही त्यांचे स्वतःच्या नियुक्ती विषयी असल्यामुळे सदरची माहिती ही संस्थेकडे मागणे आवश्यक असते. तसेच उमेदवाराची सर्व नियुक्तीच्या वेळेस ती कागदपत्रे संस्थेकडे असतात व

त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरची माहिती ही संस्थेकडे मागणे आवश्यक होते. तसेच आयोगाकडे खुलासा करतांना श्री बंडू लांबसोंगे हे याच शाळेतील बडतर्फ शिक्षक असल्यामुळे ते मुख्याध्यापकाविषयी द्वेष व आकसपकडून आहेत. त्यांनी मागितलेली माहिती पूर्णतः खासगी स्वरुपाची असून व्यक्तीच्या खासगी बाबतीत द्वेष व बदल्याच्या भावणेने आंगतुक हस्तक्षेप होत असल्यामुळे उपरोक्त सादर केलेली माहिती बडतर्फ शिक्षक श्री लांबसोंगे यांना पुरवू नये हि विनंती सादर केलेली माहिती सार्वजनीक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंधीत नसून पूर्णतः वैयक्तीक आहे. खासगी माहिती हिसंबंध नसलेल्या व द्वेषाने पछाडलेल्या व्यक्तीला सादर केल्यास खासगी संरक्षण कायद्याचे उल्लंघन होईल. खासगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप करण्याची कायद्यात तरतूद नसल्यामुळे श्री बंडू लांबसोंगे या बडतर्फ शिक्षकाचा माझ्या वैयक्तीक माहितीशी कोणताही संबंध जोडल्या जावू शक्त नाही असा खुलासा केलेला आहे. त्यावर मुख्याध्यापक यांचे नियुक्ती आदेश हे वैयक्तीक माहिती होत नाही. तसेच त्यांची नियुक्ती ज्या कागदपत्रावर झालेली असेल तर ती वैयक्तीक माहिती होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी त्यांचे म्हणणे योग्य नाही. मात्र सदरची माहिती संस्थेकडे मागणे आवश्यक होते हा मुद्या ग्राहय आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 986/2009

श्री हरीश खेमचंद ठकवानी
ब्लॉक नं. 229–ए जरीपटका
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
नागपूर महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगंबर मेहेर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक (नगर रचना विभाग)
नागपूर महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी नगर रचना विभाग यांचेकडे 1. बिना सरकारी कागजातो वाला नक्शा क्र. 69/ईपीआर/33 कौनसे सरकारी कागजातो के आधार पर नियमानुसार है 2. नगर रचना विभाग बिना सरकारी कागजातो द्वारा नक्शा पास करता है हां या नही 3. बिना सरकारी कागजातो के नक्शा क्र. 69/ईपीआर/33 नियमानुसार है लिखीत मे क्यो दिया गया है? अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 1.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. तत्पूर्वी दि. 24.8.2009 रोजी आपणास आवश्यक असलेली माहिती आपण मुळ नस्तीचे अवलोकत करुन आवश्यक शुल्क भरुन घेता येईल मुळ नस्ती आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल असेही कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.9.2009 रोजी देण्यात आलेला असून जी माहिती प्रश्नार्थक आहे व ज्याचे उत्तर देता येत नाही

व ज्या प्रश्नाचे संबंधात नस्तीमध्ये कागद उपलब्ध नाही त्या बद्दल अर्जदारास आठ दिवसात लेखी कळवावे या निर्देशासह प्रकरण निकाली काढण्यात आलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 990/2009**

श्री भैय्याजी गोपाळराव सोमनकर (मा.शि.)
शासकीय माध्यमिक आश्रम शाळा गोडलवाडी
ता. धानोरा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. आर. देसके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक
ता. जि. नाशिक

2) जन माहिती अधिकारी तथा
आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक
ता. जि. नाशिक ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी कार्यालय आदिवासी विकास आयुक्तालय यांचेकडे एकुण पाच मुद्यांवर सहावर्षापेक्षा जास्त कालावधीचे 2/90 ते 4/98 या कालावधीचे वार्षिक वेतनवाढीचे देयक रु. 25599/- मंजूरीचे अधिकार शासनास असल्यामुळे उपरोक्त संदर्भ मा.अपर आयुक्त कार्यालय नागपूर पत्र क्र. लेखा 5(5)5713 दि. 1.12.2005 अन्वये शासन मंजूरीस्तव आदिवासी विकास आयुक्तालयास सादर केलेले आहे. त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.11.2008 रोजी विहित मुदतीत रु. 28/- खर्चाचा भरणा करण्यास कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला आहे व दि. 11.12. 2008 रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध

करुन दिलेली आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.3. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भामरागड यांचे अंतर्गत कार्यरत असलेले श्री बी. जी. सोमनकर पदवीधर प्राथमिक शिक्षक यांचे 2/90 ते 4/98 या कालावधीचे वेतनवाढी व भत्ते थकबाकी देयक रु. 25599/– कालबाहय झाल्याने मंजुरीसाठीचा प्रस्ताव अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांचे मार्फत आयुक्तालयास दि. 1.12.2005 रोजी प्राप्त झालेला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी करुन त्रुटींबाबत आयुक्तालयाचे पत्र क्रमांक दि. 23.12.2005 व पुन्हा दिनांक 5.11.2008 अन्वये पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि त्रुटींची पूर्तता प्राप्त झालेली नसल्याने शासनास आयुक्तालया मार्फत मंजूरीसाठीचा प्रस्ताव सादर करता आलेला नाही.

मंजूरीसाठीचा प्रस्तावाबाबतची माहितीच्या स्थितीबाबत श्री बी. जी. सोमनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये आयुक्तालयातील माहिती अधिका–याकडे दि. 4. 10.2008 अन्वये अर्ज करुन आयुक्तालयास दि. 15.10.2005 रोजी प्राप्त झालेला असून आयुक्तालयातील माहिती अधिकारी यांनी रक्कम रु. 28/– छायांकीत प्रती व पोस्टेज चार्जेस भरणे संदर्भात संबंधितांना दि. 7.11.2008 अन्वये कळविण्यात आलेले होते. संबंधितांकडून दि. 8.12.2008 रोजी रक्कम रु. 28/–ची मनिऑर्डर प्राप्त होवून माहिती अधिकारी दि.11.12.2008 रोजी पोस्टाने माहिती पाठविलेली आहे. तथापि संबंधित अपील कर्ता यांनी देण्यात आलेली माहिती अपूर्ण व असमाधानकारक असल्याकारणाने दि.2.3.2009 अन्वये प्रथम अपील सादर केलेले आहे. तथापि संबंधिताना सुनावणी संदर्भात बोलविण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अपीलकर्ता यांचे वेतनवाढी व भत्ते थकबाकी देयक रु. 25599/– चे असून महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग शासन निर्णय क. विअप्र–10.08/प्र.क.70/2008 विनिमय दि. 15 मे2009 नूसार वित्तीय शक्तीत सुधारणा होवून वित्तीय अधिकार नियम पुस्तिीका 1978 मधील भाग पहिला उप विभाग एक अनुक्रमांक 5 नियम 39 (ब) टिप–5 नुसार सहा वर्षापेक्षा जास्त काळ प्रशासकीय कारणास्तव थकीत राहिलेले शासकीय कर्मचा–यांचे दावे मंजूर करण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुख व नेमणूक करण्यास सक्षम राहीलेले अधिकारी या नात्याने अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांना असलेले सदरचे प्रकरणास मंजुरी देवून प्रकरण निकाली काढणेबाबत आयुक्तालयाचे पत्र क.आवि/लेखा/प्र. क.5/का.4(1) दि. 16 नोव्हेंबर 2009 अन्वये अपर आयुक्त यांना कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रकरण निकाली काढण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे. तरी कृपया सदरचे अपील निकाली काढणेस नम्र विनंती आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार कमांक 143/2009**

श्री ले. कर्नल श्रीकांत यशवंत काणे (निवृत्त)
112 ब शिवाजी नगर
नागपूर 440010 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री अब्दुल लतीफ
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती दिग्रस
जि. यवतमाळ

2) श्री एम. ए. ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
ग्रामपंचायत कार्यालय वाई लिंगी
ता. दिग्रस जि. यवतमाळ ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 19.11.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक 9.4.2009 रोजी सचिव ग्रामपंचायत कार्यालय वाई यांचेकडून खुलासा मागविण्यात आलेला होता. त्याप्रमाणे दिनांक 5.5.2009 व दिनांक 7.5.2009 रोजी खुलासा देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे नमूद केलेले आहे. परंतु तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी वरीलप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अर्जात मागीतलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांनीच 2008 मध्ये दिलेल्या प्रतीज्ञा पत्राप्रमाणे त्यांचे नावावरचे घर रद्द करण्यात यावे व त्यांच्या

आईचे नावे वरील घर ठेवण्यात यावे त्यामुळे नमुना नं. 8 देण्यात यावे ही त्यांची नवीन मागणी आहे व त्यांनी नवीन अर्ज करुन सदरची मागणी केल्यास त्यांना पूर्वीचे नमुना नं. 8 माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

1) तक्रारकर्ता व गैर तक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.11.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 253/2009

श्री ले. कर्नल श्रीकांत यशवंत काणे (निवृत्त)
112 ब शिवाजी नगर
नागपूर 440010 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बॅंक ऑफ इंडिया इमारत
महात्मा गांधी मार्ग मुंबई 400001 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 19.11.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 25.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 16.8.2009 रोजी दोन मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.9.2009 रोजी अवर सचिव तथा शासकीय माहिती अधिकारी यांनी विचाराधान प्रकरणे जुनी असल्याने धारिका उपलब्ध होण्यास विलंब झाल्याने आपणास विचाराधीन प्रकरणाची वस्तुस्थिती विहित कालावधीत कळविणे शक्य झाले नाही त्याबद्यल दिलगीर आहे असे कळवून माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर पुन्हा आयोगाकडे खुलासा करतांना सुनाधारीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ब्रिगेडियर ए.एन.शिरपूकरक संचालक सैनिक कल्याण विभाग पुणे व कर्नल भगतसिंह देशमुख (निवृत्त) संचालक सैनिक कल्याण विभाग पुणे हे निवृत्तीनंतर शासनाचे अधिकारी आहेत त्यांना Director General Resettlemtnt from Ministry of Defence or an officer nominated by him, Associated as a member in the selection as required vide para १ (c) of Govt.of India, Ministry of Defence Kendriya Sainik Board Letter No. १(१)/ Pol/KSB/A/१९९४ dated २७ April १९९४ प्रमाणे प्राधिकृत करणा–या पत्राची प्रत दिलेली नाही व त्यामुळे माहिती ब्रिगेडियर ए.एन.शिरपूकरक संचालक सैनिक कल्याण विभाग पुणे व कर्नल भगतसिंह देशमुख (निवृत्त) संचालक सैनिक कल्याण विभाग पुणे हे संबंधीत संचालनालयानी प्राधीकृत केलेले आहे किंवा नाही हे कळून येत नाही व

त्यामुळे सदरची प्रत आवश्यक आहे. अवर सचिव तथा शासकीय माहिती अधिकारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे आज हजर नाहीत. त्यामुळे त्यांनी तक्रारदार यांना अपेक्षीत असलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांना Director General Resettlemtnt from Ministry of Defence or an officer nominated by him, Associated as a member in the selection as required vide para १ (c) of Govt.of India, Ministry of Defence Kendriya Sainik Board Letter No. १(१)/ Pol/KSB/A/१९९४ dated २७ April १९९४ प्रमाणे ब्रिगेडियर ए.एन.शिरपूकरक संचालक सैनिक कल्याण विभाग पुणे व कर्नल भगतसिंह देशमुख (निवृत्त) संचालक सैनिक कल्याण विभाग पुणे यांना प्राधिकृत करणा—या पत्राची छायांकीत प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा अवर सचिव तथा शासकीय माहिती अधिकारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 993/2009

श्री आर. झेड. खोंड
ह. मु. पो. ब्रम्हपुरी
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सी. व्ही. मुधोळकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री व्ही. एस. खामतकर
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
(सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे सेवा निवृत्ति विषयक कागदपत्रे सादर करण्याबाबत ज.प.कडुन मला दि. 27 डिसें 04 ते 31 मे 2006 काळात मला दिलेल्या पत्राच्या प्रती अशी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 17.7.2009 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात यापूर्वीच या कार्यालयाचे पत्र क्र. साप्रवि/आस्था–3/माअअ/1508/2008 दि.8.8.2008 आपणास तसेच शासनास कळविण्यात आलेली आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.8.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि.8.8.2008 च्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु. 2 व टपाल खर्च रु. 25 असे एकुण रु. 27 चा भरणा करण्यास पत्राने कळविण्यात आलेले

होते. व त्याप्रमाणेच अपीलकर्ता यांना दि.8.8.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुध्दा पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी तीच माहिती मागीतल्यामुळे अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 182/2009**

श्री ज्ञानेश्वर गोविंदराव डायगव्हाणे
द्वारा शेषरावजी रागीट प्लॉट नं. 12
शिवशक्ती नगर दत्तवाडी नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री मिलींद देशमुख
जन माहिती अधिकारी तथा तथा
प्रशासन अधिकारी (आस्थापना)
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत पुणे – 1 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.11.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 4.7.2009 रोजी व 28.8.2009 रोजी अपील क्र. 2505/2007 च्या दि. 28. 1.2009 रोजी निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की दिनांक 16.3.2009 रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय यांचे पत्र क्र.विचौअ–2007/(प्र.क्र.20)/प्रशा–3 दि. 16 मार्च 2009 उपसचिव महाराष्ट्र शासन यांनी शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीचा अधिकार अधिनियमाखाली प्राथमिक चौकशी अहवाल पुरविण्याची मागणी केल्याच्या संदर्भात पाठविलेल्या पत्राची प्रत नोंदणीकृत डाकेने तक्रारदार यांना पाठविलेली आहे. व त्यामुळे तक्रारदार यांना संपूर्ण वस्तुस्थिती अवगत केलेली असल्यामुळे निर्णयातील आदेशाची पूर्ती झालेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करावी अशी त्यांनी विनेती केलेली आहे. सदरचे पत्र तक्रारदार यांना मिळाले नाही असे त्यांनी सुरुवातीला सांगितले परंतु त्यानंतर त्यांना पत्र मिळाले असल्यामुळे असे पुन्हा आयोगाकडे येवून सांगितल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येते.
2) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 989/2009**

श्री बापुराव दमडूजी आतराम
मु. सालई कलॉ पो. सालई पेवढ
ता. सेलू जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जी. एन. माने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार तहसिल कार्यालय सेलू जि. वर्धा
2) श्री एस. टी. गोहणे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिल कार्यालय सेलू जि. वर्धा
3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी पंचायत समिती
सेलू जि. वर्धा
4) श्री सी. पी. मुंगले
जन माहिती अधिकारी तथा
सचिव ग्रामपंचायत सालई कलॉ
ता. सेलू जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे माहिती मागितली परंतु अर्ज हा सरपंचांना दिलेला आहे व त्यामुळे त्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्यामुळे दिनांक 20.2.2009 रोजी जिल्हाधिकारी तथा अपीलीय अधिकारी वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी यांनी माहिती अधिकारी तथा तहसिलदार सेलू, गट विकास अधिकारी पं. स. सेलू यांचेकडे हस्तांतर कलेले दिसून येते. त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी अर्ज हा तहसिलदाराच्या नावे दिलेला असून सरपंचाकडे दिलेला होता त्यामुळे तहसिलदार यांना अर्ज प्राप्त झाला नाही असे सांगितले. प्रथम अपील त्यांनी जिल्हाधिकारी कडे केले. व

त्यातून तो अर्ज हस्तांतर झाला. तरीही जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत यांनी त्यांना माहितीच्या खर्चाचा भरणा करावा असे कळवून सुध्दा त्यांनी माहितीच्या खर्चाचा भरणा केला नाही. त्यांनी सदरची माहिती ग्रामपंचायत कडेच मागणे आवश्यक होते. व त्यानंतर गट विकास अधिकारीयांचेकडे अपील करणे आवश्यक होते. त्यांनी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत यांनी आयोगापुढे सांगीतले व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा म्हणजे त्यांना माहिती उपलब्ध होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांनी खर्चाचा भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 987/2009

श्री शांताराम गोविंदराव लांजेवार
मु. पो. उश्राळमेंढा
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उप जिल्हाधिकारी (जमीन)
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की त्यांना चार दिवसापूर्वी नोटिस मिळालेली आहे. याचा अर्थ उप जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये चार दिवसापूर्वीच उपलब्ध झाली असली पाहिजे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2009 रोजी माहिती अधिकारी जिल्हाधिकारी (जमीन) कार्यालय चंद्रपूर यांचेकडे नागभीड तालुक्यातील मौजा मेंढा दाखली उश्राळा येथील गट नं. 120 0.57 हे.आर. या जमीनीचे प्रकरण क्र.रामाक्र.61/एलएनडी30/2001–02 सरकार विरुध्द शांताराम गोविंदा लांजेवार या प्रकरणामध्ये आपण पैसे भरण्याची सुचना केलेली होती व त्यानंतर आम्ही नागभीड येथे पैसे सुध्दा भरलेला आहे. त्या चालानची झेरॉक्स प्रत सोबत जोडलेली आहे त्यानंतर मा. तहसीलदार नागभीड यांनी आपल्याला दि. 6.6.09 रोजी पत्र लिहुन हे प्रकरण चालानचे प्रतीसह आपलेकडे मंजुरीसाठी सादर केलेले आहे. हे सोबत जोडलेल्या तहसील कार्यालय नागभीड यांचे पत्रावरुन स्पष्ट हो त्याची झेरॉक्स प्रत सोबत जोडलेली आहे. वरील प्रकरणाची पूर्ण माहिती तसेच या प्रमरणामध्ये जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे अंतीम आदेश काय झाले आहे. याबाबतची पूर्ण माहिती प्रमाणीत प्रतीमध्ये पाहिजे आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.8.2009 रोजी विषयांकीत प्रकरणाचा शोध घेणे सुरु असून प्रकरण प्राप्त होताच आपणास यथाशिघ्र माहिती उपलब्ध करुन देण्यात

येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा प्रकरणाचा शोध घेवून माहिती उपलब्ध द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी सदरची जबाबदारी टाळलेली दिसून येते. त्यामुळे प्रकरण जरी मिळून येत नसले तरी त्याकरीता अपर जिल्हाधिकारी यांनी संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी व पोलीस एफ आय आर दाखल करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत प्रकरणाचा कसून शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांनी प्रकरण आहे व त्याबाबतचा संपूर्ण पुरावा दिलेला असूनसुध्दा प्रकरण आढळून येत नसल्यामुळे संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही करावी. तसेच प्रकरण गहाळ केलेले आहे या कारणास्तव फौजदारी तक्रार करावी. तसे न केल्यास सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>जिल्हाधिकारी चंद्रपूर</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 985/2009

श्री विरेंन्द्र चंपालाल संकलेचा
रा.गणपती वार्ड मु. पो. ता. आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
विशेष प्रकल्प मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग
सिव्हील लाईन्स नागपूर

2) श्री आर. एन. होतवाणी
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे क्र. 2237 दि. 26.5.2006 ची संपूर्ण प्रत ची माहीती व प्रस्तावाची पुर्ण विवरण. सदरची माहिती व्यक्तिशः टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.8.2009 रोजी विषयांकीत प्रकरणी आपला माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 3 अन्वये दि. 31.7.2009 चे अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता आपणास कोणती आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा अनुबोध होत नसल्याने आपणास कळविण्यात येते की आपण व्यक्तीशः या कार्यालयात उपस्थित राहून उपलब्ध असलेल्या

दस्तऐवजाचे अवलोकन करुन आपणास आवश्यक असलेल्या माहितीचे अनुषंगाने नियमाप्रमाणे छायाप्रती उपलब्ध करुन देण्यात येईल असे नमूद केलेले आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 18.8.2009 रोजी पुन्हा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी यांचे पत्र क्र. 2237 दि.26.5.2009 ची संपुर्ण प्रत ची व प्रस्ताव ची माहिती व इतर विवरण देण्यात यावी ही विनंती असे कळविलेले दिसून येते. त्या अनुषंगाने दि. 20.8.2009 रोजी विषयांकीत प्रकरणी संदर्भीय 1 व 2 चे अनुषंगाने आपण आज दि. 18.8.2009 रोजी व्यक्तीशः या कार्यालयात उपस्थित राहून या कार्यालयात उपलब्ध असलेले दस्तऐवज दाखविण्यात आले. सदर दस्तऐवजाचे अवलोकन केले असता आवश्यक विषयांकीत माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे निष्पन्न झाले व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचे पत्र उपलब्ध नसल्यामुळे देता आलेले नाही परंतु सदरचे पत्र हे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी दि. 26.5.2009 रोजी दिलेले असल्यामुळे त्या पत्राची प्रत काय्रलयीन अभिलेख्यामध्ये जतन करण्याची जबाबदारी ही कक्ष अधिकारी यांनी आहे. परंतु ती उपलब्ध नाही. परंतु ज्या संचालनालयाने ते पत्र पाठविलेले आहे त्या संचालनालया कडून त्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देता येईल. असे असले तरी अभिलेख्ये जतन करणे हे कार्यालयाच्या कामकाजाचा भाग असल्यामुळे ज्या अधिका–याची किंवा कर्मचा–याची जबाबदारी त्या अधिका–याचे किंवा कर्मचा–याचे विरुध्द विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहिल. अन्यथा अभिलेख्ये जतन करण्याची जबाबदारी ही टाळण्याचीच प्रवृत्ती दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक झाले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत सदरच्या पत्राची प्रत शोधून काढून किंवा संबंधीत संचालनालया कडून उपलब्ध करुन घेवून विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

3

2) अधिक्षक अभियंता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देण्याची जबाबदारी टाळलेली आहे व त्यांचे कार्यालयामध्ये अभिलेख्याचे जतन होत नसतांना सुध्दा त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही त्यामुळे सदरचे पत्राची जतन करण्याची जबाबदारी ज्या अधिका–याची किंवा कर्मचा–याची आहे त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध न झाल्यास जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 931/2009

श्री गुलाम वारिस
स्टाकी टाऊन बंगला क्र.8/2 क्वार्टर नं. 2
मंगळवारी बाजार सदर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. बी. पी. कदम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णलय यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) डॉ महादेव दोडेवार
जन माहिती अधिकारी तथा
निवासी वैद्यकीय अधिकारी
सामान्य रुग्णलय यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.11.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी डॉ. घोडेवार जिल्हा शल्यचिकित्सक सा.रु.यवतमाळ यांचेकडे वैद्यकीय देयक 1224/— दि. 16.7.99 ला सादर केले 10 वर्ष पुर्ण झाले कार्यालयाच्या दुर्लक्षपणामुळे देयके मिळाला नाही अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.8.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.3.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.10.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता सुनावणीच्या वेळी हजर नसल्यामुळे व विचारलेली माहिती पुरविण्यात आल्यामुळे त्यांनी केलेले अपील खारीज करण्यात येत आहे. वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या खर्चाच्या देयकास मंजुरी देण्याचे प्राधिकार हे उपसंचालकांचे असल्यामुळे अपीलकर्त्यानी उपसंचालक कार्यालयाकडुन वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक पारीत करण्यासाठी पाठपुरावा करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती ती विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु देयकाची रक्कम उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगीतले. या कार्यालयात त्यांचे देयक प्राप्त नाही. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे उपसंचालकांचे स्तरावर वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक मंजुरीसाठी दि. 10.11.2006 ला सादर केलेले असल्यास त्याबद्यलची सुध्दा स्मरणपत्रे हे उपसंचालकांचे कार्यालयास देणे संयुक्तिक राहिल. जेणेकरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपसंचालकाकडे स्मरणपत्र देवून त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना पाठवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 929/2009

श्री रामदास दशरथजी दहाट
के.ऑफ श्री जी.ए.बन्सोड 65 विवेकानंद नगर
साईमंदीर मागे वर्धा रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उप संचालक
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री एस. बी. मेंढे
जन माहिती अधिकारी तथा
शिक्षण उप संचालक कार्यालय
नागपूर ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2009 रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षण उप संचालक यांचेकडे एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी 1997 ते 2006 असून माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 30.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.10.2009 रोजी दिलेला दिसून येतो. असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यावर दि. 30.7. 2009 नुसार केलेल्या अपीला मधील मुद्ये हे माहितीच्या अधिकारा अंतर्गत येत असलेल्या माहितीच्या अनुषंगाने मागणी केलेली नाही. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी दि. 7.7.2009 च्या पत्राने दलेली माहिती योग्य आहे. असा निर्णय देवून खारीज केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना शाळा बंद झाल्या पासून व मा. उच्च न्यायालयाने त्यांचे समायोजन करण्याचे आदेश दिलेले असल्यामुळे व समायोजन केलेले नसल्यामुळे व त्यानंतरही वेतन निश्चिती झालेली नसल्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नाही. त्यांनी उपोषण केले होते परंतु प्रकरणात कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे त्यांना नंतर नियुक्ती देण्यात आली होती. परंतु दरम्यानचा कालावधी सेवाकाळ करण्यात यावा किंवा कसा याबाबत शासनाकडे नस्ती पाठविण्यात आलेली आहे. निवृत्ती वेतन मंजुर होत नाही त्याला ते स्वतः जाबाबदार आहे व तशी मान्यता न दिल्यामुळे त्यांचे निवृत्ती वेतन काढता येत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी नवीन तयार केलेल्या सेवापुस्तकावर सहया केल्यास त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळेल. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांना नवीन सेवापुस्तकात चुकीच्या नोंदी घेतलेल्या असल्यामुळे त्यांनी मान्यता दिलेली नाही अर्थात ही बाब माहितीच्या अधिकारात येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 938/2009

श्री सुरेश शालिकराम दुरुगकर
श्रीनगर बब्बाभवनच्या जवळ गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिघोरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार गोंदिया
2) श्री वैकुंठी
जन माहिती अधिकारी तथा
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय गोंदिया यांचेकडे एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 18.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा धान्य खरेदी निरीक्षक गोंदिया यांना पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 31.8.2009 रोजी मुद्या क्र. 2 ची माहिती सादर करावी मुद्या क्र. 3 ची माहिती जिल्हाधिकारी गोंदिया कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी. मुद्या क्र. 4 ची माहिती गोडावून रक्षक यांचे कडे असते. त्यांचे कडून माहिती मागण्यात यावी. मुद्या क्र. 5 बाबत मा. राज्य माहिती आयुक्त यांनी संबंधीताचे अशा आशयाचे अर्ज फेटाळले करीता सदर मुदयावरील माहिती देता येवू शकत नाही. करीता आपला अर्ज अंशता मान्य करण्यात येवून मुद्या क्र. 2 ची माहिती देता प्राप्त होताच कळविण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी एपीएल बीपीएल जी माहिती मागितलेली आहे ती तहसिल कार्यालयातून ज्या ज्या लाभार्थ्यांना शीधा पत्रीका देण्यात येते त्याबद्यलची संपूर्ण माहिती मागितलेली आहे. कोणत्याही दुकानदाराची किंवा विभागातील त्यांनी माहिती मागितलेली नाही. मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये कार्यवाही सुरु आहे. मुद्या क्र. 3 च्या संदर्भातील माहिती ही वास्तविक अधिनियमाच्या कलम 4 प्रमाणे तहसिल कार्यालयातच उपलब्ध असणे आवश्यक आहे व त्यामुळे त्याबद्यलचा निर्णय हा योग्य नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो.

मुद्या क्र. 2 – अर्जदाराचे वडील नामे शालिकराम जसाराम दुरुगकर रा. चंद्रशेखर वार्ड गोंदिया यांचे नावानी बीपीएल योजनेची शिधापत्रिका क्र. 381/2 5+0 = 10 होते सदर इसम हे दि. 3.3.2000 ला मृत्यु पावले तसेच अर्जदाराचे दोन भाऊ हे शासकीय सेवेत आहेत. तपासणी श्री विजय सहारे पुरवठा निरीक्षक गोंदिया यांनी केले असून अहवाल दि. 14.7.08 ला सादर केले. त्यात अर्जदाराचे उत्पन्न 15000/– रु. चे वर असल्याचे कळविले तसेच शा.नि. कग्र. आविल्य 1099/प्रक्र8886/ना पु 28 दि. 5.11.99 अन्वये बि पी एल कार्डची मर्यादा 15000/– रु. ठरविले आहे. अर्जदाराचे कुटुंबाचे उत्पन्न ठराविक मर्यादा पेक्षा जास्त असल्यामुळे मा. तहसीलदार गोंदिया यांनी त्यांचे आदेश दि. 2.7.2008 अन्वये सदर शिधा पत्रिका रद्य करण्याचे आदेश केले आहेत. शिधा पत्रिका रद्य करण्यात आल्याचे नोटीस अर्जदाराला दि. 1.8.2008 ला देण्यात आले. शिधा पत्रिका रद्य झाल्यावर सुध्दा अर्जदारांनी खोटा कलफनामा व अर्ज डुप्लीकेट शिधा पत्रिका मिळावे म्हणुन श्री मिश्रा क.लि. यांचे दि. 24.7.2008 ला दिले व त्यांची स्वाक्षरी चालानीवर घेवून 40 रु. खजाना दाखल सुध्दा करुन टाकले. सदर हलफनाम्यावर अज्रदारांनी वार्षिक उत्पन्न 15000/– रु. असल्याचे दाखविले असून स्टेट बॅक शाखा रेलटोली गोंदिया यांचे कडुन कर्जा घेतले असून त्या 100/– रु. चे स्टॅम्प पेपर वर हलफनामावर वार्षिक उत्तन्न 35000/– रु. दाखविले आहे. अशा प्रमाणे सदर अर्जदारानी शासन तसेच लहान कर्मचा–याला फसविण्याचे काम सुध्दा केलेला आहे. दोन्ही हलफनाम्याची छायांकीत प्रत या पत्रा सोबत जोडले आहे.

मुद्या क्र. 3 – सदर मुद्यावरील माहीती मा. जिल्हाधिकारी साहेब गोंदिया यांना सादर करण्यात आलेली आहे.

मुद्या क्र. 4 व 5 – सदर मुद्यावरील माहीती बद्यल अर्जदार यांचे वर लावलेले आरोप गंभीर स्वरुपाचे असल्यामुळे आपले कार्यालयातील अपील क्र. 854/2008 व अपील क्र. 855/2008 मध्ये आदेश दि. 12.6.2009 अन्वये अर्जदाराची अपील खारीज करण्यात आलेली आहे.

व यावरुन अपीलकर्ता यांचे अपील क्र. 854/2008 व अपील क्र. 855/2008 खारीज केलेले असले तरी स्वतंत्र अर्जाच्या संदर्भात स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करुन

देणे आवश्यक असते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने ती माहिती उपलब्ध होवू शकत असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व जी माहिती उपलब्ध होवू शकत नसेल ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मुद्या क्र. 1 ते 5 च्या तहसिल कार्यालयात जी माहिती असेल ती माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 921/2009 व 922/2009**

श्री विकास हरिभाऊ तुंडलवार
श्री व्यंकटेश इंडस्ट्रीज
94 चिखली इंडस्ट्रीयल एरिया अग्निशामक ऑफिस जवळ
कळमना मार्केट जवळ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील कमांक 921/2009</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कृषी संचालक (प्र व वि)
कृषी आयुक्तालय म.रा.
साखर संकुल शिवाजीनगर पुणे 411005
2) श्री के. बी. डुबल
जन माहिती अधिकारी तथा
कृषी उपसंचालक (मृ स मृ चा)
कृषी आयुक्तालय म.रा.
साखर संकुल शिवाजीनगर पुणे 411005 ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक 922/2009</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
पोस्ट कृषी नगर अकोला ता.जि.अकोला 444104
2) डॉ. व्ही. एम. गावंडे
जन माहिती अधिकारी तथा
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
पोस्ट कृषी नगर अकोला ता.जि.अकोला 444104 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपील क. 921/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 20.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी कृषी संचालक (प्र व वि) यांचे कार्यालयात टेक्नालॉजी पार्कमध्ये खरेदी केलेले औजाराच्या बाबतीत. एकुण 21 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.5.2009 रोजी माहितीचे एकुण 121 पाने असून त्यासाठी प्रती पान रु.2 प्रमाणे माहितीसाठी एकुण रकम रु. 242 चा भरणा करण्याबाबत कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2009 रोजी 30 दिवसाचे आत माहिती मिळाली नाही

या कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांना दि. 28.5.2009 च्या पत्राप्रमाणे रु. 242 चा भरणा करण्यास कळविले होते. परंतु त्यांनी तो भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांचा अर्ज हा 29.4.2009 रोजी प्राप्त झाला व तिथून दि. दि. 28.5. 2009 रोजी म्हणजे विहित मुदतीत अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा कळविला होता असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सदरचे पत्र त्यांना विलंबाने मिळाले त्यामुळे 30 दिवसाचे आंत खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया पूर्ण होत नसल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा केला नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर झाले नाही व त्यांनी पोष्टाने माहिती पाठवावी असे कळविलेले आहे. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय झालेला दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती तर ती सर्व माहिती कृषी उद्योग विकास महामंडळ एम आय डी सी यांचेकडून संकलीत करुन द्यावयाची होती व त्यामुळेच संबंधीत विभागाकडून माहिती उपलब्ध झाल्याशिवाय त्याबाबतची कोणत्याही प्रकारची निश्चित असा खर्चाचा भरणा हा कळविणे शक्य नव्हते. मात्र सदरची माहिती ही संकलीत करावयाची आहे असे कळविलेले नाही. तसेच दि. 31.6.2009 रु. 286 चा पुन्हा भरणा करावा असे कळविलेले होते. परंतु त्याही बाबत भरणा केलेला नसल्यामुळे त्यांना माहिती दिलेली नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 प्रमाणे माहिती खर्चासहीत भरण्याची प्रक्रिया 30 दिवसात झाली पाहिजे अन्यथा सदरची माहिती कलम 7 (3) प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक असते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 922/2009 मध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर नसून त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला आहे. प्रतिनिधी यांनी असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांची वाशिम येथे बदली झालेली आहे व आता डॉ. शिवाजी सरोदे हे प्रथम अपीलीय अधिकारी आहे. अपीलकर्ता यांनी दि. 20.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांचेकडे एकुण 13 मुद्यांवर कुलगुरु तसेच अभियांत्रिकी विभाग व कापणी पश्चात तंत्रज्ञान विभागाशी संबंधीत माहिती. माहितीचा कालावधी 2005 ते 2009 अशी मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. मात्र संबंधी विभागाला दि. 23.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीस स्वतः हजर राहणे आवश्यक असते तसेच माहिती ही 30 दिवसाचे आत उपलब्ध करुन देणे बंधनकारक असते व त्यामुळे सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचे जे अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे हे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचे कर्तवय असेल त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 921/2009 मध्ये अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 20.4.2009 च्या
अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपील क्र. 922/2009 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 20.4.2009 रोजीच्या अर्जात म्हटल्याप्रमाणे सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पुन्हा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. व विलंबाने माहिती उपलब्ध करुन देणारे अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी. 3

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 942/2009**

श्री मनोहर धकाते सचिव
आदिवासी हलबा समाज समिती
अंचलेश्वर वार्ड गोंडपूरा चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री इश्वर कसबे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. उपसंचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
28 क्वीन्स गार्डन पुणे ता. जि. 411001
2) जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
28 क्वीन्स गार्डन पुणे ता. जि. 411001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांचेकडे Brochure containing the important orders regarding procedure for issue and verification & Tribe certificates हे 1992 मध्ये आपल्या संस्थेमार्फत निर्गमित करण्यात आले आहे. त्यात पृष्ठ क्र. 87 मध्ये अनुसूचित जमाती
(अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश सुधारणा कायदा 1976(1976 चा 108) मधील परिशिष्ट 1 मधील भाग 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे) च्या यादी मध्ये क्र. 18 वर गोंड किंवा राजगोंड मुद्रित करुन पुस्तक प्रकाशित केले आहे त्या आदेााची/पत्राची/कायद्याची प्रत पुरविण्यात यावी. उपरोक्त पुस्ताकचे मुखपृष्ठ व पृष्ठ क्र. 87 ची झेराक्स प्रत जोडली आहे. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.7.2009 रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश सुधारणा कायदा 1976(1976 चा 108) मधील परिशिष्ट 1 मधील भाग 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे यादी मध्ये क्र. 18 वर गोंड किंवा राजगोंड ही जमात दर्शविलेली आहे. अशी नोंद केल्या बाबतचे महाराष्ट्र/भारत सरकारचे आदेश या संस्थेत उपलब्ध नाहीत तेव्हा सदर मागणी केलेली माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये लोकसभा निवडणूका असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही असा खुलासा करण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना

असे सांगितले की सदरच्या Brochure मध्ये गोंड किंवा राजगोंड यादी मध्ये क्र. 18 वरील नोंद मुद्याम करण्यात आलेली आहे. वास्तविक अशा प्रकारे कोणत्याही प्रकारे गोंड किंवा राजगोंड अशी नोंद कागदपत्रांमध्ये नाही व त्यामुळे कोणत्या आधारे अशा प्रकारची नोंद केलेली आहे त्याबद्यलची कागदपत्रे मागितलेली होती. परंतु तशी न देता माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारे त्यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु मुळ प्रश्न अ. क्र. 18 वरील नोंद कशी आली हा अनुत्तरीत राहातो. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की टंकलेखनाची चुक आहे. त्याबाबत कोणताही शासनाचा आदेश नाही. त्याकरीता त्यांनी केंद्र शासनाचे आदेश आयोगाचे निदर्शनास आणले व त्या आदेशा प्रमाणे गोंड किंवा राजगोंड अशी नोंद आहे. तसेच आयोगाकडे त्यांनी खालीलप्रमाणे लेखी खुलासा केलेला आहे.

अपीलकर्ता यांनी नमूद केलेल्या या कार्यालयाच्या सन 1992 मध्ये कार्यालयीन उपयोगासाठीच फक्त तयार केलेल्या Brochure मध्ये अनुसूचित जाती जमातीच्या यादी मधील अ. क्र. 18 वरील गोंड किंवा राजगोंड अशी मनूद नोंद ही टंकलेखनाची चुक आहे. त्याबाबत कोणताही शासनाचा आदेश नाही. व तशी नोंदही नाही. सदर चूकीबाबत कार्यालयाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. मात्र सदरचे Brochure मध्ये सन 1992 मध्ये फक्त कार्यालयीन उपयोगासाठीच तयार करण्यात आलेले होते. ते प्रकाशीत करुन कोठेही त्याच्या प्रती वितरीत करण्यात आलेल्या नाही. हे येथे पुन्हा एकवार नम्रपणे करण्यात येत आहे. त्यामुळे सदर चुकीने कोणत्याही आदिवासीचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

असे असले तरी अपीलकर्ता यांना आयोगाकडे जो लेखी किंवा तोंडी खुलासा केलेला आहे त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगाकडे खुलासा केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 955/2009

श्रीमती शोभा रमेशजी झाडे
154 बी गाडगे नगर रतन लेआऊट दिघोरी
नागपूर 09 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आकुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर प्रादेशिक (विद्युत) मंडळ सा. बां. विभाग,
सिव्हील लाईन्स नागपूर
2) श्री खांबाडकर
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
नागपूर सा. बां. विद्युत विभाग,
सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2009 रोजी कार्यकारी अभियंता नागपूर सा. बां. विद्युत विभाग यांचेकडे अर्जदाराने सादर केलेले अर्ज 1. दि. 22.12.08 2. 19.3.2009 3. 28.5.2009 4. 16.7.2009 या कालावधीपर्यंत केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल 1. कुटुंब निवृत्तीवेतन 2. मृत्यु नि सेवा निवृत्ती उपदान 3. गट विमा योजना व इत्यादी च्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 7.10.2009 रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 5.11.2009 रोजी कै. रमेश श्रावणजी झाडे मयत यांचे कुटुंब निवृत्ती वेतनाचे प्रकरण तयार करुन या कार्यालयाचे पत्र दि.16.10.09 अन्वये महालेखाकार लेखा व हकदारी द्वितीय नागपूर यांचेकडे मंजूरीकरीता सादर करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणाची झेराक्स प्रत आपलेकडे माहितीकरीता पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी असे सांगितले की दि.7.10.2009 रोजी जे उत्तर दिलेले आहे त्या संदर्भामध्ये जी कार्यवाही करण्यात आलेली आहे त्या कार्यवाहीच्या संदर्भातील टिपणी व प्रस्तावाच्या छायांकीत प्रती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाही. त्यामुळे 1. कुटुंब निवृत्तीवेतन 2. मृत्यु नि सेवा निवृत्ती उपदान 3. गट विमा योजना व इत्यादी बाबतचा प्रस्ताव सादर झालेले असतील त्या प्रस्तावाच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या अशी मागणी त्यांनी केली. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 10.8.2009 च्या अर्जामध्ये जी कार्यवाही बद्यलची माहिती मागितलेली आहे त्या प्रस्तावाच्या किंवा टिपणीच्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्या.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 907/2009**

श्री प्रभाकर हरिजी रायपुरे
मु. पो. राजुरा (मा.) सोमनाथपुर वार्ड क्र.14
ता. राजुरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. ई. ढाके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर
2) श्री इरशाद बेग
जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद कार्यालय राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.5.2009 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा नगर परिषद राजुरा यांचेकडे आकृतीबंधानुसार कार्यरत पदाची माहिती तसेच महाराष्ट्र राज्य कर्मचारी संवर्गात नेमणुक असलेल्या पदाबाबत माहिती. सन 2005 ते 2009 या कालावधीबाबत एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.7. 2009 रोजी (20.7.2009 प्राप्त) माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी मुख्याधिकारी नगर परिषद राजुरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती तपशिलात न देता मोघम अशी माहिती दिलेली आहे. त्यामध्ये आकृतीबंधानुसार किती पदे आहेत व त्यावर कोण कोण कार्यरत आहेत व आकृतीबंधानुसार पदे मंजुर नसतांना न. प. आस्थापनेवर कार्यरत आहेत त्याची माहिती मागितली होती. परंतु तशी माहिती उपलब्ध करुन न देता काही पदे रिक्त आहेत असे

..2

मोघम कळविले आहे. तसेच मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये महाराष्ट्र राज्य न. प. कर्मचारी संवर्गात नेमणूक झालेल्या कर्मचा–यास पदस्थापनेनुसार टेबलचे काम देण्यात आले किंवा कसे असल्यास यादी द्यावी याबद्यलची माहिती सुध्दा कार्यालयीन कामकाचा व्याप वाढत असल्यामुळे पदस्थापना केलेल्या कर्मचा–याकडून प्रशासकीय कामकाज सुरळीत चालविण्याच्या दृष्टीने कार्यालयीन कामे घेण्यात येत आहे असे उत्तर दिले आहे परंतु ते कोणकोणत्या अधिका–यांकडून करुन घेण्यात येत आहे ते मात्र दिलेले नाही. तसेच महाराष्ट्र राज्य न. प. कर्मचारी संवर्गात नेमणूक झालेल्या कर्मचा–यास पदस्थापनेनुसार टेबलचे काम देण्याचे शासन निर्णय आहेत काय? त्याबद्यल शासन निर्णय नाहीत असे उत्तर दिलेले आहे. परंतु प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने वरीष्ठ अधिका–याना सुध्दा कनिष्ठ कर्मचा–याचे कामकाज करावे असे सोपविले जाते. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की नगर परिषदेमध्ये बरेचसे कर्मचारी हे त्या त्या पदाच्या अर्हतेप्रमाणे नियुक्त केलेले नसतात व त्यामुळे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी हे प्रशासनाच्या दर्जेनुसार एका विभागातून दुस–या विभागात सुध्दा त्यांना नियुक्ती दिली जाते. त्यात अर्हतेचा विचार केला जात नाही. त्यामुळे वरीष्ठांना कनिष्ठाची कामे द्यावी लागतात. त्यामुळे त्यात कोणत्याही कर्मचा–यावर अन्याय करण्याचा हेतू असतो असे नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना महाराष्ट्र राज्य न. प. कर्मचारी संवर्गात नेमणूक केलेली असेल तर त्यांचेकडे कनिष्ठ टेबलाचे काम दिलेले आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांना नगर परिषद राजुराचा आकृतीबंध व कार्यरत पदे व आकृतीबंधानुसार पदे मंजुर नसतांना न. प. आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा–याची यादी त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच महाराष्ट्र राज्य न. प. कर्मचारी संवर्गात नेमणूक झालेल्या ज्या ज्या कर्मचा–यास आस्थापनेनुसार टेबलाचे काम देण्यात आले असेल त्याची यादी व ज्यांना देण्यात आले नाही त्यांची यादी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे असेही अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ज्या कनिष्ठ लिपीकाना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास सादर करावी असे आदेश दिले होते त्यांनी ती मुदतीत सादर न केल्यामुळे अपीलकर्ता यांना देता आली नाही. असे असल्यास ज्या कनिष्ठ कर्मचा–यामुळे माहिती उपलब्ध झालेली नसेल त्या कर्मचा–याना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. माहिती अधिका–याय अधिनियमाच्या कलम 5 (4) प्रमाणे कनिष्ठ अधिका–याची किंवा इतर अधिका–याची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सहाय्य सुध्दा घेता येते. व त्यामुळे त्या कनिष्ठ अधिका–याना माहिती अधिकारी समजल्यावर सदरचे कनिष्ठ कर्मचारी हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) अन्वये दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता मुख्याधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या

सांगण्यानुसार ज्या कर्मचा–याना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते त्याबाबत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मुद्या क. 1 व 2 प्रमाणे नगर परिषद राजुराचा आकृतीबंध व कार्यरत पदे व आकृतीबंधानुसार पदे मंजुर नसतांना न. प. आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा–याची यादी तसेच महाराष्ट्र राज्य न. प. कर्मचारी संवर्गात नेमणूक झालेल्या ज्या ज्या कर्मचा–यास आस्थापनेनुसार टेबलाचे काम देण्यात आले असेल त्याची यादी व ज्यांना देण्यात आले नाही त्यांची यादी विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. व पोच घेण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 16.5.2009 च्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ज्या कर्मचारीमुळे माहिती विलंबाने उपलब्ध झाली आहे त्या कर्मचा–याच्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्याधिकारी नगर परिषद राजुरा** यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याचे आंत करावयाची आहे

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.11.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 950/2009

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिलीप राहांगडाले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
विद्युत कार्यालय देवरी जि. गोंदिया

2) श्री विनायक कुचबकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता
विद्युत कार्यालय महागाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता यांचेकडे ग्रा.पं.कार्यालय जानवा येथील गावातील इलेक्ट्र लाईन पोल अंदाजे 25.3.09 पासुन तयार करण्यांचे काम चालू केले आहे. ती गावातील इलेक्ट्र लाईन पोल कोण कोणत्या ठिकाणी काम करण्याचे आहे. त्याविषयी एस्टिमेटची छायांकीत प्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 11.8.2009 रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.9.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगास असे सांगितले की त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तसेच दि. 17.9.2009 रोजी सुध्दा जी माहिती उपलब्ध झाली त्यामध्ये एस्टिमेटची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे. असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज स्वयंस्पष्ट आहे. व त्यामुळे जन माहिती

अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती बद्यल विचारणा केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की संपूर्ण संपूर्ण काम आता झालेले आहे व त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु एस्टिमेटची नकल त्यांनी मागीतली नाही. परंतु दि. 11.8.2009 च्या अर्जाप्रमाणे एस्टिमेटची नकल मागीतली आहे असे दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या एस्टिमेटची नकल उपलब्ध करुन दिलेली नसल्यास हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 250/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) सदरच्या शास्तीची वसुली जबाबदारी ही कार्यकारी अभियंता यांची नाहील.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 159/2009

सौ. सुजाता तागडे
117 विजय, पांडे ले आऊट
खामला नागपूर 440022 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
सचिव खामला प्लॉट होल्डर्स को ऑ. हाऊसींग सोसायटी लि.
पांडे ले आऊट खामला नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 22.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सचिव खामला प्लॉट होल्डर्स को ऑ. हाऊसींग सोसायटी लि. नागपूर यांचेकडे दि. 19.4.2009 रोजी सोसायटीच्या कार्यकारीनी सदस्यांचा तपशिल 1. कार्यकारी सदस्यांचा राहण्याचा पुर्ण पत्ता 2. सदस्याचा शेअर सर्टिफिकेटच्या सत्यप्रतिलिपी 3. सदरस्य राहात असलेल्या ठिकाणी अनेक लोक राहात असतील तर बाकीच्या लोकांची सदस्यांना संमती असलेले संमतीपत्र त्याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.6.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे अपील मंजूर केलेले दिसून येते. व गैरअपीलार्थी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दि. 20.7.2009 रोजी उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अध्यक्ष/सचिव खामला प्लॉट होल्डर्स को ऑ. हाऊसींग सोसायटी लि. नागपूर यांना माहिती त्यांचे कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती अध्यक्ष/सचिव खामला प्लॉट होल्डर्स को ऑ. हाऊसींग सोसायटी लि. नागपूर यांना दिलेली दिसून येत नाही. मात्र आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये आयोगानी सचिव खामला प्लॉट होल्डर्स को ऑ. हाऊसींग सोसायटी लि. यांना दि. 14.9.2009 रोजी तक्रारीच्या संदर्भात खुलासा करण्याकरीता पत्र दिलेले होते. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये सचिव यांनी खुलासा करतांना ''आमची संस्था महा. को. ऑप. सोसायटी अंतर्गत नोंदलेली असून ती सार्वजनिक संस्था (Public Authority) नाही. त्यामुळे या संस्थेत कोणताही माहिती अधिकारी नेमलेला नाही. मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.

5666/2007 मध्ये दि. 13.1.2009 (डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को.ऑप.बॅक लि.अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग विदर्भ रिजन नागपूर व इतर) च्या निर्णयाप्रमाणे को. ऑप. सोसायटी ही सार्वजनिक संस्था च्या व्याख्येमध्ये येत नाही त्यामुळे को. ऑप. संस्थेला माहिती अधिनियम लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. सोबत वरील निर्णयाची (2009(3)Mah.L.J.३६४) प्रत जोडली आहे. ही बाब जिल्हा सह निबंधक यांना सुध्दा कळविलेली होती. तसेच सौ. सुजाता तागडे या संस्थेच्या नाममात्र सभासद असल्याने त्यांना संस्थेची कोणतीही माहीती देणे संस्थेस बंधनकारक नाही. त्या आमच्या संस्थेची कोणतेही कारण नसतांना बदनामी करीत आहेत व खोटया तक्रारी संस्थेविरुध्द दाखल करीत आहेत याची कृपया आपण नोंद घ्यावी असा खुलासा केलेला आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयानी ज्या कोणत्याही संस्थेस शासनाचे अनुदान किंवा मदत मिळत नाही ती सार्वजनिक संस्थेच्या व्याख्येत येत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे गैरतक्रारदार सचिव खामला प्लॉट होल्डर्स को ऑ. हाऊसींग सोसायटी लि. नागपूर यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 29.10.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 693/2009**

श्री चित्रशेखर ज्ञानोदय गावंडे
द्वारा श्रीमती निळाबाई ज्ञानोदय गावंडे यांचे घर
एकोरी वार्ड एकोरी मंदीराच्या मागे
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बर्डेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव
राज्य माहिती आयोग कार्यालय नागपूर
2) श्री धोटेकर
जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.9.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.11.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी राज्य माहिती आयोगा यांचेकडे भविष्यनिर्वाह निधी कार्यालय नागपूर यांनी कायद्याची अंमलबजावणी न केल्याबाबत दि. 26.4.2007 रोजी तक्रार केलेली होती. परंतु तक्रारीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यामुळे रजिष्टर पोष्टाने माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.7.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपस्थित राहण्यास पत्र दिलेले होते परंतु आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकीची व नाजुक असल्यामुळे कुठलाही प्रवासाचा खर्च मला झेपणार नाही असे कळविलेले दिसून येते. मात्र माहितीकरीता लागणारा खर्च देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. दि. 14.8.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यात प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी तक्रार केलेली आहे ती तक्रार ही केंद्रीय कार्यालयाच्या संदर्भात आहे. केंद्रीय कार्यालयाचे नियम व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हे भिन्न आहेत. महाराष्ट्राच्या नियमानुसार कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. केंद्राच्या नियमानुसार महाराष्ट्राचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे नियमा प्रमाणे नाही. व त्यामुळे Employees Provident Fund Orginisation च्या Regional P.F. Commissioner-II व माहिती अधिकारी यांनी जे उत्तर पाठविलेले आहे ते योग्य आहे. तसेच केंद्र शासनाच्या कार्यालयाच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही. व त्यामुळेच त्यावेळेस जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.9.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 520/2009

श्री विरेंद्र गजानन दहीकर
239 चॉक्स कॉलनी कामठी रोड
पो. जरीपटका जि. नागपूर 14 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चंद्रकांत डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी
नागपूर
2) श्री मावसकर
जन माहिती अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी क्र. 1
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.6.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी सुनावणीसाठी पुढील दिनांक देण्यात यावा अशी विनंती केली होती व त्यामुळे त्यांना 17.9.2009 ही तारीख देण्यात आली होती. परंतु उत्तरवादी यांचे म्हणणे एकुन घेण्यात आले होते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी अन्न धान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालयात सदर झोन अंतर्गत राजेश धोटे या नावानी प्राधिकृत स्वस्त अन्न धान्याचे दुकानाला ज्या नियमा अंतर्गत सरकारी दुकानाचा परवाना देण्यात आले त्या नियमाची सत्यप्रत मिळणेबाबत. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. तसेच दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 28.6.2007 रोजी चालान भरण्याबाबत पत्र दिले. परंतु अपीलकर्ता यांनी ते दारिद्रय रेषेखालील मोडत असल्यामुळे त्यांनी ओरीजीनल शिधापत्रिका घेवून या कार्यालयात उपस्थित रहावे जेणेकरुन माहिती ताबडतोब देणे सोईचे होईल असे त्यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 1.11.200 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. 23.8.2007 रोजी पुन्हा अन्न धान्य वितरण अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना

दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही अहवाल प्राप्त होताच माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.12.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारे आदेश दिलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली अशा प्रकारे निवेदन अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.9.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 155/2009**

श्री वामनराव जयरामजी बालपांडे
125 हुडकेश्वर रोड विठठलवाडी
पो. म्हाळगी नगर नागपूर 440034 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री जयंत गोरखनाथ ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.
उप विभाग पारशिवनी जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 30.3.2006 रोजी आयोगाकडे तक्रार न करता उप सचिव राज्य माहिती आयोग यांचेकडे तक्रार केलेली आहे. त्यामध्ये जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती एफ आय आर ची कॉपी व पत्रातील मजकुर आम्ही मागीतलेल्या माहितीशी कोणत्याही प्रकारच्या माहीतीचा संबंध मुळीच जुळत नाही अशी पूर्णपणे असंबंधीत माहिती पाठवून अपीलकर्ता अर्जदारापासून खरी माहीती लपवून ठेवून दिशाभूल करुन विनाकारण विलब लावत आहेत अशी तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीचा खुलासा अपील क्र. 719/2008 नुसार आयोगानी दि. 16.5.2009 ला आदेश पारीत केलेला आहे. त्यानुसार कागदपत्रे नष्ठ झाल्याबाबत पुरावा म्हणुन एफ आय आर ची प्रत उपरोक्त संदर्भिय (2) नुसार कळविण्यात आले आहे. त्या एफआयआर मध्ये नासधुस झाल्याचे नमुद केले आहे. वरील माहीती ही अंदाजन 14 वर्ष जुनी असल्यामुळे व कार्यालयात शोधुन सुध्दा मिळत नसल्यामुळे असे गृहीत धरण्यात येत आहे एफ आय आर प्रमाणे वरील मागीतलेली माहिती नासधुस मुळे नष्ट झाली असावी. माहीती अधिकारात मागीतलेली माहिती न देण्याचा असा कोणताच उद्येश नसुन माहीती उपलब्ध नसल्यामुंळे दिलगीरी व्यक्त करण्यात येत आहे असे खुलाशात नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्राच्या संदर्भातील तपासणी केली असता असे दिसून येते की सदरची एफ आय आर मध्ये कार्यालयात घुसुन सामानाची नासधुस करुन कर्मचा–यास अटकाव करुन शासकीय कामामध्ये अडथळा केल्याने रिपोर्ट वरुन सदर कलमाचा गुन्हा दाखल करुन घेण्यात आला असे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती 14 वर्षा पुर्वीची जुनी माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली आहे व तसेही आज सदरची माहिती लपवून ठेवण्याचा कोणताही उद्येश असावा असे दिसून येत नाही. व त्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 96/2009**

श्री मारोतराव विश्वनाथराव मोते
रा. महालक्ष्मी नगर नं.1 प्लॉट नं. 21
मानेवाडा रोड नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री अनील बोबडे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
पाचपावली विभाग नागपूर शहर नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाचे म्हणणेप्रमाणे दि. 11.3.2009 पर्यंत 30 दिवसापेक्षा जास्त कालावधी होवूनही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा त्याबाबत काहीही कळविलेले नाही म्हणून दि. 12.3.2009 रोजी उत्तरवादीच्या कार्यालयात व्यक्तीशः गेलो असता माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही अशी तक्रार करण्यात आलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. 22.4.2009 रोजी खुलासा मागविण्यात आलेला दिसून येतो. तत्पूर्वी दि. 4.4.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे याबद्यलचा खुलासा आयोगाचे कार्यालयात दाखल झालेला होता व त्यामुध्ये दि. 26.3.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमूद केलेले आहे. त्यामध्ये तत्कालीन सहा. पोलीस आयुक्त एन.डी.गोरे यांचे आठवडा डायरीच्या प्रती महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग 2 चे नियम 262 परिशिष्ट 15 अन्वये मुदतबाहय झाल्याने नाश करण्यात आल्या आहेत असे कळविल्याने सदर आठवडा डायरीच्या प्रती पुरविणे शक्य होणार नाही असेही कळविण्यात आलेले आहे. व त्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.
2) तक्रारदार व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 124/2009

श्री वसंत केशव तुपटे
मु. लोहारा पो. जांब
ता. तुमसर जि. भंडारा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी
ता. तुमसर जि. भंडारा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 21.5.2009 रोजी अपील क्र. 2672/2007 मध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे बयाणाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्या प्रतीच्या छायांकीत प्रती निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य अपीलकर्ता यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्यात असा आदेश दिलेला असून सुध्दा बयाणाच्या प्रती फक्त मिळाल्या. पूर्ण चौकशीच्या बयाणाच्या प्रती मागीतलेल्या आहेत. अर्जात नमुद व्यक्तीचे बयाण झालेले होते व ते उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी तुमसर येथे आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने खुलासा मागविण्यात आला होता. त्या खुलाशामध्ये वरील दोन साक्षदारा व्यतिरिक्त अपीलकर्ता यांनी इतर लोकांचे श्री पोलीस पाटील रमेश घोडीचार, श्री तुलाराम तुपटे, श्री रामचंद्र माकडे, री सुरेश कुथे, श्री बालचंद्र माकडे, सुशिल ढोंग मागीतलेले बयाण गुन्हयाचे तपासात घेण्यात आले नाही त्यामुळे त्यांचे बयाणाच्या सत्यप्रती अपीलकर्त्यास पुरविण्यात आले नाही. तो तपासाचा भाग असल्यामुळे तपासातीलल सर्वच बयाण हे गुन्हयाशी संबंधीत असतात असे नाही व त्यामुळे ते तपासात घेण्यात आले नाही. त्या बयाणाच्या प्रती देण्याची आवश्यकता नाही त्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.
2) तक्रारदार व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 936/2009**

श्री सुरेश शालिकराम दुरुगकर
श्रीनगर बब्बाभवनच्या जवळ गोंदिया
ता. जि. गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अनंत वारसकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया

2) श्री जी. आर. नागपूरे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे राजय सरकारी कर्मचारी व मानधान वर असलेले कर्मचारी त्यांचे माहवारी पगार व त्याचें नावासहीत त्यांचे कुटुंब शिधापत्रिकाची देण्याबाबत 1 एप्रिल 2007 ते मार्च 2009पर्यंत. अशी माहिती एकुण तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार गोंदिया यांचेकडे अर्ज तहसिल कार्यालय गोंदियाचा असल्यामुळे हस्तांतर करण्यात आलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 31.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. (सदरचे अपील दि. 5.8.2009 रोजी प्राप्त झालेले दिसून येते.) पुन्हा सदरचे अपील हे दि. 14.8.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गोंदिया यांनी तहसिलदार गोंदिया यांचेकडे हस्तांतर केलेले दिसून येते. व त्यात अपुर्ण माहिती मिळाली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यात अपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती ही तहसिल कार्यालयातील असल्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे केला. तसेच प्रथम अपील सुध्दा तहसिलदार यांचेकडे करण्याऐवजी उपविभागीय अधिकारी यांचेकडेच केले. अपीलकर्ता यांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध असेल त्या कार्यालयातच माहिती मागणे हे अपेक्षित आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की अधिनियमाच्या कलम 4 प्रमाणे तहसिल कार्यालयामध्ये सदरची माहिती उपलब्ध असावयास पाहिजे व ती अशी असती तर त्यांना सदरची माहिती मागण्याची आवश्यकता नव्हती. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की त्यांना

जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती खोटी व दिशाभूल करणारी आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्या लाभार्थ्याला अनुदान द्यावयाचे असल्यास त्याबद्यलचा सर्व निधी हा तहसिलदार खात्यामध्ये येतो व त्यानंतर बॅकेतून त्यांना ती रक्कम मिळते व त्यामुळेच अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी माहिती नाही. अपीलकर्ता हे स्वतः माहितीच्या बाबत नेहमीच सरमिसळ करीत असतात. व त्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देण्यास अडचण निर्माण होते. परंतु जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार हे ही योग्य ती माहिती उपलब्ध करुन देत नाही असे दिसून आलेली आहे. व त्यामुळे नायब तहसिलदार यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 17.3.2009 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी माहिती ही अपुर्ण उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1007/2009 व अपील क्रमांक 1008/2009**

सौ. साधना पुंडलिकराव स्वामी
टी. बी. हॉस्पीटल क्वार्टर
रामनगर चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय
मुंबई – 32

2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय
मुंबई – 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2009 रोजी राज्य माहिती आयोग नागपूर कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. त्यापूर्वी त्याच माहिती बाबत त्यांनी मुंबई येथील कार्यालयात सुध्दा अपील दाखल केले होते. मुंबई येथील अपीलाचा निर्णय दि. 26.6.2009 रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते. व त्यामुळे एकाच माहितीकरीता पुन्हा अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1001/2009

श्री विठठल पांडुरंग राऊत
रा. प्लॉट नं. 26 तिरुपती नगर
कोराडी रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एच. गुज्जलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
2) श्री एस. यु. देव
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नियमितीकरण)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे स्थावर मिळकत मौजा झिंगाबाई आक्ही पं.ह.नं.11, ख.नं.155 शिट नं. 566/42 नं.भु.क्र.228 च्या हद्यीतील अभिनयासातील सार्वजनिक वापराकरिता राखीव म्हणुन मंजुर केलेल्या जागेच्या हद्यीच्या चतु:सिमा व क्षेत्राचे नकाशा बाबत ची माहिती आवश्यक त्या मंजुरी आदेश व नकाशा सहित. अशी एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.7.2009 रोजी एकुण पाच मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 21.8. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.9.2009 रोजी देण्यात आलेला असून आदेश प्राप्त झाल्यापासून 10 दिवसाचे आंत कार्यकारी अभियंता (नियमितीकरण) तथा माहिती अधिकारी नासुप्र यांचे कार्यालयात जावून संबंधीत धारीकेतील दस्ताऐवजाचे निरिक्षण करावे व मुळ अर्जात मागितलेले दस्ताऐवज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना नकाशाची प्रत मिळाली आहे व त्यात सार्वजनिक हितासाठी राखून ठेवण्यात आलेली निश्चित अशी

जागा दाखविण्यात आलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अनधिकृत लेआऊटचे नियमितीकरण करतांना जसे आहे तसे नियमितीकरण केले जाते. कोणत्याही प्रकारे जागेची मोजणी करुन नियमितीकरण केले जात नाही. व त्याप्रमाणे त्यांना नकाशा उपलब्ध करुन दिलेला आहे. आक्षेप घेतल्याच्या संदर्भामध्ये मुद्या क्र. 5 मध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना इतरांनी घेतलेल्या आक्षेपासंबंधी माहिती हवी असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या खस–याच्या संदर्भात त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना दिलेली आहे. त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे व त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांनी निरीक्षण करुन आवश्यक असलेले कागदपत्राची छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे त्याप्रमाणेच अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीची तारीख वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून संपूर्ण नस्तीचे निरीक्षण करावे व आवश्यक त्या माहितीचे कागदपत्रे जी उपलब्ध असतील त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन दयाव्यात.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा तारीख व वेळेचा अर्ज आल्यास त्यावेळेस त्यांना नस्तीचे निरीक्षण द्यावे व आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन द्याव्या.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1006/2009

श्री कृष्णा गोपाळराव कोंडलकर
मु. पो. पिपरी (मेघे) ग्रामीण शिक्षण संस्था कर्मचारी परिसर
क्वार्टर नं. सी–6 पिपरी (वर्धा) ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक कृषी अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक नागपूर विभाग नागपूर
रामदासपेठ नागपूर
2) श्री पी. डी. हजारे
जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिक्षक
विभागीय कृषी सहसंचालक नागपूर विभाग नागपूर
रामदासपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी कृषी सहसंचालक नागपूर विभाग यांचेकडे 1984 ते 1987पर्यंत केलेल्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. 4 मीटर पाणी साठसासाठी शासनास अभिप्रत असलेला पाया किती मीटर व बांधाचे बाजूचा उतार किती असावा. 2. वर्धा जिल्हयात व अधिनस्त नागपूर भंडारा गोंदीया चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयामध्ये केलेल्या कामाचा तपशिल सन 1984 ते 1987 व हयानंतर काम सुरु असल्यास काम बंद करेपर्यंत माहीती द्यावी. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 26.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कृषी खात्याची पुर्नरचना 1998 मध्ये झाली त्यापुर्वीची आहे व त्यामुळे संपूर्ण माहिती एकत्रित करण्याकरीता विलंब झालेला असला तरी अपीलकर्ता यांना खर्चाची

माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे किंवा माहिती तयार करुन देण्याचे मागितलेले आहे. त्यांनी मागितलेली तांत्रिक माहिती 4 मीटर पाणी साठसासाठी शासनास अभिप्रत असलेला पाया किती मीटर व बांधाचे बाजूचा उतार किती टक्के असावा निर्मीत करावयाची असल्यामुळे ती संबंधितास देता आली नाही व देताही येणार नाही हे म्हणणे योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली आहे असा निष्कर्ष काढुन सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1003/2009**

श्री चिंतामन गडी शेळके
न्यु डायमंड नगर प्लॉट नं. 55
बजरंग किराण स्टोअर्सचे मागे पिंपळकर यांचे घरा जवळ
पो. हनुमान नगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. जी. कुंभारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख मौदा
ता. मौदा जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.11.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.9.2009 रोजी सर्वे नं. 337 प.ह.नं.47 ची संबंधीत एकुण सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.9.2009 रोजी सदर स. नं. चा एकत्रीकरण पत्रक व नकाशाप्रत आपणास विहीत नमुन्यात नक्कल अर्ज करुन फी भरना केल्या नंतर पुरविण्यात येईल तसेच एकत्रिकरण योजनेबाबत कार्यालयाशी संपर्क करुन शोध अर्ज करावा व फी चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी योजने संबंधात माहिती शासनाचे वेळोवेळी प्राप्त परिपत्रकाचा नकला फी भरुन प्राप्त करुन घेता येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच सर्वे नं. 337 चे 7/12 च्या नकला संबंधीत तलाठी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असेही कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 30.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 20.10.2009 रोजी दस्तऐवज व नक्कल प्राप्त करुन घेण्याकरीता कार्यालयास संपर्क साधावा असे कळविले. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना मागितलेली माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या सर्वे नं.च्या संदर्भामध्ये 1962 मध्ये एकत्रिकरण झालेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जे अपेक्षित माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता सदरच्या सर्वे नं.चा निरीक्षण करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घेता येईल. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य दिसून येतो.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीची तारीख वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष त्यावेळेस उपस्थित होवून संबंधित सर्वे नं.च्या नस्तीची पाहाणी करावी व त्यातून त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन घ्याव्या.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी तारीख व वेळे कळविल्यावर उपस्थित झाल्यास त्यांना सर्वे नं.च्या संबंधी अभिलेख पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यातून त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.11.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**